
अंकुश शिंगाडे
शिक्षण

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# शिक्षण

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शिक्षण

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# शिक्षण

लेखक : अंकुश शिंगाडे

फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा,

कळमना मार्केट रोड, नागपूर. महाराष्ट्र

ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन: ४ मार्च २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

## मनोगत

### शिक्षणाचा वापर सेवेसाठी करावा!



शिक्षण ही कुणाची मक्तेदारी नाही. ते मिळवायला पैसा लागू नये. पण आजची परिस्थीती पाहिली तर या शिक्षणावर मालकी हक्क निर्माण झाला आहे. मोठमोठ्या शिक्षण सम्राटांनी खाजगी शाळा काढून व शिक्षणावर शुल्क आधारुन शिक्षणाची किंमतच वाढवून टाकली आहे. आज उच्च शिक्षणाचं सोडा साधं प्राथमिक शिक्षण ही पैशानं विकत मिळतं. त्यामुळं लोकही पुढं या शिक्षणासाठी झालेला खर्च पाहून तो काढण्यासाठी भ्रष्टाचार करतात असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

शिक्षणाचा उपयोग कसा करावा असा प्रश्न जर कोणी केला तर त्याची गणती हास्यात होईल. कारण प्रश्नच तसा आहे. पण शिक्षणाचा वापर हा माणसानं विधायक कार्यासाठी करावा.

आज वर्तमानपत्रात काही ना काही बातम्या छापून येतात. त्यात काही बातम्या खऱ्या असतात. तर काही खोट्याही असतात. हे प्रत्यक्ष शहीनिशा झाल्यावर समजते. काही बातम्या शंभर टक्के खऱ्याही असतात. त्यामध्ये येणारी एक बातमी अशी असते की अमुक डॉक्टरनं गर्भलिंगनिदान चाचणी केल्यानं भ्रुणहत्या झाली.

अमुक डॉक्टरनं यकृत व किडणी विकण्याचा व्यवसाय केला. लोकांचंही बरोबरच असतं. कारण आजचे डॉक्टर हे मोठमोठे दवाखाने लावून बसले आहेत. साधारण आजारासाठी अशा रुग्णालयाचे शुल्क हे गरीबांना परवडणारे नाही. त्यांनाही शिक्षण असतं. डॉक्टरकीचं. पण त्या शिक्षणाचा वापर ते गरीब रुग्णाची सेवा करण्यासाठी करीत नाही.

काही वकील मंडळीही वकीलकीचा अभ्यासक्रम पुर्ण करुन जेव्हा न्यायालयात वकीलकी सुरु करतात. तेव्हा तेही न्याय मिळवून देण्यासाठी अतिरिक्त पैसाच घेतात. तो पैसा सामान्यांना परवडत नाही. अशावेळी गरीबांवर अन्याय झाल्यास त्यानं न्याय कसा मिळवावा? हे वास्तव चित्र आहे. तसेच शिक्षक म्हणून समाजातील मुलं घडविणारा घटक....... तोही शाळेत सेवेच्या दृष्टीनं शिकवीत नाही. तोही मुलांकडून पैसाच घेतो. अशावेळी गरीबांकडे पैसा नसेल तर त्याने आपल्या मुलाला कसं शिकवावं? एवढंच नाही तर अधिकारीही आपल्या शिक्षणाचा वापर चांगला करीत नाहीत.. तेही भ्रष्टाचारी मार्गाचा अवलंब करुन पैसा गोळा करतात.

आज आतंकवादीही आपल्या शिक्षणाचा वापर लोकांना नुकसान पोहोचविण्यासाठीच करतात. कारण या आतंकवादी संघटनेचा

बारकाईनं अभ्यास करताच त्यात डॉक्टर, इंजीनीयर, अभिनेते असे चांगले चांगले शिकलेले लोकं असतात.

शिक्षण असं शस्र आहे की या शस्राचा वापर विधायक म्हणून केला तर चांगला वापर होवू शकतो आणि विघातक म्हणून केला तर वाईटही उपयोग होत असतो. हे असं का घडतं असा विचार केल्यास आपल्याला सहज लक्षात येईल की हे शिक्षण घ्यायला जो पैसा लागतो. तो पैसा हा तो अभ्यासक्रम शिकत असतांना खर्च करावा लागल्यानं कोणीही आज गरीबाची सेवा करीत नाही.

आज आपण पाहतो की आज आमदार खासदारही गरीबांना तुच्छ समजतात. आज साधा गावातील सरपंचही गरीबांना तुच्छ समजतो. ज्यांच्या मतदानानं निवडून येतो त्यालाच तुच्छ समजणं ही बाब आश्चर्य प्रकट करणारी आहे. हेही असे का घडते, तर आमदार खासदार किंवा सरपंचपदाच्या निवडणूकीला जो पैसा लागतो. तो पैसा गरीब देवू शकत नाही. म्हणून हा विचार.

खरं तर असा भ्रष्ट व्यवहार आज वाढत चालला आहे. आज पोलिसही गरीबांची केस घेत नाहीत. याबाबत एक घटना प्रसिद्ध आहे. एक पोलिस ठाणे गरीबांची केसच घेत नव्हते. ती घटना पंतप्रधान चौधरी चरनसिंहला माहित झाली. त्यानंतर ते शेतकरी वेषात त्या पोलिस स्टेशनला गेले. त्यांनी अंगावर मळके कपडे

घातल्यानं कोणी त्यांना ओळखूही शकले नव्हते. त्यांनी पोलिसांची भेट घेतली. बैल चोरीला गेल्याबद्दल तक्रार नोंदवा अशी याचना केली. तरीही पोलिसांनी तक्रार नोंदवली नाही. परंतू त्यांनी जेव्हा पैसा देणे कबूल केले. तेव्हा ती तक्रार नोंदवली गेली. हाच दिवस राष्ट्रीय किसान दिन म्हणून मानला जातो.

महत्वपूर्ण गोष्ट अशी की आज तसे नेते सापडत नाहीत. ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी लढत असतांना आपल्याा प्राणाची पर्वा केली नाही. त्या काळासारखे डॉक्टर सापडत नाही. ज्यांनी प्लेगच्या साथीत रुग्णांना मदत करतांना आपला जीव गमावला. पुर्वीसारखे वकीलही सापडत नाहीत, ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यविरांचे खटले निःशुल्क लढले. तसेच त्या काळासारखे शिक्षक सापडत नाही की ज्यांनी शाळेत शिकविता शिकविता स्वातंत्र्यसमरात उडी घेतली. हे असे का घडले. तर त्या लोकांना त्यावेळी शिक्षण शिकायला पैसाच लागला नाही.

मुळात शिक्षण हे शिकायला पैसाही लागत असेल तरी शिक्षणानं आपला स्वभाव का बदलवावा. जर असा शिक्षणान स्वभाव बदलत असेल तर असलं शिक्षण कोणत्या कामाचं असं म्हणावं लागेल.

आज याच दृष्टीकोणातून शिक्षणाचा विचार करायला हवा. तसंच सरकारनंही शिक्षणाचं महत्व वाढवावं. त्यासाठी शिक्षण निःशुल्क करावं. जेव्हा हे शिक्षण निःशुल्क होईल. तेव्हाच शिक्षणाचा खरा उद्देश साध्य होईल. यात शंका नाही. तसेच शिक्षणाचा मुळ उद्देश हा सेवेचा असून शिक्षणाचा वापर सेवेसाठीही व्हावा. जेव्हापर्यंत ह्या शिक्षणाचा वापर सेवेसाठी होणार नाही. तेव्हापर्यंत शिक्षणाला महत्वही प्राप्त होणार नाही. हे तेवढंच खरं आहे.

माझी शिक्षण ही कादंबरी यावरच आधारीत असून या कादंबरीतील नायक सतिश. ह्याने प्रसंगी फुटपाथवर राहून आपल्या बहिण भावाला शिकवलं. आपल्या पत्नीलाही शिकवलं, शिक्षणाचं महत्व लक्षात घेवून. पण जेव्हा त्यांचं शिक्षण झालं, तेव्हा मात्र याच लोकांनी त्याची हेळसांड केली. हे जरी खरं असलं तरी यातील प्रसंग चित्तथरारक आहेत. ते नेमके प्रसंग कसे घडतात हेच पाहण्यासाठी मी ही कादंबरी आपल्यासमोर ठेवत आहे. आपण ही कादंबरी वाचून ती कशी वाटली हे सांगण्यासाठी एक फोन अवश्य करावा ही विनंती.

आपला - अंकुश शिंगाडे नागपूर

शिक्षकी पेशाला

उपजीविका न मानता

जीविका मानणाऱ्या शिक्षकांना

सादर समर्पीत

# शिक्षण

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

ते उन्हाळ्याचे दिवस. अंगाची लाही लाही होत होती. सुर्य डोक्यावरुन आग ओकत होता. पाय भाजत होते. त्यामुळं लोकं उन्हात न फिरता आडोश्याला थांबले होते. अशातच ते तीन मुलं दारोदारी जावून भीक्षा मागत होते. त्यांची वय अनुक्रमे दहा पाच व दोन वर्ष होती. त्या दहा वर्षाच्या मुलाने आपल्या लहान भावाला कडेवर घेतलं होतं आणि पाच वर्षाची त्याची बहिण त्याचं शर्ट पकडून त्याच्या पाठीमागून चालत होती. तर त्या दहा वर्षाच्या मुलाचा एक हात आपल्या भावाला पकडण्यात व्यस्त होता. तर दुसरा हात भीक्षा मागण्यासाठी मोकळा होता. तो मुलगा प्रत्येक दारोदारी जावून उन्हाची तमा न बाळगता व खालच्या जमीनीची पर्वा न करता माधुकरी मागत होता.

अशा उन्हातान्हात माधुकरी मागणाऱ्या त्या मुलाला कोणी माधुकरी देत होते. तर कोणी बरेवाईट बोलून हुसकूनही लावत होते. परंतू त्याचं त्या मुलांना काहीच वाईट नव्हतं. कदाचित त्यांना वाटत असेल की हे प्रारब्धाचे बोल असावेत की आपल्याला एवढ्या कोवळ्या वयात माधुकरी मागावी लागते.

त्यांचं ते शिकण्याचं वय. पण शिक्षण निःशुल्क नसल्यानं व पोटाची लहानशी खळगी असल्यानं ती मुले प्रारब्धालाच दोष देत देत मार्गक्रमण करीत होते. असं ते दृश्य दुर उभा असलेला आदेश पाहात होता. त्याचं हृदय पिळवटून निघत होतं. त्याला ते दृश्य बरं वाटत नव्हतं. त्या मुलांसाठी काहीतरी करावं असं त्याला वाटत होतं. तसा तोही गरीबच होता.

आदेशनं केलेलं त्या बालकाचं निरीक्षण त्याचं जीवन बदलवून टाकणारं ठरलं. कारण ती लहानगी मुलं. त्यांच्या डोळ्यात एक प्रकारची निराशा नव्हती. भय नव्हतं. उन्हातान्हाचं भय तर अजिबात नव्हतं.

त्या मुलांच्या अंगावरही पुरेसे कपडे नव्हते. जे कपडे होते, ते मळकट होते. कुणालाही त्यांच्याजवळ जायची लाज वाटावी एवढे ते कपडे मळकट होते. तर त्याची ती भावंडंही पुरेशी स्वच्छ नव्हतीच. कित्येक दिवसापासून त्यांनी अंघोळ केली नसावी असं वाटत होतं. त्यांचे केसं विखुरलेले होते.

पायात चप्पल जरी नसली तरी आता सवय पडली होती. आता उन्हातानाचीही सवय पडली होती. त्यामुळं त्यांना उन्हातान्हाची भीती वाटत नव्हती. त्यांचं ते निरीक्षण करता करता आदेशचं हृदय पिळवटून निघालं. त्याच्या डोळयाला नकळत धारा

लागल्या व तो त्या मुलांच्या जवळ गेला. त्या मुलाला आवाज दिला. तसं त्या मुलानं भिरभिरत्या नजरेनं आदेशकडे पाहिलं. तसा तो म्हणाला,

"सायेबजी, पैसे द्या नं. " तसा त्यानं हात समोर केला.

आदेशनं त्या तिनही मुलांना दूर एका झाडाच्या सावलीत नेलं. तिथं बसवलं. त्यांना प्यायला पाणी दिलं. तसंच आपल्याजवळ जे काही खायचं होतं, ते दिलं. मुलं आता ते जिनस खायला लागली होती. तसा तो म्हणाला,

"याराणू, भीक कशाला मागता?"

ते चाणाक्ष शब्द. ते शब्द न ऐकल्याला भाष करुन ती मुलं गप्प होती. तसा आदेश म्हणाला,

"याराणू, तुम्ही असे भीक का मागता म्हटलं?"

तसा मोठा मुलगा बोलला,

"सायेब, त्याची लंबी कहाणी हाये. "

तसं म्हणताच आदेशच्या मनात कुतूहल जागं झालं व तो म्हणाला,

"याराणू, तुम्ही पोटभर खावा. अजून काही लागन तं सांगा. पण मले तुमची कहाणी आयकाची हाये. तं तुम्ही सांगाल का मले तुमची कहाणी. "

"आमची कहाणी काई एका दिसात संपणारी नाई. "

"ठीक हाये. तं आपण असं करुया. रोज या झाडाखाली भेटूया. "

आदेश म्हणाला. तसे ते तिथून निघाले.

आता ते रोज एकमेकांना त्याच झाडाखाली भेटायचे. तो रोज त्यांना जेवायला चारायचा. बदल्यापत तो आपली कथा सांगायचा. हे रोजचंच सुरु असायचं.

त्या मुलाचं नाव सतिश होतं. सतीश लहानाचा मोठ होत होता अशातच एक मुलगी झाली. तिचं नाव अंजना ठेवण्यात आलं. तसं घरात विश्वकोटीचं दारिद्र्यच. तरीही त्यांनी तिसरं मुल पैदा केलं. आई ओरडायची, कुटूंबनियोजन करा... पण दूरच्या एका आजीच्या बोलण्यावरुन तिसरं मुल पैदा झालं. तसा स सतिश सांगू लागला.

"मले शिकायची पुष्कळ हौस होती. तसं मले शाळेत घातलं गेलं. मी नुकताच आता चवथीत गेलो होतो. तेच नियती निष्ठूर

झाली आणि अचानक या नियतीनं डोळे फिरवले. एका कार अपघातात माह्ये आई अन् बाबा दोघंबी गेले.

लहान भावाले काहीबी समजत नव्हतं. तो दुधावरचाच होता तेव्हा. बहिणीलाबी काही समजेनासं. तिबी पाचच वर्षाची. पण मी थोडा मोठा म्हणजे दहा वर्षाचा होतो. मले कळत होतं. त्यातच मी मायबापाची भुमिका बजावायचं ठरवलं.

अगदी चित्रपटासारखं वास्तव्य माह्याबी जीवनात आलेलं. शिक्षणाची हौस असली तरी मधातच शिक्षण सोडावं लागलं. कारण आतं फक्त मी नव्हतो, तर माह्यावर अवलंबून असणारे हे माह्ये भाऊ बहिणंबी होते. फक्त माह्यच पोट नव्हतं. तं ह्या माह्या भावंडांचंबी पोट होतं.

मी इचार केला का काम करावं. कामंबी केलं़ं. कारण मले भीक्षा मागणं आवडत नव्हतं. पण काय करणार सायेब, मी जवा काम कराले हाटेलात लागलो. त्या हाटेलचा मालक लई बज्जाड होता. तो काम तं करवून घ्याचा. पण सुटी देतच नव्हता लवकर. त्यातच हे लहानसे भाऊबहिण कोठं ठेवणार. मी दोन दिस काम केलं आन् इचार केला का नाय, आपल्या भावाबहिणीले सांभाळाले कोणी नाय. आपूण इचार केला का आपल्या भावाबहिणीले सांभाळावं. मंग मी धंदा शोधला का माह्ये

भाऊबहिण माह्या जवळ राहाले हवे आन् काम बी व्हाले हवं. पण असा धंदा मिळेना. म्हून भीक मागतो. "

"पण आतं सरकारनं जाहिर केलं ना की भिक्षावृत्ती बंद व्हायला हवी. ते कायदे बनवत आहेत. माहित आहे का तुला?"

"सायेब, ते कायदे बनवोत का अजून काही बनवोत. आपण आतं भेणार नाई. आपल्याले आतं हा धंदा बरा जमतेय. पोटं बी भरते आन् दोन पैसे उरतेत बी. मी तं इचार केला का आपुन भीक मागाची. आन् आपल्या या दोनबी भावाबहिणीले शिकवाचं. "

तसा आदेश म्हणाला,

"बरं या धंद्यावर तू खुश आहे तर......... "

"हो सायेब. यात जास्त मेहनत करा लागत नाई. तसंच बऱ्यापैकी पैसाबी मिळते. शिवाय माह्ये भाऊबहिणबी माह्या जवळ असत्यात. "

असं दररोज चालत असे. एक दिवस आदेशच्या मनात आलं. 'आपण या मुलाला शिकवलं तर आपलं समजून. हा मुलगा होतकरु दिसतोय. हा मुलगा उद्या नक्कीच काहीतरी बनू शकेल. '

तसा आदेश घरी एकटाच राहात होता. तोही एक अनाथ म्हणूनच वाढला होता. उन्हाळे पावसाळे त्यानंही झेलले होते.

त्याचेही मायबाप एकमेकांशी भांडता भांडता मरण पावले होते. त्याला आज त्या सतिशच्या कथेनं त्याचा इतिहास आठवत होता.

त्याच्या मायबापाचं नेहमी भांडण व्हायचं. त्यातच एक दिवस कडाक्याचं भांडण झालं व एका रात्री वैतागून आईनं गळफास लावला. आई मरण पावली होती. पण तो आघात बापाला सहन झाला नाही व बापही दुसऱ्या दिवशी म्हणजे आईला अग्नी दिल्यानंतर मरण पावला. दोघंही संपले होते.

आदेश मायबापाचा एकुलता एक मुलगा. त्यावेळी तो अठरा वर्षाचा होता. तो नुकताच बारावी पास झाला होता. आता मायबापाच्या मरणानं तो एकाकी झाला होता. नातेवाईक मरणाच्या दोनतीन दिवस राहिले. पण ते गेल्यानंतर त्याला एकाकी वाटत होतं.

आदेश बारावी पास झाला होता. चांगले गुणंही मिळाले होते. पण मायबापाची आठवण त्याला सतावत होती. त्याच्या मायबापाचं मोठंं घर होतं. पण आता तिथं स्मशान शांतता होती. कारण आदेशशी त्या घरात बोलायला चालायला कुणीही नव्हतं.

आदेशचे मायबाप हे देखूंगी नोकरीवर होते. पगारही भरपूर होता त्यांना.. पण छोट्या छोट्या कारणावरुन होणारी भांडणं........ तसंच दोघंही स्वतःला श्रेष्ठ समजत होते. याच श्रेष्ठ समजण्याच्या

नादात दोघंही मरण पावले होते मागे गडगंज संपत्ती ठेवून तसेच गाडी बंगला सर्वकाही सोडून.

आदेश घरी एकटाच राहायचा. त्याला करमत नव्हतं. सर्व दिवस उदासीत जायचे. शिक्षण त्यानं सोडलं होतं. त्यालाही आत्महत्या करायचा विचार यायचा. पण क्षणात आठवायचं या बंगल्याला वारस कोण राहणार आपण गेल्यावर. बंगला सरकारजमा होणार. याचसाठी आपल्या मायबापानं मेहनत करुन बंगला बांधला काय..... नाही आपण आत्महत्या करायची नाही. पण वेळ कसा घालवायचा. त्यातच त्याला कुणीतरी सांगीतलं की त्यानं काम करावं. कोणतही काम आणि शिकावं पुढं. यात त्याला तीन फायदे होतील. पहिला म्हणजे ़ त्याचं शिक्षण होईल. दुसरा म्हणजे त्याचा वेळ जाईल आणि तिसरा म्हणजे त्याला कामाची सवय पडेल.

कोणीतरी आदेशला सल्ला दिला. त्यानुसार आता तो शिकू लागला. त्यातच काही किरकोळ कामही करु लागला. घरी गडगंज संपत्ती होती. तरीही त्याची त्यानं तमा केली नाही. नव्हे तर तो मेहनत करीत राहिला. यातच त्याचा विरंगुळाही होत होता व वेळंही जात होता.

शिक्षण म्हणजे काय हे त्याला समजत होतं. त्याला त्याचे शिक्षण शिकून फायदाच होणार होता. त्यातच आता त्यानं डॉक्टर व्यवसायाचा अभ्यासक्रम पुर्ण केला व तो लवकरच नोकरीवर लागला.

ती डॉक्टरकीची सरकारी नोकरी. वेतन तसं कमी होतं. पण कटकट नव्हती. परंतू या सरकारी नोकरीत त्याला रमत नव्हतं. त्याला वाटत होतं की आपणही जनतेची सेवा करावी. पण सेवा कोणाची करणार. तो विचार करीत होता.

आदेशनं काही दिवस सरकारी नोकरी केली. त्यानंतर त्याला त्यात रमलं नाही व त्यानं काही दिवसानंतर सरकारी नोकरीचा त्याग केला व त्यानं खाजगी रुग्णालय उघडलं. हे खाजगी रुग्णालय त्यानं पैसे कमविण्यासाठी उघडलं नव्हतं.

त्यानं खाजगी रुग्णालय उघडलं खरं. पण त्या रुग्णालयाचं शुल्क हे कमी होतं. त्यामुळं ते रुग्णालय चांगलं चालत होतं. त्याला त्या रुग्णालयात रोगी लोकांची सेवा करतांना वेळ मिळत नव्हता. तरीही तो वेळात वेळ काढून अशा लाचार, गरीब लोकांची सेवा करण्यासाठी वृद्धाश्रम व अनाथालयाला भेट देत असे व त्यांना पैशाची व काही वस्तूंची मदतही करीत असे. त्यालाही वाटत असे की आपणही वृद्धाश्रम उघडावं व म्हाता-यांची सेवा करावी. तसेच

अनाथाश्रम उघडावं व अनाथांची सेवा करावी. पण ते शक्य होत नव्हतं. अशातच आदेशची भेट या लहानग्या सतिशशी झाली. निव्वळ भेटच नाही, तर मैत्रीदेखील झाली.

सतिश आता त्याला रोजच भेटत असे. आदेशनं आणलेलं जेवन आधी आपल्या भावंडांना चारत असे. भावंडांचं पोट भरल्यावर तो उरलंसुरलं स्वतः खात असे. तसं एक दिवस आदेशनं त्या तिनही भावंडासाठी कपडे घेवून दिले होते व त्याच्यासाठी व त्याच्या बहिणीसाठी चपलाही विकत घेतल्या होत्या.

सतिशनं ते कपडे घेण्याचे कबूल केले नाही. तशी चप्पलही घेतली नाही. मात्र आदेश त्याला सारखी विनवणी करीत राहिला. पण सतिशनं सांगीतलं,

"सायेब, आपण आम्हाले जेवाले देता, तेवढंच लय हाये. आपण असे कपडे व चपला देवून उपकार करु नोका. आन् आम्हा बहिण भावाले असं उपकाराच्या ओझ्याखाली दाबू नोका. "

"हा उपकार नाही. एक मदत आहे. तू माझा मित्र ना. मग घे. "

शेवटी सतिशनं त्या चपला घेतल्या व कपडेही घेतले.

पावसाळा नुकताच उजळला होता. तरीही सतिश भीक मागतच होता. जेवायला जरी फुकट मिळत असलं तरी कपडे जरी

मिळत असले तरी तो भीक मागतच होता. आलेले पैसे मंदीरातील दानपेटीत टाकत होता. त्याला वाटत होतं की हा पैसा मंदीरवाले गरीबांच्या जेवणाखावण्याची व्यवस्था करण्यासाठी उपयोगात आणत असतील.

एक दिवस त्यानं पाहिलं आणि विचार केला की मंदीरातील पुजाऱ्याजवळ चांगले भरजरी कपडे असतात. हातातल्या चार चार बोटात अंगठ्या असतात. त्याच्या घरच्या महिलाही सोन्यानं मढून असतात. तसेच त्यांची घरंही मोठमोठी असतात. हा पैसा कुठून येत असेल. तो विचार करु लागला. पण त्याला उत्तर सापडेनासं झालं. तोच दररोज भेट घेणारा आदेश त्याला भेटायला त्याच झाडाखाली आला. ज्या झाडाखाली तो रिमझिम कोसळणाऱ्या पावसातही उभा होता. त्याचे बहिणभाऊही चिंब भिजले होते. तो भीकेच्या पैशातून रेनकोटही घेवू शकत होता. पण त्यानं रेनकोट घेतलं नव्हतं. तसा तो चिंब भिजला असलेला आदेशनं पाहिलं. तो त्याच्या जवळ आला. म्हणाला,

"सतिश तू चिंब भिजलाय. तुझे बहिण भाऊही चिंब भिजलेय. तुला थंडी वाजत असेल. "

"नाई सायेब, आम्हाले सवयच हाये याची. "

"उद्या मी रेनकोट आणणार. "

"सायेब, नोका आणू रेनकोट. आमची सवय मोडू नोका. या आमच्या सवयीनं आम्ही आजारी होत नाही. सर्दी, खोकला आन् साधा तापबी येत नाही. आम्ही जर पावसाळयात रेनकोट, हिवाळयात घोंगडं वापराले लागलो अान् उन्हाळयात चपला वापरत राहिलो, तर आम्ही आजारी पडू व औषधाले पैसे नसल्यानं आम्ही मरुन जावू. "

आदेशला त्याचं बोलणं पटलं. तो विचार करु लागला. एरवी जी मंडळी सर्व सुखसोयी वापरतात. ती मंडळी नेहमी आजारी पडतात असं त्याला वाटलं. नव्हे तर त्यात सत्यताही होती. ही मुलं काहीही वापरत नाही. थंडी असो की पाऊस. ही मुलं चपलाही वापरत नाही. कडक उन्हाळा का असेना. ही माणसाची लेकरं नाही तर निसर्गाची लेकरं आहे. तसा तो म्हणाला,

"अरे, तू नको वापरु. पण तुझ्या भावांना तरी. "

"सायेब नोको. तुम्ही आमाले जेवाले देता, तेच तर भरपूर हाये. अजून जास्त काय पाह्यजे. "

तसा तो गप्प झाला. तोच आदेशही चूप होता. तसा सतिश म्हणाला,

"सायेब, एक ईचारु. "

"बोल, काय विचारतोय. "

"सायेब, या मंदीरातल्या पुजाऱ्याईले एवढा पगार रायते का जी. "

"म्हणजे?"

"सायेब, त्याईच्या सर्व बोटात आंगठ्या दिसतेत. त्याईच्या बायकाईच्या गळयात सोना दिसते. अन् मोठमोठ्या बिल्डींगा बी. "

"तो विषय जावू दे. त्यावर बोलायचं नसतं. पण मला एक सांग की तूला असा प्रश्न का पडला?"

"सायेब, खरं सांगू. "

"सांग. "

"तुम्ही जे जेवन देता ना आम्हाले. आमचं पोट भरते त्यानं. पण आमची भीक मागाची सवय. आम्ही ते कशी सोडणार. आम्ही आजबी भीक मागतोच. यात काही पैसा जमा होते. तो पैसा आमच्या कामाचा नाय राहात. म्हून आम्ही तो दान देतो मंदीरात. आम्हाले वाटते का हा पैसा मंदीरावर जी गरीब लोकं अवलंबून रायतेत आमच्यासारखी. त्या गरीब लोकाईच्या कामात यावा. "

त्यानं आपलं बोलणं संपवलं होतं. तसा आदेश विचार करीत होता. किती मोठा विचार या मुलाचा की जो स्वतः भिकारी

असूनही आपल्या पोटाचा नाही तर इतर लोकांच्या पोटाचा विचार करतोय. त्या मुलांचं त्याला कुतूहल वाटत होतं.

तसा आदेश म्हणाला,

"हे बघ, आपण असा पैसा मंदीरात दान द्यायचा नसतो. ज्यांच्या जवळ फुकटचा पैसा असतो, तो दान देतो मंदीरात. अन् हा मंदीरातील काही पैसा हा मंदीरातील पुजारी वापरत असावेत. म्हणून त्यांच्या बोटात अंगठ्या असतील. आपला तो मुद्दाच नाही. परंतू तुला सांगतोय की असा पैसा हा दान देवू नकोस. "

"मग ह्या पैशाचं मी काय करणार?"

"तुझी शिकायची इच्छा होती ना. पण तुझे मायबाप नसल्यानं ती मोडली. परंतू मी तुला सांगतोय की तू जरी शिकला नसेल, तुला जरी शिकता आलं नसेल, तर तू नको शिकूस. पण या भावंडांना शिकव. खूप शिकव. एवढा शिकव की त्यांना तुझा व तुला त्यांचा अभिमान वाटेल. "

आदेशचं बोलणं सतिशला पटलं. तसा तो पुढेही भीक मागतच राहिला. त्यासाठी खुप मेहनत करीत होता. त्यानं आपल्या बहिणीचं नाव शाळेत दाखल केलं. तिला कपडे घेवून दिले. पाटी पेन्सील, नोटबुक, पुस्तकं सर्वकाही. नव्हे तर तो आपल्या बहिणीला शिकवू लागला.

आदेश नेहमी सतिशला भेटायला येत होता. एक दिवस त्यानं विचार केला की आपण या सतिशला आपल्या घरी नेलं तर......... आपला विरंगुळाही होईल व त्याला एक घरंही मिळेल. तसं पाहता आपल्याला या तीन अनाथ मुलांची सेवाही करता येईल. विचारांचा अवकाश त्यानं तो विचार त्याला बोलून दाखवला. एक दिवस त्यानं त्या तिघांनाही जेवन दिलं. तसा तो म्हणाला,

"सतिश एक विनंती आहे तुला. "

"कोणती सायेब?"

"तू माझ्या घरी राहायला चालावं. "

"राहायला! का बरं? तुमची बायको ओरडन नाई का?"

"मला पत्नीच नाही रे. मला अगदी एकटं वाटतं. करमत नाही. तू जर माझ्या घरी येशील तर माझा विरंगूळाही होईल व तुला हक्काचं घर मिळेल. बोल येते ना माझ्या घरी. "

"सायेब नाई येत. "

"का बरं?

"सायेब माह्या सवई तोडू नोका. आम्हाले सवय हाये रस्त्यावर झोपायची. हा पाऊस, वारा, ऊन, थंडी झेलायची. हा आमचा हक्क हाये. तो नोका हिरावू सायेब. "

"तू स्वतःचा विचार करु नको. या तुझ्या भावंडांचा विचार कर. "

सतिश विचार करु लागला. तसा तो म्हणाला,

"सायेब, मी त्यावर नक्कीच विचार करीन. परंतू आताच नाई येणार. "

"ठीक आहे तर. " आदेश म्हणाला. तसे दोघंही आपल्या आपल्या मार्गावर रवाना झाले.

सतिश विचार करु लागला की आपलं ठीक आहे. आपण उन्हाळे पावसाळे सहन करु. उघड्यावर झोपू. काहीही खावू. पण आपली भावंडं. त्यांचं शाळेत जाणं सुरु झालं आहे. उद्या ते मोठे होतील. त्यांचे काही मित्र बनतील. त्यांची मोठमोठी घरं असतील. ते मित्र मग आपल्या भावंडाच्या घरी येण्यासाठी तगादा लावतील. तेव्हा घराची गरज पडेल. तेव्हा आपले भाऊबहिण कोणते घरं दाखविणार. त्यापेक्षा सायेब जर आपल्याला हक्काचं राहायला घर देत आहेत. तर ते स्विकारायला काय हरकत आहे.

सतिशनं पुरता विचार केला व दुसऱ्या दिवशी भेटायला आलेल्या आदेशला तो म्हणाला,

"सायेब, मी तुमच्या घरी यायला तयार हाये. पण एक अट हाये. "

"कोणती अट आहे?"

"मी जरी तुमच्या घरी राहाले आलो, तरी मले भीक मागाची परवानगी असावी. "

सतिशनं तशी अट टाकताच आदेश विचार करु लागला. तसा तो म्हणाला,

"ठीक आहे. तुझी अट मान्य आहे. "

सतिशची ती अट मान्य होताच आदेशनं त्याच्या भावंडासह त्यालाही आपल्या घरी नेलं. आता सतिश आदेशच्या घरी राहायला गेला होता. त्यासोबत त्याची भावंडंही राहायला आली होती. परंतू अटीनुसार आजही सतिश भीक्षा मागत होता. नव्हे आदेशही त्याला विरोध करीत नव्हता.

सतिशच्या बहिणीचं नाव रोशनी होते तर भावाचं नाव रोशन होतं. दोघंही शिकत होते. लहानाचे मोठे होत होते. आदेशही त्यांना काही म्हणत नव्हता. अशातच आपला भाऊ सतिश कोणते काम करतोय हेही त्या दोघांना माहित नव्हतं. अशातच आदेशनं विवाह करण्याचा विचार केला.

सतिश हा पंधरा सोळा वर्षाचा झाला होता. अशातच आदेश विवाहयोग्य वयाचा झाला होता. त्यातच त्यानं मुली पाह्यणं सुरु केलं व तशी एक मुलगी त्याला गवसली. जी डॉक्टर होती.

रितीरिवाजाप्रमाणं तिचा विवाह पार पडला तशी कामना घरात आली.

कामना घरात आली खरी. ती आदेशच्या व्यवसायात मदत करीत असे. पण तिनं पाहिलं की या घरात तिच्या यायच्या पुर्वीच तीन मुलं आहेत. ज्यांच्यावर आदेश निरतिशय प्रेम करतो. त्यांना जीवाभावाचं मानतो. तो त्यांचा कधी राग करीत नाही. तर घरातील सदस्य मानतो. तसं एक दिवस संधी साधून तिनं आपल्या पतीला म्हणजे आदेशला विचारलं,

"आदेश ही तीन मुलं कोण?"

आदेशनं सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरं दिली. पण कालांतरानं तिच्या जिद्दीपुढं त्याला सत्य ओकावंच लागलं. त्यानं सतिश व रोशन रोशनीचा असा इतिहास तिला सांगीतला की ज्या इतिहासानं तिच्या मनात असुया निर्माण झाली.

कामना ही चांगल्या सुशिक्षीत घरातील मुलगी होती. लाडाप्रेमात वाढलेली मुलगी होती. तिचे मायबाप अद्यापही जीवंत होते. त्यामुळं तिला अनाथांचं जीवन काढावं लागलं नाही. तिला वाटत होते की ही अशी मंडळी नक्कीच श्रीमंतीचा फायदा घेतात व आपला उल्लू सरळ करतात.

सतिश चांगल्या स्वभावाचा होता. तो आपल्या जमीनीला विसरली नव्हती. ते लहाणपणीचे चटके त्याला अजूनही आठवत होते. त्या खुणा, ते व्रण अजूनही तो विसरलेला नव्हता. तसा तो आजही भीक्षा मागत होता.

कामना ही त्यांचा राग करीत होती. तिनं कित्येक वेळा आदेशला म्हटलं होतं की त्यांना घराच्या बाहेर काढ. परंतू त्या लेकरांना मायेची उब देणारा आदेश त्यांना कसा घराच्या बाहेर काढेल. तसा तो ती गोष्ट टाळून जात होता. परंतू कामनाला वाटत असे की उद्या आपल्याला पुत्रप्राप्ती झाल्यावर हीच मुलं आपल्या मालमत्तेला वारस ठरतील. आपल्या कमाईतील काही वाटा यांना द्यावाच लागेल. त्यामुळंच ती त्यांचेवर अनन्वीत अत्याचार करीत होती.

कामनाला ती मुलं म्हणजे डोईजड वाटत होती. ती म्हणत असे की या मुलांचं पालनपोषण करण्याची गरज नाही. संधी मिळेल तेव्हा तेव्हा ती आपल्या पतीला म्हणजे आदेशला तशा गोष्टी सांगत असे. त्यात त्या आदेशचं डोकं खराब होत असे. कधीकधी त्यालाही वाटत होतं की पत्नीचं ऐकावं व त्या मुलांना हुसकून लावावं. पण........ पण त्यात एक समस्या होती. ती म्हणजे ती मुलं

स्वतः आली नव्हती. तर त्या मुलांना आदेशनं स्वतः आणलं होतं. त्यामुळं तो मजबूर होता.

आपला पती आपल्या बोलण्याकड लक्ष देत नाही, हा विचार करुन कामना त्या लहानशा मुलांकडून कामं करवून घेवू लागली. झाडू मारणे, स्वयंपाक करणे, कपडे धुणे, तिच्या क्लिनीकला मदत करणे इत्यादी सगळी कामं ती करायची. सतिश मात्र नेहमीप्रमाणं भीक मागायला जायचा.

कामना ही सगळी कामं तर त्या मुलांकडून करवून तर घ्यायचीच. व्यतिरीक्त कामना त्या मुलांना बदल्यात खायला पण बरोबर देत नव्हती. तसेच कधीकधी त्यांना मारायची देखील.

सतिशला हे सगळं माहित होतं. पण तोही उपकाराच्या ओझ्याखाली दबला होता. त्यामुळं की काय? तो आदेशकडे त्या गोष्टी बोलू शकत नव्हता. त्याला वाटत असे की ज्या साहेबानं माणुसकीच्या दृष्टीकोणातून आपल्याला सावरलं. आसरा दिला. त्याच साहेबांच्या पत्नीबद्दल आपण साहेबांना सांगायचं. हे बरोबर नाही. तेव्हा सतिश कधीकधी आपल्या लहानग्या भावाला समजवायचा, बहिणीलाही समजवायचा.

कामनाला वाटत असे की आपल्याला पुढे मुलं होतील. ती मुलं आपली स्वतःची मुलं असतील. परंतू ही मुलं जर इथे राहिली

तर उद्या आपल्या मालमत्तेतील काही वाटा त्यांना द्यावा लागेल असं समजून तिचा अत्याचार वाढतच चालला होता. तिला वाटत होतं की एखाद्या दिवशी ही मुलं अत्याचाराला कंटाळून कायमची घरातून निघून जावी. पण मजबूरीनं सतिश आपल्या भावंडांसह राहात होता. अशातच कामना गरोदर राहिली.

कामना गरोदर असतांना ही मुलं कामनाची खुप काळजी घेत असत. तिला खायला प्यायला बरोबर देत असत. परंतू कामना मात्र त्यांचा द्वेष करीत असे. त्यांना मायेची उब देत नसे. अशातच एक दिवस कामना बाळंत झाली. तिला एक गुटगुटीत बाळ झालं. ते बाळ पाहायला खुप सुंदर होतं.

सतिशसह ती तिन्ही मुलं त्याची काळजी घेत असत. त्याला सांभाळत असत. परंतू त्याचं कामनाला काहीच कौतीक वाटत नसे. ती तर सारखी आता आपल्या पतीच्या कानाशी लागत असे. म्हणते असे की त्यांना हाकलून लावा. ही बेवारस मुलं. उद्या आपल्या मालमत्तेत वाटा मागतील. परंतू तरीही आदेश त्याकडे लक्ष देत नव्हता.

कामनाचं बाळ आता एक वर्षाचं झालं होतं. आता तिनं ठरवलं होतं की त्या मुलांना कोणत्याही परीस्थीतीत हुसकावून लावावे. तशी संधी ती आधीपासूनच शोधत होती. त्यावर विचारही

करीत होती. एक दिवस तिला तशी युक्ती गवसली. तिनं आपल्या घरचे काही दागीने लपवून ठेवले. तसेच एक हलक्या किमतीचा दागीणा त्या मुलांच्या कपड्यात त्यांना माहित न करता ठेवला व पतीला सांगीतलं की घरी चोरी झाली. तक्रार पोलिसात टाकली गेली. पोलिस आले. त्यांनी शहानिशा केली. त्या शहानिशेत ते दागीणे गहाळ असल्याचं सिद्ध झालं. तर एक हलक्या किमतीचा दागीणा त्या मुलांच्या कापडात सापडला. ज्या दागीण्यांची काहीही कल्पना त्यांना नव्हती.

आता तर त्या मुलांना घरातून बिलकुल काढून टाकण्याची नामी संधी चालून आली होती. तशी कामना ओरडत होती. या मुलांना पोलिसात द्या.

ते काळजातील तुकडे. त्या मुलांवर आदेशनं निरतिशय प्रेम केलेलं. त्यांना दूर करणं किंवा हुसकावून लावणं आदेशला पसंत नव्हतं. प्रकार त्याच्या तसा लक्षात आला होता. हे कारस्थान आपल्या पत्नीनंच केलं हेही त्यांना माहित होतं. परंतू त्यानं सखोल विचार केला. जर आज आपण या मुलांना हाकलून लावलं नाही. तर उद्या आपली पत्नी त्यांच्यावर खूप मोठा आळ घेईल. त्यापेक्षा आजच सतिशला सांगून टाकावं की त्यानं घर सोडून निघून जावं. पुन्हा आपल्या पत्नीनं त्याच्यावर आळ आणायला नको. ही नामी

संधी आहे. आपल्याला जरी वाईट वाटत असेल, तरी त्यांनाही वाईट वाटणार नाही व त्यांचं कल्याणही होईल. कोण्या गुन्ह्याच्या कचाट्यात ही मुलं सापडणार नाहीत. कारण सतिश तसा नाही.

ही मुलं चोर नसली तरी पण पोलिस थोडं न त्याचं ऐकणार होते. पत्नीही काही ऐकणार नव्हती. आदेशनं पोलिसांना जायला सांगीतलं. तसे पोलिस निघून गेले.

पोलिस निघून जाताच आपल्या हृदयावर दगड ठेवून आपले काळजाचे तुकडे म्हणून पालवणाऱ्या सतिशला आदेश म्हणाला,

"आताच्या आता तुम्ही घराच्या बाहेर पडा. तुमची आबाळ होवू नये, म्हणून मी तुम्हाला आणलं. एवढे दिवस सांभाळलं आणि तुम्ही बदल्यात काय दिलं. तर माझ्याच घरी चोरी केलीत. काय कमी केलं तुम्हाला? सांगा. यापुढे तुम्ही इथं क्षणभरही थांबू नका. "

आदेशचे शब्द सतिशनं ऐकले. त्याला वाईट वाटलं. आजपर्यंत कामना बोलली. अत्याचार केला. त्याचं तेवढं त्याला वाईट वाटलं नाही. पण आज खुद्द सायेब बोलताहेत हे पाहून त्याला वाईट वाटत होतं. तसे त्यानं अश्रू गाळले व तो आदेशच्या पायावर नतमस्तक झाला. तसा आदेश मागे सरकला व म्हणाला,

"आता मला आपलं तोंडही दाखवायचं नाही. "

त्यावर प्रतिक्रिया देत सतिश म्हणाला,

"सायेब, हवं तर मले माफ करा. मलेच नाई तं मा भावाईलेबी माफ करा. "

आदेश त्यावर काहीच बोलला नाही. तसं सतिशनं सामान आपल्या दोन्ही खांद्यावर अडकवलं व दोन्ही हातानं आपल्या बहिणभावाची बोटं पकडून तो घरातून पाय काढू लागला.

सतिश घरातून बाहेर गेला खरा. पण आता आदेशला बरं वाटत नव्हतं. आदेश त्यानंतर आजारीच पडला. त्याला अन्न गोड लागत नव्हतं. तो दिवसेंदिवस निस्तेज बनत चालला होता. कधीकधी तो घराच्या बाहेर पडत असे व ज्या झाडाखाली त्यांची भेट होत असे. त्या झाडाजवळ जावून तो सतिशला न्याहाळत असे. पण सतिश काही त्याला आता त्या झाडाखाली दिसत नव्हता.

सतिश घरातून बाहेर पडला. त्याचबरोबर त्यानं ते शहर सोडलं. तो दुसऱ्या शहरात राहायला आला होता. कारण आदेशनं म्हटलं होतं की मला तुझं तोंड दाखवायचं नाही. त्यामुळं त्याला ते शहर सोडणं भाग होतं.

सतिशनं शहर सोडलं होतं. तो नव्या शहरात राहायला आला होता. ते शहर नवीन होतं. माणसं नवीन होती.

सतिश आता मोठा झाला होता. तशी त्यांची भावंडंही थोडीशी मोठी झाली होती. ती आता घरी एकटी राहू शकत होती. त्यांना समजही आली होती. ती शिक्षणही शिकत होती.

सतिशनं या शहरात आल्यावर विचार केला. आता आपण भीक मागायची नाही. आपण काम शोधायचं. मेहनतीचं काम करायचं. नव्हे तर आपल्या पायावर उभं व्हायचं. जेणेकरुन आपल्याला आदेशसारख्याचं बोलणं ऐकावं लागणार नाही. तसा तो या नव्या शहरात काम शोधू लागला. अशातच बऱ्यापैकी त्याला या शहरात काम मिळालं.

आदेशला काम सापडलं खरं. पण अद्यापही घर सापडलेलं नव्हतं. त्यामुळं तो काम करायला जायचा. पण राहायचा या नव्या शहरात काही ठिकाणा नव्हता. त्यामुळं की काय? तो आसरा शोधू लागला. पण आसऱ्यासाठी पुरेसं घर न सापडल्यानं तो शहरातील त्या पुलाच्या खाली वास्तव्याला राहू लागला. त्यानं त्याच पुलाच्या खालच्या भागाला वास्तव्याचं ठिकाण बननलं नव्हे तर त्यानंतर त्यानं आपल्या भावाबहिणीचं नाव शहरातील एका शाळेत दाखल केलं.

रोशन आणि रोशनी नियमीतपणानं शाळेत जावू लागली होती. त्यांना भावाची परिस्थीती हळूहळू माहित झाली होती. ती

दोघंही आपल्या भावाला चाहत होती. त्यातच तो भाऊ त्यांना जीव की प्राण वाटत असे. सतिश त्यांना मायही वाटत होता आणि बापही वाटत होता. कारण याच सतिशनं मायबापासारखं आपल्या भावाबहिणीला वाढवलं होतं.

रोशनी आता स्वयंपाक करण्यालायक झाली होती. ती काड्या विकत आणायची व त्या पुलाच्या खालीच एक छोटीशी चूल पेटवून स्वयंपाक करायची. तसा सायंकाळी सतिश घरी येताच त्याला जेवायला वाढायची. लहान भावाचा अभ्यासही घ्यायची. स्वतःही मन लावून अभ्यास करायची. अशाप्रकारे त्यांचा संसार त्या पुलाखाली चालला होता. मात्र शाळेत कुणालाही ते पुलाखाली राहून शिकतात हे माहिती झालं नव्हतं.

सतिश पुरती जिंदगी पुलाखाली काढत होता. शहरात घर मिळणं मुश्किल असल्यानं सारेच संकट पाचवीला पुजलेले होते. कधीकधी भिकारी पकडणारी गाडी यायची. पण त्या गाडीला चकमा देत सतिश व सतिशचे भाऊबहिण आपले दिवस काढत होते.

शिक्षणामुळं आपलं जीवन बदलेल असं सतिशला वाटत होतं. त्याची शिकायची इच्छा होती. पण ती इच्छा त्याला पुर्ण करता आली नव्हती. परंतू तो हिरीरीनं आपल्या भावाला व

बहिणीला शिकवीत होता. त्याला लिहायचं वाचायचं येत नसलं तरी तो आपल्या बहिण भावाला शिक्षण म्हणजे काय व शिक्षणाचे महत्व काय? याविषयी हिरीरीनं मार्गदर्शन करीत होता.

शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. जो ते पितो तो गुरगुरल्याशिवाय राहात नाही. हे डॉक्टर बाबासाहेबांनी बोललेलं वाक्य. शिक्षण काळाची गरज आहे. जो शिकतो. त्यालाच कळतं.

डॉक्टर बाबासाहेब हे समाजसुधारक होते असे नाही तर ते शिक्षण तज्ञही होते. शिक्षणाविषयी त्यांच्या मनात बरीच आस्था होती. त्यांना वाटत होतं की माझ्या देशातील तळागाळातील माणूस शिकायला हवा. त्याशिवाय तळागाळातील माणसांचा विकास होणार नाही. असं त्यांना वाटत होतं.

त्यांना शिक्षणाविषयी तळमळ होती. ते प्रत्येक माणसाला म्हणत की शिका, संघटीत व्हा. संघर्ष करा. त्याचबरोबर माणुसकीही जोपासा हेही सांगीतलंय.

अलिकडे शिक्षणाला महत्व आलेलं आहे. लोकं शिकतात. जास्तीत जास्त पैसा लावून पाल्यांना शिकवतात. शिक्षणाच्या भरवशावर मोठमोठ्या जागाही बळकावतात. मोठमोठ्या पदावरही जातात. पण माणुसकी दाखवत नाही. ते मोठ्या पदावर तर जातात.

पण त्यांच्यानंतर जे शिकलेले नसतात. त्यांच्याबद्दल किंचीतही सहानुभूती न बाळगता त्यांना कचरा समजतात.

सतिशला शिक्षणाचं महत्व माहित झालं होतं. त्यातच शिक्षण हे माणुसकी शिकविणारं असावं असं तिला वाटत होतं.

सतिशनं रोशन रोशनीचं नाव शाळेत दाखल केलं. ती मुलं फुटपाथवर राहून शिक्षणाचे धडे गिरवीत होती. मन लावून अभ्यास करीत होती. त्या फुटपाथवरील दिव्यात ते अभ्यास करीत होते नव्हे तर लहान ते दोन्ही भाऊ आपल्या बहिणीसह त्या फुटपाथवर राहूनही आनंदी होते.

रोशनी आता दहावीची परीक्षा देत होती. ती मन लावून अभ्यास करीत होती. तिला आपल्या भावाची परिस्थिती माहित होती. बरेच दिवस तिच्या भावानं त्यांना जगविण्यासाठी भीक मागीतली होती. आता काही दिवसापुर्वीपासून तो अंगमेहनतीचं काम करीत होता. अशातच ती दहावी परीक्षा मेरीटमध्ये पास झाली.

रोशनी शालान्त पास झाली. शाळेनं तसेच पत्रकारानं सर्वांच्या घरी जावून त्यांचं अभिनंदन केलं. पण रोशनीचं काय? पत्रकारांनी रोशनीच्या घराचा पत्ता मागीतला. त्यावर जो पत्ता लिहिला होता. त्या पत्यावर फुटपाथ असं लिहिलं होतं. तशी

पत्रकाराची टीम तिला शोधायला त्या फुटपाथवर आली. तोच रोशनीला वाटलं कोणी भीकारी पकडणारे लोकं त्यांना पकडायला आले की काय. तोच ती सामानाची आवराआवर करून पसार होण्यासाठी सज्ज झाली. तोच एक पत्रकार तिच्याजवळ येवू लागला.

पत्रकार तिच्याजवळ आला. त्यानं तिचं नाव विचारलं. पण आधीच घाबरलेल्या रोशनीनं खोटंच सांगीतलं की इथे कोणी रोशनी राहात नाही. तसं त्या पत्रकारांना काय काम आहे असंही विचारायला ती विसरली नाही.

पत्रकारानं सांगीतलं की ती शालान्तला मेरीटला आलेली असून आम्हाला तिला काही प्रश्न विचारायचे आहेत. त्यावर जवळंच उभा असलेला सतिश म्हणाला,

"हीच रोशनी आहे. "

"पत्रकाराला आश्चर्य वाटलं. तसे ते म्हणाले,

"रोशनी, तुझा फोटो काढायचा आहे. तुझं घर दाखव. "

रोशनी गप्प होती. सारी आजुबाजूची मंडळी तिच्या भोवती गोळा झाले होते. भीड गोळा होत होती. तसे त्या पत्रकारांना पाहून एक दोन पोलिसही तिच्या भोवती गोळा होत होते. तसा सतिश म्हणाला,

"सायेब, हेच आमचं घर आहे. "

"फुटपाथ. "

"होय. " न लाजता सतिशनं सांगीतलं. "

तसा आलेला तो पोलिसवाला म्हणाला,

"कशाची गर्दी आहे?"

पत्रकारानी उत्तर दिलं.

"ही फुटपाथवर राहात असलेली रोशनी मेरीटला आलीय. दहावीच्या परीक्षेत फुटपाथवर राहूनही ही मेरीटला येणं किती आश्चर्य करणारी गोष्ट आहे. "

"फुटपाथवर अभ्यास करुन मेरीटला आलीय ही. आम्ही तर यांना बराच त्रास दिला. " पोलिसवाला म्हणाला.

आजूबाजूची मंडळी विचार करीत होते की आमची मुलं जेव्हा दहावीत जातात. तेव्हा त्यांना आम्ही सर्वसोयी पुरवतो. त्यांना अभ्यासासाठी विशेष कमरा देतो. शिकविण्या लावून देतो. तरीही आमची मुलं दहावीला चक्क नापास होतात. काही मुलं तर दहावीला कमी टक्केवारी घेतात आणि ही फुटपाथवर राहणारी मुलं. आज ही मुलं फुटपाथवर राहूनही यांना शिकविण्या नसूनही आज मेरीटला आलीत.

पत्रकारांनी रोशनीचा इंटरव्ह्यू घेतला. त्याचबरोबर दुसऱ्या दिवशी तिचा फोटो वर्तमानपत्रात झळकला. लोकं बाकीच्या मुलांपेक्षा तिचीच बातमी वाचू लागले. 'फुटपाथची मुलगी मेरीट' लोकं आश्चर्यानं तोंडात बोटं टाकू लागले. तशी ती बातमी आदेशनंही वाचली. फोटो परीचयाचा वाटत होता. 'कोण ही मुलगी? पाहिल्यासारखी वाटतात. नावही ऐकल्यासारखं. ' क्षणात त्याला आठवल. ही आपल्या घरी राहणाऱ्या सतिशची बहिण. आपण त्यांना हाकलून दिलं. पण त्यांनी जिद्द सोडली नाही. आज ती शालान्त परीक्षेत मेरीटला येवून तिनं नाव मोठं केलं.

आदेशनं जशी ती बातमी वाचली. ती बातमी त्यानं आपल्या पत्नीलाही वाचून दाखवली व विचारलं,

"ओळखलं का हिला. "

तशी ती म्हणाली,

"ओळखीची तर वाटतात. कोण ही?"

"ही आपल्या घरी राहणाऱ्या सतिशची बहिण. "

"ही सतिशची बहिण आहे!" ती आश्चर्यानं म्हणाली. तसा तो बोलला.

"बघ ही मुलं होतकरु आहेत. खूप मोठी होतील. आपण विनाकारण त्यांना हाकलून दिलं घरातून. "

"हो, मलाही आता पश्चाताप होतोय. मी लय अत्याचार केलेत त्यांचेवर. " पतीच्या चेहऱ्यावर खुप दिवसानंतर झळकलेला आनंद पाहताच ती म्हणाली. तसा तो म्हणाला.

"आपण आणुया का त्यांना. "

"पण ती येतील का आता. "

"नाही येणार. मलाही तसंच वाटतं. "

"हो. ती मुलं स्वाभीमानी आहेत. "

"विचारायला काय हरकत आहे. "

"हो, विचारु एकदा तरी त्यांना. आपण जावूयात. त्यांना भेटूयात. आणुया त्यांना. "

ते दोघंही दंपती रात्रीला बोलून गेले. कामना विचार करु लागली. सतिश एक चांगला मुलगा आणि त्याची भावंडंही. पण मीच त्यांचेवर खोटे आरोप लावले. त्यांच्यावर अत्याचार केले. त्यांनी सगळं सहन केलं. जी आपल्या पतीची जीवाभावाची जोपासलेली नाती होती. भीक मागणारी ती मुलं. पण त्यांचं पोट भरताच उरलेला पैसा ती उद्याची चिंता न करता व स्वतःजवळ साठवून न ठेवता मंदीरात दान करत. अशी दान करणारी मुलं. त्यांच्यापासून बरंच शिकण्यासारखं आहे. ती मुलं आज रोशनीच्या नावानं नावारुपाला आलेली आहे. आपण ती मुलं गेल्यावर बरंच

भोगलं. आपल्या पतीनंही भोगलं. आपण आतापर्यंत घर चालवलं. कारण आपला पती डॉक्टर असूनही ते गेल्यावर सतत आजारी राहिला. ते गेल्याचा त्यांनी धसका घेतला. आज पहिल्यांदा त्यांच्या चेहऱ्यावर मी आनंद पाहिला. नाही आता मला माफी मागीतलीच पाहिजे. मी पापी आहे.

कामनानं विचार केला खरा. आज रात्रीला तिला झोपही लागली नाही. तशी ती सकाळीच उठली. तिनं झटपट तयारी केली व ती त्यांना भेटायला आपल्या पतीसमवेत तयार झाली.

कामना रस्त्यानं निघाली होती. तसा परत तिच्या मनात विचार आला. आपण जावून तर राहिलो त्यांना भेटायला. पण ते खरंच माफ करतील का? तसे ते सतिश राहात असलेल्या ठिकाणी पोहोचले.

त्यांनी पाहिलं की त्या फुटपाथवरच काही लोकांची गर्दी आहे. पोलिसही आहेत. पण पत्रकार माहिती घ्यायला येत आहेत.

त्या फुटपाथच्या थोडी बाजूलाच आदेशच्या पत्नीनं गाडी उभी केली. तसे ते दोघंही जण गाडीतून उतरुन त्या गर्दीला चिरुन पलिकड गेले. तशी कामनानं त्या सतिशसह रोशन व रोशनीला ओळखलं. तशी ती त्यांच्याजवळ गेली. तिनं रोशनीला कवटाळलं आणि रडायला लागली. आदेश मात्र बाजूला उभा होता. तसे सारे

लोकं ते दृश्य पाहात होते. काय होत आहे आणि काय झालं ते कुणालाच समजत नव्हतं. सतिशही स्तब्ध उभा होता.

"माझी मुलं. मला माफ करा. मी लय चुकले. आता घरला चाला. " कामना बडबडत होती. तशी ती हुंदके देवून रडतही होती. तसं लोकांना समजायला वेळ लागला नाही. काही लोकांनी तर उलटच विचार केला.

ते सुटबुटातले दोघंही जण. कदाचित या बाईची नाजायज तर मुलं नाहीत. त्यांनी तसं समजून हळूहळू गर्दी कमी केली. तशी कामना रोशनीचं आलिंगन सोडवत सतिशला म्हणाली,

"बाळा, मला माफ कर. मी चुकले. लय लय चुकले. " तसा आदेशही म्हणाला,

"होय बाळा, आम्ही चुकलोत. माफ कर आम्हाला. "

सतिश खाली मान टाकून होता. तसा तो रडकुळया भावात म्हणाला,

"त्यात माफी कायची? मायबापानं का लेकराईले माफी मागावी काय?"

"आम्ही माफी मागण्याच्याही लायकीचे नाही. "

"असं म्हणू नका आई आम्ही कोठंबी जावू, तरी तुमचेच मुलं राहू. "

"ते वैगेरे काही नाही. आता घरला चला. "

सतिश विचार करु लागला. तसा तो म्हणाला,

"आई. "

'आई' शब्द ऐकताच कामनाचं हृदय भरुन आलं. तशी कामना परत म्हणाली,

"येणार न घरी. "

असं म्हणतांना तिच्या डोळयात आशा होती. तसा तो म्हणाला,

"आता आम्ही घरला येणार नाई. "

"का बोलतोस बाळ. "

"होय. मी खरंच बोलतोय. "

"मी माफी मागते. "

"आई, माफी तर मी मागावी. कारण तुम्ही आम्हाले खुप सांभाळलं. "

"पण तुला चालावं लागते घरी. "

"आई, एक सांगू, आम्ही जेव्हा आमच्या पायावर उभं होवू. सोताचं हक्काचं घर बांधू. तेव्हाच येणार घरी. "

"नाही बाळ. "

"आई, तुले नाय वाटत का आम्ही आमच्या पायावर उभं राहावं. तुला वाटत नाही का की आम्ही आमच्या बळावर घर बांधावं. "

"वाटतेय. "

"म्हूनच आम्हाले करु दे मेहनत. आम्हालेबी आमच्या पायावर उभं रावू दे. आमचंबी घर बांधायला आशिर्वाद दे. देणार नव्हं आई. "

"पण....... "

"पण बीन काई नाई. एवळी एक दया करा. "

कामना विनवणी करीत होती. पण सतिश मानायला तयार नव्हता नव्हे तर आदेश स्तब्ध उभा होता. तसा आदेशनं तिच्या खांद्यावर हात ठेवला. तिनं मागं वळून पाहिलं. तोच तो म्हणाला,

"सतिशचं बरोबर आहे. त्यांना आपल्या पायावर उभं होवू दे. जीवनाचे धडे गिरवू दे. हं आपल्याला एवढंच करायचं आहे. आशिर्वादाचे हात त्यांच्या पाठीवर ठेवायचे आहे. चला आता निघूया. "

कामना काय समजायचं ते समजली. तसा तिनं त्यांचा निरोप घेतला. ती मुलं कामना आणि आदेशच्या पायावर डोकं टेकवून

नतमस्तक झाली. तसे कामना व आदेश दोघंही जण घराकडे रवाना झाले

साऱ्या पंचक्रोशीत रोशनीची चर्चा होत होती. जो तो म्हणत होता. फुटपाथवरची मुलं! मेरीटला आली! शिकवणी न लावता ती मेरीटला आली आणि आमची मुलं. सर्व अभ्यासाच्या सोयी. स्पेशल रुम वरुन महागड्या शिकवण्या. तरीही परीक्षेत चांगले गुण घेत नाहीत. इत्यादी चर्चा गल्लीबोळातून, पानठेल्यावरुन फिरत होत्या. तसे आता ते फुटपाथवर राहात असले तरी आता त्या मेरीटपणामुळं त्यांची इज्जत वाढली होती. त्यांच्याकडे जो तो जाणारा, येणारा व्यक्ती हा आदरानं पाहात होता. त्यांची इज्जत करीत होता. हा जो बदल झाला होता. तो केवळ अभ्यास करण्यानं व शिक्षणानं केला होता.

रोशनीनं अकरावीला प्रवेश घेतला. तिचा प्रवेश पहिल्याच प्रयत्नात झाला होता. तिला, प्रवेशाला अडथडा आला नाही. तसं महाविद्यालय सुरु झालं.

अकरावीचा वर्ग. या अकरावीत मुलं मुली गाडीनं येत होती. महाविद्यालयाच्या मैदानावर मुलं केवळ टवाळक्या करीत बसत होती. कधी रेस्टारेंटमध्ये तर कधी मुलं आपआपल्या मैत्रीणीच्या मित्राच्या घरी जात होती. पण रोशनीला वाटत होतं. आपण जर

मैत्री केलीच तर आपण कसे कोणाला घरी आणणार. तशी ती कोणात मिसळत नव्हती. तरीही मित्र मैत्रीणी मात्र तिला आपल्यात मिसळवीत होते.

एकदा तिची एक मैत्रीण तिला म्हणाली,

"रोशनी अशी एकटी का राहते गं. आमच्यात मिसळत जा. "

तशी ती म्हणाली,

"अगं, मिसळते ना. पण मला मुलांचे स्वभाव आवडत नाहीत. ते वात्रट असतात. "

"तू अशी खोटं बोलू नकोस. मला माहित आहे तुझं खरं कारण. "

"म्हणजे!" ती आश्चर्यानं म्हणाली.

"तेच कारण आहे न. तुझ्या राहण्याचं. तुला वाटत असेल की तू फुटपाथवर राहते. "

"होय, तेच कारण आहे. पण तुला कसं माहित?"

"मी अंतर्यामी आहे. कळतं थोडं थोडं. " तशी ती हसली. तशी रोशनी म्हणाली.

"काय करु. तेच कारण आहे. मला कोणी विचारलं की आज रोशनीच्या घरी जायचं तर मी काय सांगणार की मी फुटपाथवर

राहते म्हणून. ती मित्र त्या मैत्रीणी काय विचार करतील माझ्याबाबत. "

"वेडी गं वेडी. असा विचार करतेय. अगं या महाविद्यालयातील मुलं मुली तसे नाहीत. त्यांना तुझ्याबद्दल सहानुभूती आहे. ते बोलतात कधीकधी चांगले बोल तुझ्याबद्दल. तुला ते चांगली मुलगी समजतात. मला सांग कधी एखाद्या वेळी तुला काही म्हटलं काय त्यांनी. नाही ना. "

"हो, काहीच म्हटलं नाही. "

"मग आता मी सांगते त्याप्रमाणं कर. मुलात मिसळत जा. तुला बरं वाटेल. तुझा विरंगुळा होईल. अगं हेही दिवसं निघून जातील. "

त्या मुलीचं नाव शिवाणी होतं. त्या मुलीनं तसं म्हणताच आजपासून रोशनी मुलांमध्ये मिसळायला लागली होती. मुलंही चांगली होती. जी तिला सांभाळत होती.

एक दिवस सतिश बसला होता. तशी रोशनी त्याचेजवळ गेली. म्हणाली,

"दादा, तू किती कष्ट करतोय. राब राब राबतोय. आम्हाला शिकवतोय. तू आम्हाला सर्व दिलं. पण आता एकच अपेक्षा आहे. "

सतिश आश्चर्यात पडला. तसं त्यानं विचारलं,

"कोणती अपेक्षा?"

"दादा, आता घर हवं आपल्याला. ह्या फुटपाथचा नुसता वैताग आलाय. बोल बनवणार न घर. "

"घर........ रोशनी घर म्हणणं सोपं हाये. पण ते बांधणं तेवढंच कठीण. मलेबी वाटते का असं रायणं बराबर नाई. तुही कालेजातली पोरं तुले का म्हणत असतीन मलेबी ईचार येते. पण का करु. आज शयरातली जागेची किंमत पाह्यली का काळीज हेलावते. त्यावर छोट्याशा बी घराचा ईचार केला तं ते मुश्किल काम हाये. पण एक रोशनी, मी जरी तुले घर देवू शकलो नाई, तरी तू आपल्या शिक्षणानं असं घरकूल तयार कर. जे घरकूल तुले तुही नोकरी लागताच प्राप्त होईन. पण रोशनी मले माफ कर. मी तुले घर देवू शकत नाई. "

रोशनी काय समजायचं ते समजली. तशी ती गप्प झाली. पुन्हा त्यानंतर घराचा प्रश्न तिनं उपस्थीत केला नाही.

******************************************
**

रोशनी अकरावी पास झाली होती. ती आता बारावीत गेली होती. सर्व मुलं अभ्यासाला लागली होती. तशी तिही अभ्यासाला लागली होती.

बारावीचा अभ्यास थोडा कठीण होता. तो अभ्यास तिला समजत नव्हता. काय करावे सुचत नव्हते. मुलांनी शिकवण्या लावल्या होत्या. अर्ध वर्ष निघून गेलं होतं. अशातच ती आता बारावी नापास होईल या भीतीनं उदास राहायला लागली होती.

शिवाणी तिची जीवाभावाची मैत्रीण होती. ती तिला नेहमी मदत करीत असे. त्यातच तिचं उदासपण तिनं पाहिलं. एक दिवस ती तिला म्हणाली,

"रोशनी, मी आजकाल पाहाते तर तू उदास दिसतेय. असं काय झालं की तू उदास राहातेस? मी तुला आनंदी राहायला सांगीतलं ना. काय फुटपाथचं कारण आहे? काय भावानं काही म्हटलं?"

"शिवाणी, तशी काही गोष्ट नाही. "

"मग कोणती गोष्ट आहे?"

"अगं, मला सरांचं शिकविलेलं नीट समजत नाही. शिकवणी लावायला पैसा नाही. कदाचित बारावी निघेल की नाही अशी भीती वाटते. माझा भाऊ राब राब राबतो. आम्हा बहिण भावाला

निव्वळ शिकवतोच असं नाही, तर जेवनही चारतो. मायबापाची माया तोच लावतो. मी मायबापाला पाहिलेलं नाही. माझा भाऊच माझा मायबाप आहे. अन् अशावेळी मी नापास झाले तर माझ्या भावाला काय वाटेल. शिवाणी बारावी पास जर व्हायचं म्हटलं तर शिकवणी लावावी लागेल मला. अन् शिकवणी लावायसाठी पैसेच नाही माझ्याजवळ. "

"एवढीच चिंता आहे ना. तू चिंता करु नको. आम्ही मित्रमंडळ तुझी ही चिंता मिटवू. आतातरी खुश. "

"Ok, I am fine. "

शिवाणीनं आजच तो विषय आपल्या मित्रांच्या समक्ष ठेवला. त्या मित्रांना सांगीतलं की आपण शिवाणीच्या शिकवणी वर्गाची इच्छा पूर्ण करुया. आपण शिवाणीला शिकवणी लावून देवूया. आपण त्याचे पैसे भरुया. तर बोला कोण कोण तयार आहे? जो तयार असेल, त्यांनी हात वर करावं. "

शिवाणीच्या म्हणण्यानुसार सा-यांनी हात वर केले. त्यांनी रोशनीच्या शिकवणीसाठी निधी गोळा केला. पण शिकवणी वर्गाचं शुल्क पुष्कळ होतं. तेव्हा जे काही पैसे गोळा झाले होते किंवा होणार होते. ते काही जास्त पैसे नव्हते. तेव्हा शिवाणी म्हणाली,

"मित्रांनो, हा पैसा शिवाणीच्या शिकवणीसाठी पुरेसा नाही. तेव्हा तुम्ही तुमच्या शिकवणी वर्गातील शिक्षकांना शिवाणी बद्दल सांगा व तिची परिस्थीतीही सांगा. कोणाला तर दया येईल. पाहू काय करायचं ते. " असे म्हणून शिवाणी चूप झाली.

शिवाणीनं म्हटल्याप्रमाणं विद्यार्थ्यांनी आपल्या आपल्या शिकवणी वर्गाच्या सरांना रोशनीबाबत विचारुन पाहिलं. पण सर्वजण पैसे घेणारेच शिकवणी वाले होते. काहीजण म्हणत होते की शिकवण्या घेणे ही तारेवरची कसरत असून हा आमचा धंदा आहे. आम्ही जर असा प्रवेश दिलाच तर उद्या कोणीही येतील आणि कोणीही विनामुल्य प्रवेश मागतील.

सर्व विद्यार्थ्यांनी शिवाणीला आपआपल्या शिक्षकाचं मत सांगीतलं. सर्वांकडून नकार आला होता. पण एक मुलगी म्हणाली,

"माझी शिक्षीका शिकवायला तयार आहे. पण तिची एक अट आहे. ती म्हणजे तिनं बारावी झाल्यानंतर तिची जी काही फी होईल, ती द्यावी लागेल. ती देण्यासाठी रोशनीनं तिच्या घरी मोलकरणीचं काम करावं. बदल्यात ती जेवन खावणही देईल. "

शिवाणी विचार करु लागली. एक तास शिकविण्याच्या बदल्यात शिवाणीनं मोलकरीण बनावं. तिला ते पसंत पडलं नाही. तशी ती त्या सगळ्या मुलांना म्हणाली,

"का गं, शिवाणीचं मोलकरीण बनणं तुम्हाला पसंद आहे का?"

विद्यार्थ्यांपैकी एकजण म्हणाली,

"आपण रोशनीला म्हणूया. विचारुन पाहायला काय हरकत आहे. "

तशा त्या शिवाणीजवळ गेल्या. त्यांची हिंमत होत नव्हती. तशी एक मुलगी म्हणाली,

"रोशनी एक शिक्षीका तयार आहे. पण तिचं म्हणणं आहे की तू तिच्याघरी मोलकरणीचं काम करावं. बोल कबूल आहे का?"

रोशनीनं ते सगळं ऐकलं. तशी ती म्हणाली,

"मी तयार आहे. मी शिक्षण घेण्यासाठी मोलकरणीचं काम करायला तयार आहे. " तशी शिवाणी म्हणाली,

"नाही नाही, आपण तिचे मित्र आहोत ना. मग तिला मोलकरीण बनवणं आपल्याला शोभा देईल काय?"

"मग दुसरा उपाय कोणता आहे शिवाणी?" एक मुलगी म्हणाली.

तशी शिवाणी विचार करू लागली. तोच एक मुलगा म्हणाला,

"मी एक उपाय शिकवू का?"

"कोणता?"

"आपण शिकवणी वर्गाला जातो ना आणि समजून घेतो ना. तेव्हा आपण असं करुया. "

तसा तो थांबला. तशी शिवाणी म्हणाली,

"काय करुया?"

"काय करुया म्हणजे. शिकवूया आपण रोशनीला. "

"जमेल आपल्याला शिकवणं. "

"का जमणार नाही. त्यात आपलाच फायदा आहे. "

"कोणता?"

"कोणता म्हणजे. आपला अभ्यास नाही का होणार तिला शिकवितांना. "

"होय, तुझंही म्हणणं बरोबर आहे. पण यात रोशनीला मेहनत घ्यावं लागेल. जे समजत नाही. ते शोधावं लागेल. विचारावं लागेल. लाज बाळगायला नको तिनं. "

"हो, हे बरोबर आहे. तसं पाहता ते उदाहरण तिला समजून देतांना सर्वांचाच अभ्यास नक्कीच होईल. कारण तो भाग ज्याला येईल, त्यानं शिवाणीलाच नाही तर सर्वांना समजावून सांगायचा. "

"ठीक आहे तर आता रोशनीला विचारा. रोशनी तयार आहे का ते. "

तशी शिवाणी रोशनीला म्हणाली,

"रोशनी तू तयार आहेस का मेहनत घ्यायला. "

रोशनी ते सगळं ऐकत होती. तिला ऐकून भरुन आलं. तसे तिला अश्रू आले. तिला वाटलं की ही मुलं किती चांगली स्वभावाची आहेत की जी माझ्यासाठी एवढी मेहनत घेत आहेत. असा विचार करुन तिला अश्रू येत होते. तसे तिनं डोळे पुसले. तशी ती म्हणाली,

"मी तयार आहे मेहनत घ्यायला. "

तसं शिवाणीनं तिचं रडणं टिपलं. तशी ती रोशनीला हिंमत देत होती. तशी शिवाणी म्हणाली,

"आता काय झालं रोशनी रडायला. रडून काय मिळणार. "

"तसं नाही गं. मला यासाठी रड आलं की तुम्ही माझ्यासाठी किती किती करताय. ते पाहून रडू आलं. "

"आता fine हो. "

"Ok, I am fine. "

"ओके. "

मुलं रोशनीला त्या दिवसापासून शिकवीत होते. त्याचप्रमाणे ते इतरांनाही शिकवीत होते.

रोशनी शिकत असतांना इतर मुलंही लिहिणं शिकत होती. तिला आता शिकवणीची गरज राहिली नव्हती. ती तिची आवश्यक गरज झाली होती.

रोशनी आता मेहनतही घेत होती. मेहनत करीत होती. ती मन लावून अभ्यास करीत होती. तसं पाहता त्या फुटपाथवर रोशनी आपलं जीवन उज्वल करीत होती. अशातच बारावीची परीक्षा आली होती.

अशातच ती बारावीची परीक्षा रोशनीनं दिली. तशी ती पासही झाली. त्यात रोशनीला दहावीसारखे गुण मिळाले नाही. ती मेरीट आली नाही. तसं पाहता कोणीतरी म्हणालं की रोशनी तू आता पुढं शिकण्याबरोबरच एखाद्या सरकारी जाबचा फार्मही भरीत जा. तुला नोकरी लागणं गरजेचं आहे. आधी नोकरी मग शिकता येईल पुढं.

गरज पुर्ण करण्यासाठी ती पोलिसाचे फार्म भरीत होती. पण तिला नोकरी लागत नव्हती. तशी ती उंच पुरी होती. धिप्पाडंही होती.

रोशनीच्या शरीरयष्टीबरोबर ती लवकरच पोलिसाची परीक्षा पास झाली व लवकरच नोकरीत रुजू झाली.

********************************

अलिकडे शिक्षणाचं महत्व वाढलेलं आहे. लोकं आपआपली मुलं कॉन्व्हेंटमध्ये सर्रासपणे टाकत आहेत. ग्रामीण भागातील मराठी शाळा ओस पडत आहेत. शहरातही हाच परिणाम दिसत आहे. आता गाव गाव राहिलेलं नाही. शहरच झालेलं आहे.

काही ठिकाणी हा परिणाम नक्कीच दिसत आहे. परंतू काही काही समाजात आजही अशा शिक्षणाचं महत्व दिसत नाही. शिक्षणाला जरी महत्व आलेलं असलं तरी. आजही काही जाती अशा आहेत की जे जास्त शिकतच नाहीत.

या जाती कोणत्या? असा जर कोणी प्रश्न केला तर विशेषतः त्यात चांभार, मांग, खाटीक, लोधी, कुंभार, गोंड, गोवारी, उडीया, मुस्लिम इत्यादी बऱ्याच जातीचा समावेश आहे. या जातीसमुदायात काही लोक जरी शिकत असले तरी काही मंडळी

बरीच मागे आहेत. ती मुले तर शिकतात. पण काही मुलं प्रार्थमिक शिक्षण पुर्ण करण्याआधीच शाळा सोडून मोकळे होतात. त्यांना शिक्षणाचं महत्व वाटत नाही. त्यांच्या पालकांनाही नाही.

आज मुलं निदान चवथीपर्यंत शिकतात तरी. पण कालची परिस्थिती पाहिली तर बऱ्याच पालकांची मुलं शिकत नव्हती. कारण शिक्षणाला बंदी होती. जातीजातीतील भेदभाव व अस्पृश्यता शिक्षणाच्या आड येत होती. त्यामुळं एक बाबासाहेब जर सोडले तर बाकी अस्पृश्य समाजातील कोणीही शिकलेलं नाही. बाबासाहेब शिकले त्याचं कारण रामजी. रामजी हे सैन्यात सुभेदार होते. ते काही वर्ग शिकल्यानं तसेच इंग्रज सरकारकडे नोकरीला असल्यानं तिथे होणारा वार्तालाप, त्या इंग्रजांचे अशिक्षीत व सुशिक्षीत लोकांसोबतचे वागणे त्यांनी अनुभवले होते. त्यामुळं साहजिकच त्यांनी ते अस्पृश्य जरी असले तरी त्यांनी बाबासाहेबांची बुद्धीमत्ता हेरली व त्यांनी त्यांना शिकवलं. त्यासाठी त्यांचे लाड पुरवले. बाबासाहेब एवढे शिकले की साहजिकच त्यांचं महत्व वाढलं व त्यांना जो तो मानसन्मान देवू लागला. हे सर्व शिक्षणानं घडवलं.

आज एकटा बौद्ध समाज डॉक्टर बाबासाहेबांचा आदर्श मनात ठेवून शिकत आहे. शिक्षणाच्या सर्वोच्च कक्षा पार करीत

आहे. क्या अच्छा समाजात कितीही गरीब व्यक्ती असला की तोही शिकवतो. तेही कितीतरी जास्त. कारण डॉक्टर बाबासाहेबांनी सांगीतलं की शिक्षण वाघिणीचं दूध आहे. ते याच समाजाला चांगलं पटलं आहे.

एकटा बौद्ध समाज शिकत असला आणि पुढे जात असला तरी इतर समाज आणि जातीत आज शिक्षणाची गंगा उलटी वाहात आहे. त्यांना अजुनही शिक्षण म्हणजे काय?हेच समजलेलं दिसत नाही. डॉक्टर बाबासाहेबांनी म्हटलं होतं की धंदे सोडा, शिक्षण शिका. पण आज बौद्ध सोडून इतर जातीतील काही लोकं आपले धंदे सोडायला तयार नाहीत. तीच मंडळी आज मागे आहेत. मागे राहिलेली आहेत. आजही चर्मकार मंडळी न शिकता जोडे चपलाची कामं करतात. मांग मंडळी न शिकता वाजा वाजविण्याची कामं करतात. कुंभार लोकं न शिकता कुंभारकाम करतात. गोंड, गोवारी आजही चारं बोरं विकतात. तसेच आपल्या पुर्वजांनी जे शिक्षणाचं महत्व ओळखलं नाही. ते यांनाही दिसत नाही. एवढंच नाही तर ही मंडळी जे दोनचार लोकं शिकवतात आपल्या मुलांना. त्यांनाही शिकू देत नाहीत. उलट सांगतात की तुमच्या मुलांना नोकरी लागेल का? हेच ऐकून बाकीची मंडळींनी शिक्षण शिकवायला धजत नाहीत.

ज्यावेळी देश स्वतंत्र्य झाला. त्यानंतर काही जाती नक्कीच सुधरल्या. त्यात तेली जातीचा समावेश करता येईल. डॉक्टर बाबासाहेबांनी ज्यावेळी धंदे सोडा म्हटलं. तेव्हा या जातीनं तो परिणाम आपल्या मनावर केंद्रीत करुन आपला धंदा सोडला. त्याच्या कुटूंबातील सर्वच व्यक्ती हे शिकले. ती जात आजही विकासाच्या क्षेत्रात पुढे आहे. आज कोणत्याच तेली समाजातला माणूस तेल काढण्याचे काम करीत नाही. तसेच दुसरा समाज म्हणजे कोष्टी. ह्याही समाजानं आपला धंदा सोडला. आज तोही समाज कितीतरी पुढेच दिसतो आहे.

शिक्षणाचं महत्व वाढावं. प्रत्येक समाजातील माणूस शिकावा. त्याचा स्वतःचा विकास व्हावा. त्याचबरोबर त्याच्या समाजाचाही विकास व्हावा. यासाठी प्रत्येकानं शिक्षणाला महत्व द्यावं. शिक्षण शिकावं. चवथीपर्यंतच नाही तर पुढेही. त्याशिवाय शिक्षणाला महत्व प्राप्त होणार नाही.

अलिकडे शिक्षणाचं महत्व वाढलं असलं तरी शिक्षणाला दुरावस्थाही आलेली आहे. एकीकडं काही लोकं शिकत आहेत. तर दुसरीकडे काही लोकं अजिबात शिकत नाहीत. त्यातच काही असे समाज घटक आहेत की जे दारु पीतात. तसेच इतरही अनेक व्यसनं करतात. त्याचप्रमाणे पीढीजात असलेले धंदेही करतात.

शिक्षणाचं महत्व वाढावं म्हणून डॉक्टर बाबासाहेबांनी शिक्षणाच्या व्याख्या केल्या. स्वतः शिकले. तसेच शिक्षणासाठी त्यांनी संविधानात तरतूद केली. त्यानुसार कितीही गरीब असला, मागास असला तरी तो शिकला पाहिजे म्हणून प्रार्थमिक शिक्षण निःशुल्क केलं गेलं. त्याही पुढं त्या मुलांनी शिकावं यासाठी त्याला शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था केली. तरीही आज परिस्थिती पाहता असे वाटते की अजूनही समाज बराच मागे आहे.

शिक्षणाचं महत्व वाढावं यासाठी बरंच काही करता येवू शकते. त्यातील पहिला मुद्दा म्हणजे मतदान.

१) मतदान करणारा व्यक्ती हा काही शिकलेला नसतो. सर्वांना मतदानाचा अधिकार आहे. तसेच निवडणुकीलाही उभं राहण्याचा अधिकार हा कोणालाही आहे. केवळ शिकलाच पाहिजे असे नाही. तेव्हा पहिला नियम हा बनवायला हवा. तो म्हणजे निवडणूकीत निवडणूकीला उभे राहण्याचा अधिकार हा उच्चशिक्षीत माणसालाच असावा. तो कमी शिकलेला नसावा. त्यानुसार आपोआपच शिक्षणाचं महत्व वाढेल. तसेच ज्याला ज्याला निवडणूकीत उभं राहायचं आहे. तो प्रत्येकजण शिक्षण घेईल.

२) नोकरीत नियम बनवावेत. तसेच सुलभता द्यावी लागेल.

अ) त्या नियमात कोणत्याही सरकारी नोकऱ्या ह्या विनामुल्य अर्थात पैशानं विकत मिळणाऱ्या नसाव्या.

आज आपण पाहतो की कोणतीही सरकारी नोकरी ही विनापैशानं मिळत नाही. तसेच त्यासाठी वशिलाही लागतो. तसेच जो उमेदवार असा काळा पैसा देवून नोकरीला लागतो. त्या काळया पैशाची नोंदही नसते.

आ) बेरोजगारी दूर करण्यासाठी सरकारनं विशेष पावलं टाकून उद्योगधंदे उघडावेत आणि ते उद्योगधंदे सरकारनं आपल्या मालकीचे ठेवावेत.

इ)सरकारी नोकरीमध्ये नियम बनवितांना जे जास्त शिकलेले आहेत. त्यांनाच प्राधान्यता द्यावी अर्थात नोकऱ्या द्याव्यात. जेणेकरुन नोकरीच्या लालसेनं तरी लोकं उच्च शिक्षण घेतील.

३) जे शिकलेले नसतील त्यांना कोणत्याच योजना देवू नये. तसेच त्या योजनांचा लाभही देवू नये. जेणेकरुन योजना मिळत नाही. म्हणून तरी लोकं शिक्षण घेवू शकतील.

४) शिक्षणाचं महत्व वाढावं यासाठी कर्ज सुविधा देतांनाही शिक्षणाचा विचार व्हावा. जे कमी शिकलेले आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे कर्ज पुरवठे करु नये.

५) शिक्षणाचे महत्व वाढावे यासाठी शिक्षणात सुलभता आणावी.

अ) कमीतकमी बारावीपर्यंतचे तरी शिक्षण घेतांना सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या द्याव्यात. त्या रकमांचा अपहार होवू नये म्हणून त्या रकमा थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात गोळा व्हाव्यात. कारण काही ठिकाणी शाळेचे प्रशासकही या विद्यार्थ्यांच्या पैशावर डोळे टाकतात. हाही पैसा विद्यार्थ्यांच्या हजेरीच्या स्वरुपात द्यावा. जेणेकरुन विद्यार्थी शाळेत शिकायला येतील.

आ) शिक्षणाचं महत्व वाढावं यासाठी बारावीपर्यंतच नाही तर पुढचं शिक्षणंही निःशुल्क असावं. जेणेकरुन व्हि आय पी संस्कृती निर्माण होणार नाही. कोणालाही उच्च शिक्षण घेता येवू शकेल. कोणीही इच्छानुसार डॉक्टर, इंजीनियर बनू शकतील.

इ)काही लोकांची परिस्थीतीच शिक्षण घ्यायची नसते. कारण त्यांचं पोट महत्वाचं असतं. ते पोट भरावं म्हणून विद्यार्थ्यांच्या खात्यात हजेरीनुसार पैसा टाकावा. जेणेकरुन विद्यार्थी शाळेत येईल किंवा पालक पैशाच्या लालसेनं तरी शाळेत पाठवतील.

ई)खिचडीची व्यवस्था बंद करावी. कारण आता जी मुलांना खिचडी मिळते. त्या मिळणाऱ्या खिचडीच्या तांदळाचा अपहार करुन काही संचालक ते तांदूळ किराणा दुकानात विकतात. काही

त्यासाठी येणाऱ्या डाळी, तेलमीठ सारखे जीनसही विकतात. तर काही जेवढा तांदूळ मुलांसाठी येतो. तेवढ्या तांदळाची खिचडी न बनवता कमी तांदळाची खिचडी बनवून तो तांदूळ परस्पर विकून संचालक मंडळी गब्बर बनतात. त्यामुळं हाच पैसा खिचडीसाठी खर्च न करता त्याचा थेट लाभ पैशाच्या स्वरुपात विद्यार्थ्यांच्या नावाने खाते काढून त्यांना द्यावा. हाही लाभ विद्यार्थ्यांच्या हजेरीनुसारच असावा.

६) शिक्षणाचं महत्व वाढावं यासाठी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे भ्रष्टाचार दूर करणे. जो भ्रष्टाचार नोकरी मिळवितांना आहे. शाळेत आहे. योजनेची माहिती मिळवितांना आहे. योजनांचा लाभ मिळवितांना आहे. तो भ्रष्टाचार दूर करणे ही देखील शिक्षणाचं महत्व वाढविणारी पर्यायी गोष्ट आहे.

७)शिक्षणात रंजकता आणावी.

अ) शिक्षणाची प्रक्रिया ही आनंददायी व्हावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांना आनंद वाटेल व तो उच्च शिक्षण घेवू शकेल.

आ)शिक्षण शिकविणाऱ्या शिक्षकांना अभय द्यावं. जेणेकरुन तो शिकविण्याचे कार्य आनंददायी पद्धतीनं करु शकतील.

इ) शिक्षकांना अशैक्षणिक कामे देवू नये. जेणेकरुन तो थकणार नाही व तसेच तो शिक्षण एके शिक्षण हेच ध्येय ठेवून विद्यार्थ्यांना रंजकतेने शिकवू शकेल.

महत्वाचं म्हणजे शिक्षण वाघिणीचं दूध आहे. पण ज्या ठिकाणी शिक्षणाची पहिली पायरी असते. त्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या काही शाळा ह्या जरी अनुदानीत असल्या तरी त्या शाळेवर मालकी हक्क हे सरकारचे नाहीत. त्यावर अधिकारी म्हणून एक खाजगी व्यक्ती असतो. त्याला संचालक म्हणतात. हा संचालक आपल्या एकदम जवळच्या नातेवाईकांची नियुक्ती ही मुख्याध्यापक पदावर करतात. हा मुख्याध्यापक चांगल्या शिक्षकांना त्रास देतो. एवढेच नाही तर हा संचालक पैसे कमविण्यासाठी कोणत्याही थराला जात असतो. तो विद्यार्थ्यांच्या पोटासाठी येणारा शालेय पोषण आहार, इमारती साठी येणारा बांधकाम फंड, विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी येणारा सरकारी पैसा अर्थात शिष्यवृत्ती, विद्यार्थ्यांच्या सांस्कृतीक विकासासाठी येणारा सांस्कृतीक नीधी पूर्णतः आपल्या घशात टाकतो. आज शिक्षणक्षेत्र पाहता या शिक्षणक्षेत्रात बहुतःश संचालक व मुख्याध्यापक गब्बर झालेले आहेत. त्यांनी शाळा ह्या विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उघडल्या की स्वतःचा विकास करण्यासाठी तेच कळेनासं झालं आहे.

विशेषतः आपल्याकडे बुद्धीमत्ता आहे. कौशल्यही आहे. पण पूरक वातावरण नाही. हेच पूरक वातावरण नसल्यानं शिक्षणाचं महत्व कमी होत आहे. काही लोकं जर सोडले तर आजही बरेच लोकं साधं प्राथमिक शिक्षणही पूर्ण करीत नाहीत. उच्च शिक्षण तर दूरच.

शिक्षणाचं महत्व वाढावं यासाठी वरालप्रमाणे महत्वाच्या बाबी जरी असल्या तरी सर्वात महत्वाची बाब म्हणजे शिक्षण हे देशात निःशुल्कच असावं. मग ते कोणत्याही पदवीचं का असेना. त्यावर कोणाची मक्तेदारी नसावी. कोणाला शुल्क भरावं लागू नये. तरंच शिक्षणाचं महत्व वाढेल. त्याशिवाय शिक्षणाचं महत्व वाढणार नाही.

आज आपण पाहातो आहोत की शिक्षण हे निःशुल्क नाही. त्यासाठी पैसा मोजावा लागत आहे. याचं कारण म्हणजे चांगलं शिक्षण मिळविण्याची कास.

आज कॉन्व्हेंटचं प्रस्थ वाढलेलं आहे. त्या कॉन्व्हेंटनुसार विद्यार्थी पालक अगदी लहानग्या वयापासूनच विद्यार्थ्यांना शाळेत टाकत आहेत. एवढंच नाही तर शाळेवाले पालकांना 'तुम्ही फक्त जन्म द्या. आम्ही सगळं पाहू असं म्हणत जन्मापासूनच शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. अगदी लहानपणी पाळणाघरापासून तर पुढे

पुर्ण शिक्षण होईपर्यंत मुलं सतत शाळेच्या संपर्कातच असतात. त्यासाठी पालक फक्त पैसा मोजत आहेत. तोही अतोनात.

मुलगा शाळेत जातो. त्यानंतर तो घरी येतो. घरी आल्यावर हातपाय धुतल्याबरोबर पुन्हा तो शाळेत जातो. त्यानंतर घरी आल्यावर जेवन करतो. दिवसभराचा थकून आल्यावर जेवन करताच झोपतो. परत सकाळी उठून शाळेच्या तयारीला लागतो. त्याला खेळायलाही पुरेशी सवड मिळत नाही. निव्वळ विद्यार्थ्यांच्या जीवाचा खेळ. पालकांनाही त्याच्या जीवाचं काही घेणं देणं नाही.

शिक्षणासाठी लागणारा हा पैसा, पालक आपल्या मुलाची शाळेतील फी तर भरतातच. व्यतिरीक्त ट्रयुशनचीही फी भरतात. ही ट्रयुशनचीही फी लाखोच्या घरात असते. त्यानंतर बारावी पास होताच पुढं डॉक्टर, इंजीनियर, वकील, शिक्षक, प्राध्यापक बनवायलाही लाखो रुपये मोजले जातात. त्यातच तो पुढं ते कोर्स करुन तो पेशेदार बनलाच तर त्याला तो धंदा सुरु करायलाही पैसा मोजावा लागतो. उदा. तो जर डॉक्टर बनला तर त्याला दवाखाना टाकण्यासाठी पैसे मोजावे लागतात. तो शिक्षक, प्राध्यापक बनला तर नोकरी लावण्यासाठी लाखो रुपये मोजावे लागतात. तो जर

वकील बनला तर वकीलकीचा सराव करण्यासाठी पैसा मोजावा लागतो. सर्वच ठिकाणी पैसाच चालतो.

शिक्षणाची ही पैशाची गंगा. या गंगेत सर्वचजण पोहत असतात. सर्वच पट्टीचे पोहणारे असतात. पण ज्यांच्याजवळ जास्त पैसा. तो पोहू शकतो आणि ज्यांच्याजवळ पैसेच नसतात. तो मात्र या गंगेत पोहू शकत नाही. तो बुडतो.

शिक्षणाला सतत पैसा लागतो. या ना त्या कारणानं. शिक्षण हे निःशुल्क नाही. शिक्षणात भेदभाव आहे. आजचं शिक्षण हे केवळ श्रीमंतांचं शिक्षण बनलं आहे. शिक्षणाला धनिकांनी आपल्या हातचे कळसुत्री बाहूले बनवले आहे. जे शिक्षण त्यांनी म्हटल्यानुसार कळसुत्री बाहूल्यांसारखं नाचतं.

शिक्षण हे निःशुल्क असायला हवं. याचं कारण म्हणजे विद्यार्थ्यात असलेल्या महत्वाकांक्षा. केवळ श्रीमतांचीच मुलं हुशार असतात असे नाही. तर गरीबांचीही मुलं त्यामानानं अधिक हुशार असतात. पण शिक्षण निःशुल्क नसल्यानं ती मुलं शिकू शकत नाही किंवा उच्च शिक्षण घेवू शकत नाहीत.

गरीबांच्याही मुलांना वाटत असते की आपणही डॉक्टर इंजीनियर बनावं. पण कसे बनणार. कारण शिक्षण हे निःशुल्क नाही. आजच्या या शिक्षणाची अवस्था पाहून असं वाटतं की

शिक्षण हे गरीबांसाठी नाही तर हे शिक्षण धनिकांसाठी आहे. त्यामुळं गरीबांनी केवळ कामापुरतं शिकून आपल्या कामधंद्यामध्ये पडावं. काबाडकष्ट करावेत. नोकरीच्या किंवा मोठ्या पदावर जाण्याची स्वप्न पाहू नयेत. हं माहित आहे की शिक्षण हे मानसन्मान वाढवतं. पैसाही आणि रोजगारही मिळवून देतं. पण आजचं हेच शिक्षण मिळविण्यासाठी पैसाही मोजावा लागतो ना.

शिक्षणाबाबत तत्ववेत्ते निरनिराळ्या व्याख्या करुन सांगतात तसेच सरकारही सांगते की शिक्षण शिका. शिक्षणानं आत्मीक विकास होतो. शिक्षणानं माणूस गुरगुरतो. शिक्षणानं विचार शक्ती वाढते. विचार करण्याची ताकद वाढते. परंतू या सर्व निष्फळ आणि निरर्थक गोष्टी वाटतात. त्या तशा वाटणे साहजीकच आहेत. कारण आजचं उच्च शिक्षण हे गरीबांना घेताच येत नाही. मग विचार करण्याची शक्ती वाढेल कुठून?

महत्वाचं म्हणजे शिक्षण कोणालाही घेता यावं. ते निःशुल्क असावं. सध्या सुरु असलेलं कॉन्व्हेंटचं प्रस्थ कमी व्हावं. शिक्षणातील ही असलेली अमीर व गरीबांची दरी कमी व्हावी. शिक्षण सर्वांना मिळायला पाहिजे. मग ते गरीब असो की श्रीमंत. शिक्षणासाठी आरक्षणाच्या व शिष्यवृत्तीच्या बुगड्या नसाव्यात. समाधानाची एक फाटकी चादर तीही शिक्षणासाठी पुरेशी आहे.

रोशनी नोकरीत रुजू झाली होती. त्याचबरोबर तिला राहायला कमराही मिळाला. तिचं जीवन सुखी झालं होतं. त्याचबरोबर तिनं आपल्या भावांनाही आपल्याजवळ आणलं.

सतिशचे दिवस पालटले होते. एवढ्या दिवसापासून तो बहिणीसाठी कष्ट करीत होता. नव्हे तर मायबाप मरण पावल्यावर आपल्या बहिण भावाला सांभाळत होता. त्यानं प्रसंगी भीक्षा मागून आपल्या बहिणीला शिकवले होते. आज त्याला आपल्या बहिणीचा अभिमान वाटत होता.

रोशनीनं कधी पैसा पाहिला नव्हता. ती हुशार होती. पण पैसा न पाहिल्यानं तिला पैशाचं जास्त महत्व वाटत होतं. त्यातच पोलिसांची नोकरी. तिला या नोकरीत अतिरीक्त पैसा कमवायला जागा होती.

सतिश जरी बहिणीकडे राहायला आला असला तरी त्यानं काम करणं बंद केलं नव्हतं. तो आजही त्या खानावळीत काम करीत होता. तसाच तो आपल्या भावाला शिकवीत होता. रोशनी त्याला काम करु नये असं सांगत होती. तिला आता त्याचे काम करणे आवडत नव्हते.

रोशनी पोलिसाची नोकरी करता करता शिकतच होती. हळूहळू ती पोलिस अधिकारी बनली. तसा ती जास्त पैसा कमवू लागली.

रोशनी पैसा कमवू लागली खरी. पण तो तसा पैसा कमवणं सतिशला आवडत नव्हतं. त्याचे व तिचे आता खटके उडत असत. त्यातच रोशनीला वाटत असे की सतिशनं काम सोडावं. त्याचं ते काम तिच्या पेशाला शोभत नव्हतं.

एकदा रोशनीचं असंच तिच्याशी भांडण झालं भांडण एका शुल्लक कारणावरुन झालं होतं. विषय लहानसा होता. पण रोशनीही काही केल्या ऐकत नव्हती. त्यातच रोशनीनं एवढं भांडण केलं की त्याच रागात सतिशनं घर सोडलं. त्याच्या मनात आता राग धुमसत होता.

सतिशनं रोशनीचं घर सोडलं खरं. पण तिला त्याचं काहीच वाटलं नाही. काहीच वाटतही नव्हतं. तो मात्र घर नसल्यानं रोशनला घेवून फुटपाथवर राहात होता.

सतिश फुटपाथवर राहायला आला खरा. पण रोशनीनं त्याचेशी संबंध तोडले होते. तिला वाटत होतं की कदाचित तिनं सतिशशी संबंध ठेवले तर तिची इज्जत जाईल. त्यामुळच ती रोशनी सतिशशी बोलेनाशी झाली होती. नव्हे तर तिला अजूनही

वाटत होतं की त्यानं पश्चाताप करुन आपल्या घरी परत यावं. पण सतिशही स्वाभीमानी होता. तो कसा येणार तिच्या जवळ राहायला.

रोशनी पोलिस अधिकारी बनून त्या शहराचा कारभार पाहात होती. त्यानं आपल्याजवळ राहायला यावं म्हणून तिनं एक मोहीम राबवली. त्यात तिचे तीन हेतू होते. एक म्हणजे शहरातील भिखारी संपावेत, दुसरं म्हणजे ह्या भिखा-यांनी स्वाभीमानानं जगावं आणि तिसरा हेतू होता. तो म्हणजे आपले भाऊ परत आणणं.

मोहीम अशी होती. ती म्हणजे या शहरातील भिखारी पकडावेत व त्या भिखा-यांना कोण्यातरी आश्रमात टाकून त्यांना मेहनतीच्या कामाला लावावे. त्यासाठी तिच्या आदेशानं पोलिसांचं धरपकड सत्र सुरु झालं.

पोलिसाचं धरपकड सत्र सुरु झालं होतं. शहरातील बहुतःश भिखारी पकडले गेले होते. त्यामुळं काल जी संख्या फुटपाथवर दिसत होती. ती संख्या आज दिसत नव्हती. मात्र आताही रोशन व सतिश त्याच फुटपाथवर राहात होते. ते दिवसभर गायब राहायचे व रात्रीला झोपण्यापुरते यायचे.

सतिशला पाहिजे तेवढं वेतन मिळत नव्हतं. त्याला रोशनी बेईमान झाल्यासारखी वाटत होती. रोशनी सतिशला आवडत

नव्हती. मात्र रोशनीला सतिश आवडत होता. तो तिच्यापासून दूर जरी असला तरी तिला वाटत होतं की त्यानं तिला शिकवलं. मायबाप नसल्यावरही त्यानं तिला मायबापाची छाव दिली. घासातून घास भरवला व लहानाचं मोठं केलं.

रोशनीनं काढलेलं फर्मान. त्यातच पोलिसांचं धरपकड सत्र. त्यात रोशनीला आपल्या भावाची होत असलेली ससेहोलपट दिसत नव्हती. तिचं वागणं सतिशला एखाद्या शैतानासारखं वाटत होतं.

पोलिसांची धरपकड सुरु झाली. तेव्हा रोशन शालान्तला होता. तो दिवसभर शाळेत जायचा व रात्री बऱ्याच उशीरा घरी यायचा. तो तसा सकाळीच बाहेर पडायचा. क्लासला जायचा. तसाच सतिशही दिवसा लवकरच कामाला जात असे. तोही रात्री उशीराच घरी परतत असे.

शालान्त परीक्षेचं ते सत्र. रोशन बहिणीसारखीच मेहनत घेत होता. त्याला आपला भाऊ आठवत होता. आपली बहिणही आठवत होती. बहिणीशी आपल्या भावाचं का पटत नाही हेही त्याला माहित होतं. तोही आपल्या बहिणीला शिव्याच देत होता. कारण तोही आता समंजस झाला होता. त्यालाही समजत होतं. तसं पाहता ही धरपकड जरी तिच्या आदेशानं होत असली तरी तेवढं

त्यांना समजत नसल्यानं ते पोलिसांना दोष देत असले तरी बहिणीला काही म्हणत नव्हते.

त्यांना बहिणीबद्दल वाईट वाटत होतं. त्यातच शालान्तच्या त्या वर्षात बहिण जरी चांगली असली तरी पोलिसांच्या धरपकडपणामुळं त्याचा अभ्यास होत नव्हता. त्यातच त्याची शालान्त परीक्षा झाली. त्यातच त्याला कमी गुण पडले.

त्यानं आता अकरावीला प्रवेश घेतला होता. परंतू आताही धरपकड सत्र बंद झालेलं नव्हतं. त्यातच एक दिवस रात्री एक पोलिसांची गाडी आली व त्यांना घेवून ती गाडी निघून गेली.

ती गाडी आता अशा ठिकाणी गेली होती. ज्या ठिकाणी सर्व भिखारी होते. त्या ठिकाणी कारागृहासारखं वातावरण होतं.

ते कारागृह नव्हतं. पण ते सुधारगृह होतं. भीक्षा मागणाऱ्या लोकांचं पुनर्वसन करणारं ते एक आश्रम होतं. त्या आश्रमातून भिखारी लोकांना आत्मनिर्भर करण्याचं प्रशिक्षण दिलं जात होतं.

होतकरु रोशन व होतकरु सतिश, जरी ते दोघंही भाऊ फुटपाथवर राहात असले तरी त्यांना ते भीक्षा मागत नव्हते. त्यांना भीक्षा मागणं आवडत नव्हतं. त्यातच ती होतकरु मुलं. सतिश खानावळीत काम करायचा तर रोशन कॉलेज शिकायचा. पण राहायला सोय नसल्यानं ते फुटपाथवर राहात असत. शिक्षणाचं

महत्व वाटत असल्यानं सतिश जरी शिकला नसला तरी त्यानं रोशनीला शिकवलं होतं. आता रोशनलाही शिकवीत होता. त्याला वाटत होतं की शिक्षणानं माणसं स्वार्थी बनतात. हे स्वार्थपण त्याला रोशनीवरुन दिसून येत होतं. मात्र रोशनीनं त्याला दगा दिला नव्हता ही सत्य गोष्ट होती.

ते शहर........ त्या शहरात जागेच्या किमती गगणाला भिडलेल्या होत्या. त्यामुळं त्या शहरात सतिशच्या तुटपूंज्या पैशानं जागा तसेच घर घेता येत नव्हतं. म्हणून तो फुटपाथवर राहात होता. ज्या फुटपाथवर त्यांनी राहू नये, म्हणून रोशनीनं धरपकड सत्र सुरु केलं होतं.

ते आश्रम. भिखारी लोकांमध्ये सुधारणा करता यावी. तसेच ते आत्मनिर्भर बनावे, म्हणून उघडलेलं आश्रम. या आश्रमात सतिश व रोशनची कुचंबना होत होती. ते दोघेही जण आत्मनिर्भरतेचे धडे तर शिकत होते. परंतू त्याचबरोबर ते दोघंही पोलिसांना कोसत होते. कारण त्या पोलिसांनी या स्थळी पकडून आणल्यामुळंच रोशनचं नुकसान झालं होतं. त्याला अकरावी, बारावी करता आली नव्हती.

दोन वर्ष आश्रमात ठेवल्यानंतर व त्या सर्वांना आत्मनिर्भर केल्यानंतर जिल्हाधिकारी साहेबानं पोलिस अधिकाऱ्याच्या

सहकार्यानं त्या भिका-यांना एक हक्काची जागा दिली गेली. त्या जागेवर त्यांचं पुनर्वसन केलं गेलं. या जागेला भिकारी निवास असं नाव देण्यात आलं. आता शहरात भिकारी दिसत नव्हते. तर त्यांची एक वसाहत निर्माण झाली होती. ज्या वसाहतीतून उत्पन्न झालेला माल हा सरकारच विकत घेत असे.

इतर भिका-यांप्रमाणे सतिशही असा माल तयार करु लागला. सरकारची माणसंच कच्चा माल आणून देत असत आणि सतिश व फावल्या वेळात रोशनही भावाला सहकार्य करीत असे. तसं पाहता दोन वर्ष रोशनच्या शिक्षणाचं नुकसान झालं होतं. ते नुकसान कधीच भरुन निघणारं नव्हतं. शिक्षणाचं दोन वर्ष नुकसान झालेलं असलं तरी आणि ते नुकसान कधी भरुन निघणारं नसलं तरी आता सतिशनं परत रोशनला शिकवायचं ठरवलं. त्यानं महाविद्यालयाशी संपर्क साधला व परत थेट बारावीला प्रवेश घेतला गेला. रोशन तसा पुन्हा महाविद्यालयात जावू लागला. त्याला शिकविण्यासाठी सतिश सर्वतोपरी मदत करु लागला.

सतिश रोशनला शिकवीत होता. त्यातच त्याची महत्वाकांक्षाही वाढवत होता. सतीश रोशनला रोशनीच्या बाणीवर शिकवीत होता. अशातच तो बारावीची परीक्षा पास झाला. तरीही

तो पुढे शिकतच राहिला. अशातच त्याचं महाविद्यालयातील एका तरुणीवर प्रेम निर्माण झालं.

ती महाविद्यालयातील तरुणी. रोशन दिसायला सुंदर असल्यानं त्याच्यावर मोहित झाली होती. ती तरुणी त्याच्याबद्दल जाणून न घेता प्रेमात पडली होती. तो कसाही असेल, पण तिनं त्याची साधी चौकशी केली नाही. त्यातच त्यालाही ती आवडायला लागली होती.

तिचं नाव भक्ती होतं. नावाप्रमाणेच भक्ती भक्तीवान होती. ती धार्मीक प्रवृत्तीची होती.

भक्ती पाहायलाही सुंदर होती. साजेसा चेहरा आणि त्या चेहऱ्यावर तजेलदारपणा होता. तिच्या चेहऱ्यावरच्या तजेलदारपणामुळे ती रोशनला आवडत होती. राहणी अगदी साधीभोळी असून महाविद्यालयातही ती साध्याच वेषात येत होती.

रोशनचं ते प्रेमप्रकरण. पण ते भावालाही माहित नव्हतं. भावानं आपल्याला शिकवलं. लहानाचं मोठं केलं. तो भाऊ आपल्याला मायबापापेक्षाही मोठा असून त्या भावाचं न ऐकल्यास आपण आपल्याच पायावर धोंडा मारुन घेवू असं त्याला वाटत होतं.

ते प्रेमप्रकरण त्याचं जोरात सुरु होतं. बागेत लपूनलपून भेटणंही जोरात सुरु होतं. अभ्यासाकडं लक्ष देणं मात्र बंद झालं होतं. त्यातच ती बारावी......... ती बारावीची परीक्षा तो चक्क नापास झाला.

ती बारावीची परीक्षा नापास होणं. ती बारावी परीक्षा नापास होताच सतिशला संताप आला. त्याला फार वाईट वाटलं. त्याला भावाला क्षणभर शिकवावंसही वाटलं नाही. त्यातच रोशनलाही वाईट वाटलं.

आपला भाऊ शिकावा. आपली बहिण शिकावी म्हणून सतिशनं त्यांना शिकवलं. लहानाचं मोठं केलं. पण रोशनचा हा प्रेमामुळं शिक्षणानं केलेला पराभव त्याला सहन झाला नाही. त्यातच तो विचार करु लागला की रोशनला रागवावे की रागवू नये.

सतिश विचार करु लागला. जर रागवलं तर उद्या रोशनीत आणि आपल्यात काय फरक राहील. रागवल्यास फार फरक पडणार नाही. तो आपल्याला सोडून जावू शकेल. तसं पाहता आपल्याला पोलिसांनी पकडून नेल्यानं रोशनची अभ्यासाची लिंक तुटली असेल. म्हणून तो नापास झाला असेल. परंतू पुन्हा प्रयत्न करायला काय हरकत आहे.

रोशनचं नापासपण. तरीही सतिशनं त्याला पुन्हा परीक्षेचं प्रवेशपत्र भरायला लावलं. रोशननं परीक्षेचं प्रवेशपत्र भरलं.

रोशननं परीक्षेचं प्रवेशपत्र भरलं असलं तरी आता त्याची लिंक लागत नव्हती. त्याच्या मानगुटीवर प्रेमाचं भूत बसलं होतं. हे प्रेमाचं भूत सतिशच्या चाणाक्ष नजरेतून सुटलं नाही. त्याच्या लक्षात आलं की आपला भाऊ कोणाच्या तरी प्रेमात पडला. त्यातच त्याचं नुकसान होत आहे.

सतिशला माहित झालेलं प्रेमप्रकरण. त्यातच तो विचार करु लागला. विचाराअंती त्याला उत्तरही सापडलं. ते त्याचंच शस्त्र. त्याच्याच विरोधात वापरायचं त्यानं ठरवलं. तसं एक दिवस सतिशनं रोशनला बोलावलं. तसा तो त्याला भक्तीबद्दल विचारु लागला.

"कोण ती?"

"म्हणजे?" रोशन म्हणाला.

"म्हणजे. ही भक्ती कोण आहे?"

"भक्ती!" तो आश्चर्यचकीत होत म्हणाला.

"हो भक्तीच म्हटलं मी. "

"आहे एक मुलगी. "

"मुलगी म्हणजे?"

"............. " तो चूप होता.

"हो मुलगी. भक्ती........ मला सगळं माहित हाय. आतं अगदी खरं खरं सांग. "

"रागवणार नसशील तर सांगू भक्तीबद्दल. "

"सांग. "

"भक्ती माझी एक कॉलेजची मैत्रीण आहे. चांगली मैत्रीण आहे. जीवाभावाची मैत्रीण. "

सतिश काय समजायचं ते समजला. तसं त्यानं त्याला बोलण्यापेक्षा तिलाच बोलावं असं ठरवलं. तसा तो म्हणाला,

"मला भक्तीला भेटायचंय. "

"कशासाठी?"

"भक्ती तुझी मैत्रीण आहे ना. मग मी तिला का भेटू नये. खरंच भेटवशील का मला?"

"होय. का भेटवणार नाही. "

"केव्हा भेटवणार?"

"उद्या. उद्या चालेल का?"

"ठीक आहे उद्या. पण नक्की न. "

"बरं. "

आज आनंदानं रोशन उफाळत होता. तो तिला भेटण्यासाठी लगेच रवाना झाला. तशी तिनं आपली इच्छा व्यक्त केली. तसा तो तिला म्हणाला,

"भक्ती तुला दादानं भेटायला बोलवलंय. "

"का बरं?"

"दादाची इच्छा तुला भेटायची आहे. "

"का बरं?"

"मी सांगीतलं दादाला. पण....... "

"पण आता तू एक काम कर. दादाला भेट. "

"पण दादा मला काही म्हणणार तर नाही. "

"नाही, माझा दादा चांगला आहे. प्रेमळ आणि मायाळू आहे. "

"खरंच. "

"हो. तू भेटशील का माझ्या दादाला. "

"का नाही भेटणार. "

"बरं. तर मग ठरलं उद्याचं. नक्कीच भेटायला चलशील माझ्या दादाला. "

दोघांनीही सतिशला भेटायचं ठरवलं. असाच दुसरा दिवस उजळला. तसा रोशन लवकरच उठला. त्यानं झटपट अंघोळ आटोपवली. कसेबसे दोन चार घास पोटात कोंबले. तसा तसा तो भक्तीला आणण्यासाठी जायला निघाला. तोच सतिश म्हणाला,

"रोशन, एवढ्या सकाळी कुठे चाललाय?"

"दादा, तूच सांगीतलं ना भक्तीला आणायला. "

"बरं बरं. भक्तीला आणतोस. "

"होय. "

"बरं बरं. घेवून ये तर भक्तीला. " सतिश बोलला. तसा रोशन भक्तीला आणण्यासाठी रवाना झाला. "

काही वेळ असाच गेला. भक्ती आज सांगीतल्याप्रमाणे तयार झाली होती. तिला घेवून रोशन घरी आला. तशी ती येताच सतिशनं तिला बसवलं. तसा तो बोलता झाला.

"तुच भक्ती काय?"

"होय. "

"रोशनला तू केव्हापासून ओळखते?"

"कॉलेजपासून. "

"मला तुझ्याशी काही बोलायचं आहे. "

"बोला न. "

तसा तो विचार करु लागला. थोड्या वेळानं तो म्हणाला.

"आता नको. मग बोलणार एकट्यात बोलणार. "

तिची उत्सुकता वाढीला लागली. तोच ती म्हणाली,

"एकट्यात म्हणजे?"

"मला म्हणायचं आहे की रोशनच्या पुढं मी तुला काही बोलूच शकत नाही. तो भाऊ आहे ना माझा. "

तसा रोशन म्हणाला.

"दादा, मी जातोय बाहेर. तू काय बोलायचं ते बोल तिच्याशी. "

"ठीक आहे. तू आता बाहेर थांब. "

रोशनला वाटत होतं की त्याचा दादा तिला रोशनबद्दलचा अनुभव विचारेल. पण तो त्याचा भ्रम होता. भावानं म्हटल्यानंतर रोशन बाहेर गेला. तसा सतिश तिच्याशी बोलायला लागला.

"तर तुझं नाव भक्ती. "

"होय दादा. "

"तू रोशनच्या वर्गात आहेस तर. "

"होय दादा. "

"तुला आवडतो रोशन. "

"होय दादा. "

"का आवडतो?"

"........... "

"काय आहे असं त्याच्यात?"

".............. "

तिला गप्प पाहून तो म्हणाला,

"अगं तो नापास झाला बारावीत. अन् अशा नापास मुलासोबत तुला मैत्री करणं आवडतं. "

"............ " ती काहीच बोलली नाही. तसा सतिश परत म्हणाला.

"तूला खरंच आवडते का रोशन?"

तशी ती म्हणाली.

"होय. "

"तर मग एक काम करशील. "

"कोणतं दादा?" ती म्हणाली.

"रोशन तुझं ऐकतो ना. "

"होय. "

"मग तू त्याला सुधरव. त्याला असं सांग की त्याने जर चांगला अभ्यास केला तरच तू त्याची मैत्रीण राहशील. नाहीतर तू त्याच्याशी मैत्री करणार नाही. तू त्याला सोडून जाशील. यानंतर एक फायदा होईल. तो म्हणजे तो अभ्यास करायला लागेल आणि तो बारावी पास होईल. मला सांग तूला वाटते का रोशन बारावी पास व्हावा?"

"होय. "

"मग मी जे सांगीतलं ते करशील?"

".......... " ती विचार करीत होती. तशी ती बोलली नाही. ते पाहून तो पुन्हा म्हणाला.

"मी जे सांगीतलं. ते करशील का विचारलं. "

तशी ती भानावर आली व म्हणाली.

"का नाही करणार. करणारच मी. "

"तू सुधरवशील रोशनला. "

"होय, सुधरवणार रोशनला. मी माझ्या प्रयत्नानं रोशनला पास करुन दाखवणार. "

त्यांचं बोलून झालं होतं. तसा रोशन बाहेरुन घरी आला. तशी ती हसली. तसा रोशन ते संकेत समजला.

****************************************
****

अलिकडे शिक्षणाचं महत्व निर्माण झालं आहे. शिक्षण सर्वांना मिळत आहे. सर्वच मुलं मुली शिकतात. मुलापेक्षा मुली सरस आहेत.

पुर्वी स्रीयांना शिक्षणाची संधी होती असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा ह्या स्रीया शिकल्या. त्या स्रीया पुरुषांप्रमाणे शास्रोक्त करण्याच्या स्पर्धेत भाग घेत. तसेच पुरुषांच्या बरोबरीने रणांगणात जावून युद्धकौशल्य दाखवत असत.

मध्यंतरीचा काळ हा शिक्षणासाठी बरा नव्हता. लोकं शिकत नव्हते असे नाही. पण दलित आणि स्रीयांना शिक्षणाची संधी नव्हती. शिक्षण फक्त उच्चवर्णीयांचे कळसुत्री बाहूले बनले होते.

हे चित्र जेव्हा महात्मा फुलेंनी पाहिले. तेव्हा त्यांनी गरज लक्षात घेवून स्रीयांसाठी पहिली शाळा काढली. त्यात त्यांचीच पत्नी सावित्रीबाई फुले ही शिक्षीका म्हणून शिकवीत होती.

आज शिक्षणात असा उच नीच, स्री पुरुष भेदभाव नाही. सर्वच शिकत आहेत. कालचे अस्पृश्य आणि कालच्या स्रीयांही.

पण असे असले तरी आजच्या शिक्षणात एक नवीनच भेदभाव आलेला आहे. तो भेदभाव म्हणजे गरीबांचं शिक्षण व श्रीमंतांचं शिक्षण. त्यानुसार आज श्रीमंत माणसे कॉन्व्हेंटला जास्त प्राधान्य देत आहेत. तर गरीब जिल्हा परीषदच्या शाळांना. याचमुळं की काय आजच्या शिक्षणाचा उद्देश बदलला आहे.

आज शिक्षणाची जी अवस्था सुरु आहे. त्यानुसार असं वाटत आहे की हे शिक्षण लोकांची सेवा करण्यासाठी आहे की मतलबासाठी. हेच कळेनासे झाले आहे. आजचं शिक्षण हे समाजसेवेसाठी नाही.

शिक्षणाचा मुळ उद्देश हा समाजसेवाच आहे. समाजसेवेबरोबर या शिक्षणानं आपल्या स्वतःचे पोटंही भरावे असा सरळसरळ अर्थ. पण लोकांनी शिक्षणाचा अर्थच बदलवून टाकला. भारत स्वतंत्र्य होण्यापुर्वी जी मंडळी शिकली. ती मंडळी स्वार्थासाठी शिकली नाही. त्यांनी या देशातील ब्रिटीश मंडळी या देशावर राज्य करतांना कोणत्या नियमानं राज्य करतात. त्याचा गांभीर्यानं विचार करण्यासाठी त्यांनी शिक्षण घेतलं. त्यांनी हे शिक्षण घेतल्यावर त्याचा वापर या देशातील पारतंत्र्य दूर करण्यासाठी केला. या शिक्षणाबरोबरच त्यांनी समाजसेवाही केली आणि म्हणूनच त्यांच्या अथक प्रयत्नातून भारत स्वतंत्र्य झाला.

आज मात्र शिक्षणाचा तो उद्देश राहिलेला नाही. आज लोकं शिकतात. शिकून मोठे होतात. मोठमोठी पदं मिळवितात. मोठमोठ्या पदावर जातात. नोकऱ्या मिळवतात. अशा नोकऱ्या, ज्या ठिकाणी ते शिकलेले असूनही गुलामासारखे वागतात, नव्हे तर लाचारीचं जीवन जगतात. ते एवढे शिकलेले असतांनाही त्यांना दोन कवडीचे लोकं अक्कल शिकवितात अन् ही शिकलेली मातब्बर मंडळी केवळ अज्ञानी लोकांसारखं ऐकत असतात. कारण त्यांनी शिक्षण हे आपल्याच विकासासाठी घेतलेलं असते अर्थात मतलबासाठी घेतलेले असते समाजसेवेसाठी नाही. असा स्वार्थ साधत असतांना ते बाकीच्याही त्यांच्या एवढे शिकलेल्या लोकांचाही बळी घेत असतात.

आज भ्रष्टाचाराने चरणसीमा गाठलेली आहे. या भ्रष्टाचाराराच्या खोलात गेल्यास आपल्याला दिसून येईल की भ्रष्टाचार हा शिकलेला माणूसच जास्त करतो. कारण त्याला स्वार्थ साधायचा असतो. प्रसंगी ते कितीही शिकले असले तरी ह्या भ्रष्टाचाराच्या राज्यात शरम, लाज, बाणेदारपणा, स्वाभीमान, चारीत्र्य आणि शिक्षण या सर्व गोष्टी सोडून ते लाचार बनतात. आपण उच्चकोटीचे शिकलेले आहोत हेही विसरतात. हे सर्व आजच्या काळात स्वार्थीपणानं घडवलं आहे. आज समाजसेवेचा उद्देशच राहिलेला नसून यात जो इमानदार आहे, ज्याचा

इमानदारीचा पिंड आहे, मग तो कितीही शिकलेला असला तरी त्याचं शिक्षण मातीमोल ठरतं.

महत्वाचं म्हणजे आज बरीच मंडळी शिकलेली आहे. उच्च शिक्षण घेवून पराकोटीस पोहोचलेली आहेत. कोणी वकील बनला आहे, कोणी डॉक्टर, तर कोणी इंजीनियर. पण आजच्या शिक्षणानं कारकुनदारी निर्माण केलेली असून लोकांना लाचार बनवलं आहे. ही लाचारी दूर करण्यासाठी शिक्षणाच्या वाढत्या महत्वानुसार लोकांनी शिकावं. पण अशी लाचारी पत्करु नये. तसेच शिक्षण हे केवळ नोकरीसाठी घेवू नये. तर हे शिक्षण व्यावसायीक दृष्टीकोणातून घ्यावे. ज्यावेळी आपण घेतलेल्या शिक्षणातून केवळ नोकरी न मिळवता आपण त्या शिक्षणाचा उपयोग स्वतःसाठी व्यावसायीक उद्योगधंदे उभारुन रोजगार मिळविण्यासाठी करावा. तसेच इतरांनाही रोजगार मिळवून देण्यासाठी करावा. तेव्हाच शिक्षणाचा उद्देश यशस्वी होईल अशा व्यावसायीक आणि व्यावहारीक शिक्षणातून स्वतःचा रोजगार आपण स्वतःच निर्माण केल्याने आपण कोणाचे गुलाम राहणार नाही. तसेच आपला स्वाभीमान एवढा वाढेल की आपल्या या रोजगारामुळे कोणी आपल्याला ब्र देखील म्हणणार नाही. तसेच दोन कवडीचा माणूसही आपल्याला अक्कल शिकविणार नाही. हे तेवढंच खरं आहे. याचाच अर्थ असा की शिक्षणाचा दृष्टिकोण हा केवळ नोकरी

मिळविणे हा नसावा. नोकरीसाठी शिकूच नये. तर चांगला उद्योग करण्यासाठी शिकावे. शिक्षणातून आपल्यासाठी आणि इतरांसाठीही रोजगार निर्माण कसा करता येईल यासाठी प्रयत्न करावा. तसेच शिक्षणात मतलबीपणा आणू नये. जेणेकरुन आपल्या शिक्षणानं इतरांचा जीव जाईल. त्याचा दोषही आपल्यावरच लागेल.

शिक्षण हे संस्कारी तत्वावर आधारलेलं असावं. त्या शिक्षणातून मान सन्मान वाढावा. मुलांनी मोठे झाल्यावर आबालवृद्धांचा तसेच लहान थोरांचाही सन्मान करायला हवा.

अलिकडे आपण पाहतो की मुलांमध्ये मानपानच उरलेला नाही. ती मुले लहान मुलांशी तर वात्रटपणे वागतातच. शिवाय मोठ्या माणसांशीही वात्रटपणे वागतात. मोठी माणसं या वात्रटपणामुळं त्रस्त असतात.

मुले संस्कारी निव्वळ शाळेतूनच तयार होतात असे नाही. तर ते परीसरातूनही संस्कारी होत असतात. नव्हे तर असे संस्कार घरातूनही मिळत असतात. त्यासाठी मुलं घरी जे आईवडीलांचं ऐकतात. तेच संस्कार सर्वात जास्त रुजत जातात मुलांवर.

पूर्वी कुटूंब हे संस्कार करण्याचं केंद्र होतं. कुटूंबातील संस्कारी भट्टीत मुलांना हवं तसं वळवून त्यांना चांगलं नागरीक बनवलं जात

होतं. त्यानुसार मुलांमध्ये आदर्श मानसन्मानाचे संस्कार रुजायचे. अशी मुले आबालवृद्धांचा मानच करीत नव्हे तर आजोबांना आजींना सन्मान देत. कारण त्यांचे मायबापच आपल्या आईवडीलांच्या आज्ञेत असायचे. ते मायबापाचे वागणे पाहून साहजीकच मुले आज्ञाकारी बनत. मुलीही स्नुषा म्हणून गावात आल्यानंतर आबालवृद्धांसमोर अदबीनं डोक्यावर पदर घेत. खाली मान टाकून चालत असत. तेच गुण त्यांच्या मुलांमध्येही उतरत. तो प्रकार आज दिसत नाही. कारण आज कोणत्याही स्नुषा सासरी आल्यावर वडीलधारी मंडळींसमोर डोक्यावर पदर घेवून चालत नाही. खाली मान टाकून तर नाहीच नाही. मग त्यांची मुलं का चालतील. हेच संस्कार आधुनीक शिक्षणानं मुलांमध्ये रुजले.

एक प्रसंग असा आहे आजच्या आधुनीक संस्कारी काळातला. एका म्हाताऱ्याचं स्नुषेसोबत काही शुल्लक कारणानं भांडण सुरु होतं. तेव्हा ती स्नुषा त्या म्हाताऱ्याला बोलत होती. 'This is my home. you are get out. '

नेमकं कोणाचं घर. ते म्हाताऱ्याच्याच मालमत्तेतून साकार झालेलं घर. म्हातारा जो होता. त्यानं आपल्या एकुलत्या एका मुलाला शिकवलं. लहानाचं मोठं केलं. त्यातच त्याला सरकारी नोकरीही लागली. त्यानंतर त्याला सरकारी नोकरी लागताच

योगायोगानं त्याला नोकरी करणारी मुलगी पत्नी म्हणून मिळाली. मग काय दोघंही नोकरी करीत होते. दोघांचाही पैसा बक्कळ होता. अशावेळी जे म्हाताऱ्याचं जुनं घर होतं. ते जुनं घर त्यांनी विकलं व मोठा बंगला बांधला. तसे ते तिथे राहायला गेले.

तो बंगला तिनं आयुष्यात कधी पाहिलेला नव्हता. अचानक तिला मिळाल्याबद्दल अभिमान वाढला. तो एवढा अभिमान वाढला की ती त्या बंगल्याला जास्त महत्व देवू लागली. तशी एक चारचाकी गाडीही दाराच्या पुढं उभी होती.

तो बंगला जरी तिचा असला, तिनं मेहनतीनं बांधला असला, त्या बंगल्यावर त्या म्हाताऱ्याचा अधिकार नसला तरी खरं पाहिल्यास तो पुर्ण बंगला त्या म्हाताऱ्याचाच होता. कारण त्यानं जर मुलाला जन्मच दिला नसता आणि लहानाचं मोठं केलं नसतं तसेच शिकवलं नसतं आणि नोकरी लागली नसती त्याच्या मुलाला तर आज ती मिळाली नसती. याचाच अर्थ असा की तो बंगला तिचा नसून त्यावर त्या म्हाताऱ्याचाही तेवढाच अधिकार होता. पण हे लक्षात कोण घेतंय.

आज असेच वातावरण बहुतेक घरात सुरु आहेत. जरी म्हाताऱ्या मंडळींचं घर असलं, कितीही मालमत्ता असली तरी त्या घरातील स्नुषा ह्या म्हाताऱ्या मंडळींसमोर अशाच वर्तनातून वागत

असतात. हेच चित्र घराघरातून दिसून येते. हे चित्र जेव्हा त्या घरातील नातवंड पाहात असतात. तेव्हा मात्र खरंच विचार यायला लागतो की या लहान मुलांवर कोणते संस्कार होणार. ही मुले पुढे संस्कारी बनतील की नाही.

महत्वाचं म्हणजे शिक्षणातून संस्कार रुजायला हवं. तो संस्कार फुलायला हवं. मग ते संस्कार कुठूनही होवोत. या चांगल्या संस्कारासाठी शाळेचीच मर्यादा नाही. तर ते संस्कार घर, परीसर या ठिकाणाहूनही होतात.

शाळा हे संस्काराचे माहेरघर आहेच. तेथून तर चांगले संस्कार होतातच. कारण ते संस्कार करण्याचेच केंद्र आहे. पण घरीही मायबापांनी कुसंस्कार होणार नाही याची काळजी घ्यावी. कारण शाळेमध्ये मुलगा पाचच तास असतो. तर दिवसाच्या चोवीस तासांपैकी एकोणवीस तास घरी किंवा परीसरात असतो. त्यामुळं परीसरातून नाही जमले तरी घरातून संस्कार होणे महत्वाचे आहे. त्याशिवाय आदर्श पीढी घडणार नाही. मात्र ते कसे करावेत याची काळजी प्रत्येक मायबापांनी नक्कीच घ्यायला हवी. नक्कीच घेतली पाहिजे.

रोशन व भक्ती निघून गेले होते. रोशननं भक्तीला तिच्या घराजवळ सोडलं. तसा तो परत आला. तसे ते रोजच भेटू लागले. एक दिवस भक्ती त्याला म्हणाली,

"रोशन, मला तुझ्याशी काही बोलायचं आहे. "

भक्तीनं असं म्हणताच रोशनला वाटलं की भक्ती कदाचित त्याला विवाहाविषयी वा प्रेमाविषयी बोलेल. तसा तो म्हणाला,

"बोल ना भक्ती, काय बोलायचं ते. " तशी भक्ती म्हणाली,

"रोशन तू माझ्यावर प्रेम करतोस. "

"होय. "

"अगदी खरं प्रेम करतोस. "

"होय, अगदी खरं खरं करतो. "

"अगदी शंभर टक्के करतोस. "

"होय. पण तू हे का विचारतेय?"

"एक काम आहे महत्वाचं. "

"कोणतं काम?"

"मला तुझ्याशी विवाह करायचा आहे ना. "

"विवाह!"

"होय, विवाह नाही समजत का?विवाह. लग्न म्हणतात त्याला. बोल, करशील न लग्न. "

"होय. का करणार नाही लग्न. नक्की करीन. "

"पण एक अट आहे. "

"कोणती?"

"तू बारावी पास व्हावं आणि खूप शिकावं. मला कमी शिकणाऱ्या मुलाशी विवाह करणं आवडणार नाही. "

त्या अटीवर तो गप्प होता. तसा काही वेळ जाताच ती म्हणाली,

"बोल करशील ना अभ्यास. शिकशील ना जास्त. "

तो विचार करु लागला. पण तरीही तो काहीच बोलत नव्हता. ते पाहून ती म्हणाली,

"अरे तू उत्तर दिलं नाही. का? तुला माझी अट मंजूर नाही की काय?"

"अट. "

"होय, अट. "

"अट....... माझं अ◌ाता अभ्यासात मनच लागत नाही. मला माफ कर. "

"ठीक आहे. माफ केलं. पण एक लक्षात ठेव. आजपासून आपली मैत्री संपली. उद्यापासून माझ्याशी बोलायचं नाही. मला अभ्यास करणारेच आवडतात. "

".......... " तो काहीच बोलला नाही. तशी ती काही वेळ वाट पाहात राहिली. त्याचा काही रिन्पान्स दिसत नव्हता. शेवटी ती न बोलता निघून गेली.

दिवसामागून दिवस जात होते. ती त्याचेशी काहीही बोलत नव्हती. तो बोलायची कोशीश करायचा. पण ती बोलणं टाळायची. तिच्या मनात तो होता. पण त्याला सुधारायचं होतं. जणू तिनं त्याबद्दल सतिशला वचन दिलं होतं. त्यानुसार ती वागत होती. तिलाही वाटत होतं त्याच्याशी बोलावं. पण त्याच्याशी बोलताच त्यानं अभ्यास सोडला तर. अभ्यास केलाच नाही तर तो पास होईल काय? तिला तसं वाटत होतं.

तिचं ते न बोलणं पाहून रोशनला वाईट वाटत होतं. त्याला ती आठवत होती. आवडत होती. त्याला भीतीही वाटत होती की भक्ती सोडून तर जाणार नाही. तसा त्यानं विचार केला.

'भक्ती चांगली मुलगी असून या भक्तीमुळं आपण अभ्यास करायला पाहिजे. दुसरी मुलगी असती तर तिनं आपल्याला अभ्यासाची गोडी लावली नसती. पण ही भक्ती आपल्याला म्हणते

की अभ्यास कर. तिला माझ्याविषयी प्रेम आहे. त्यामुळंच तिनं अभ्यास करायला लावलं. आपण अभ्यास करायला हवं. बारावी चांगल्या गुणानं पास व्हायला हवं. त्याशिवाय भक्ती बोलणार नाही. यात भक्तीचाच नाही तर आपलाही फायदा आहे. '

रोशन अभ्यास करु लागला. त्याला बारावी पास करायची होती. त्यासाठी दिवसरात्र एक करु लागला. त्यातच बारावीची परीक्षा झाली. निकाल लागला व शेवटी तो पास झाला. त्याला गुणही चांगले मिळाले होते.

भक्तीनं ते त्याच्या मित्रांकरवी ऐकलं. तशी ती त्याला जवळ आली. बोलायची हिंमत होत नव्हती. पण धैर्य राखून ती म्हणाली,

"काँग्रेच्यूलेशन रोशन. तू अभिनंदनास पात्र आहेस. "

तिचा आवाज........ तो आवाज ऐकताच तो मागे वळला. तोच भक्ती त्याला त्याच्या पुढ्यात दिसली. तसा तो म्हणाला,

"धन्यवाद भक्ती. "

तसे त्याला ते जुने दिवस आठवले. तसा तो म्हणाला,

"भक्ती कशी आहेस?"

"छान आहे. तू?"

"मीही छान. "

"बरं. "

"माहित आहे भक्ती. मी तुझ्याचमुळे बारावी पास झालो. "

"तसं वैगेरे काही नाही. ती तुझी मेहनत आहे. "

"नाही गं. तू जर बोलली नसती तर आज हे चित्र काहीतरी वेगळं असतं. "

"हो का?"

"असं मी काय केलं म्हणायचं. "

"तू खूप मोठं काम केलं. तुला कल्पना नाही. "

"पण असं का केलं मी. "

"तू मार्ग दाखवलाय मला. त्यामुळंच तर मी बारावी पास झालोय. "

"आता एक काम करशील?"

"कोणतं?"

"आता पुढे असाच अभ्यास कर. काहीतरी बनून दाखव. "

"पण माझीही अट आहे एक. "

"कोणती?"

"तू माझ्याशी बोलावं. तसेच माझं शिक्षण होईपर्यंत थांबावं. "

"ठीक आहे. दिलं वचन तुला. " ती म्हणाली व निघून गेली.

दिवसामागून दिवस जात होते. भक्ती त्याच्याशी बोलत होती. तिही शिकत होती. तोही मन लावून अभ्यास करीत होता. एक एक करता करता तो परीक्षा पास होत होता. भक्तीही तशीच परीक्षा पास होत होती. तिनं मात्र आपल्या प्रयत्नानं त्याच्या जीवनात अर्थ भरला होता.

जसजसे दिवसं गेले. तसतशी भक्तीचं वय होत चाललं होतं. तिला बरेच रिश्ते विवाहासाठी येत होते. पण ती त्याला नकार देत होती. तिला वाटत होतं की आपण ज्याला शब्द दिला. तो शब्द आपण पाळायला हवा. म्हणून ती आपलं वचन पुर्ण करण्यासाठी अविवाहीत राहिली होती. पण ती वाट तरी कितीशी पाहणार. तिलाही विवाहाचा प्रश्न सतावतच होता.

भक्तीनं विवाह केला. तिला एक रिश्ता पाहायला आला. तो तिला पसंत पडला.

सुंदर मोठंसं घर होतं. त्या घराभोवती बाग होती. हवं तर त्या बागेतून शोभणारी ती अशोकाची झाडं. ती उंच उंच झाडं त्या बंगल्यासमोर शोभून दिसत होती. याच बंगल्यात लिलाधर व नयनतारा हे जोडपे राहात होते.

नयनतारा व लिलाधर दोघंही नोकरीला होते. त्यातच त्यांनी पै पै पैसा जोडून पुष्कळ सारी संपत्ती जोडली होती. त्यांना एकुलता एक मुलगा होता. त्याचं नाव राजेश होतं. तो लाडात वाढलेला होता. त्याला त्याच्या वडीलानं तो एकुलता एक असल्यानं लाडाप्रेमानं वाढवलं होतं. त्याला कमी पडू दिलं नव्हतं. अशातच या राजेशला वाईट सवय लागली. ती म्हणजे काम न करण्याची व इतर अनैतिक गोष्टीचीही.

मुलगा राजेश बिघडलेला. मायबापाला विचार येत होता. कसं करावं. मुलगा सुधारेल कसा? त्यांनी मुलाबद्दल इतरांना सांगून पाहिलं की मुलगा सुधरंवायचा कसा. त्यावर त्यांना कुणीतरी सांगीतलं की या मुलाचा विवाह करुन टाकावा. तो आपोआपच सुधारेल.

मायबापानं मुलाचा विवाह केला. त्यांनी त्यासाठी भक्तीला पसंत केलं.

भक्ती एक सुंदर साजेशी मुलगी होती. ती मुलगी पाहायला सुंदर होती. व्यतिरिक्त पेशानं डॉक्टरही बनली होती. श्रीमंत घराणं आहे म्हणून तिच्या बापानंही तिचा विवाह राजेशशी करुन दिला होता. आता संसार सुरु झाला होता.

काही दिवस गेले होते. तसे दिवस जात राहिले. त्यातच तिला दोन मुलंही झाली. ती मुलं लहानाची मोठी होवू लागली. पण जसजसे दिवस जावू लागले. तसतसे राजश्रीला आपल्या पतीच्या खुब्या माहित होवू लागल्या. त्याचं दारु पिणं, त्यातच घरी मुलं मुली आणणं. आपल्या डॉक्टर पत्नीसमोरच त्या मुलींशी अश्लिल चाळे करणं इत्यादी गोष्टीची तिला माहिती होवू लागली. त्यातच दोघांचे खटकेही उडू लागले. पण तरीही ती सहन करीत चूप होती. तिला चूप बसणे आवडत नव्हते. पण संसार तुटण्याची भीती तिली वाटत होती. मात्र या गोष्टीची माहिती तिनं आपल्या पतीची बेइज्जत होईल म्हणून आपल्या मायबापांनाही त्या गोष्टी सांगीतल्या नाहीत. पण ती सहन तरी किती करणार.

एकदाचा तो प्रसंग आणि दिवस उजळला. भक्ती बाहेर गेली होती. तशी ती अचानक घरी आली. दरवाजा लावलेला नव्हता. तसा तिनं दरवाजा उघडला आणि आवाज न करता बेडरुममध्ये शिरली. तर पाहते काय, तिचा पती तिच्या बेडरुममध्ये एक माणसासोबत अश्लिल चाळे करीत असलेला दिसला.

भक्तीनं ते दृश्य पाहिलं. तिला पतीबद्दल वाईट वाटलं. तिला पतीचा भयंकर रागही आला. काय करावं अन् काय नको असं

तिला वाटलं व तिनं ताबडतोब निर्णय घेतला. त्याला आता सोडायचं. ताबडतोब आताच्या आता सोडायचं.

भक्तीनं त्याला सोडायचा घेतलेला निर्णय........ तिनं सर्व सामान भरलं. एका मुलाला कडेवर घेतलं. दुसऱ्या मुलाचं बोट पकडलं व ती आपल्या मायबापाच्या घराचा रस्ता चालू लागली. पण तिला पतीनं अडविलं नाही वा तिची माफी मागीतली नाही.

बरेच दिवस झाले होते. तिला घटस्फोट हवा होता. पण ते पाहिलेले अश्लिल चाळे कोणासमक्ष बोलू शकत नव्हती. तिला त्या गोष्टीची लाज वाटत होती. वडीलांनी तिला सुरुवातीला येण्याचं कारण विचारलं. त्यावर भक्तीनं सहज आले असं उत्तर दिलं होतं. पण तिला वडील जेव्हा जायला सांगत. तेव्हा मात्र ती ती गोष्ट टाळत होती. एकदा वडीलांनीच तिला दम देवून विचारलं,

"बेटा, मी तुला दररोज विचारतोय की तू आपल्या पतीच्या घरी जा. पण तू का जात नाही? का टाळतेस? असं काय झालं की तू जायला तयार नाही पतीच्या घरी. माझा पारा जर सरकला तर मी तुला जबरदस्तीनं नेवून देईल. "

बापानं असं म्हणताच ती रडायला लागली. तशी तिची आई म्हणाली,

"बेटा, काय झालं? मला तरी सांग. जे बापाला सांगता येत नसेल. ते मला सांगू शकतेस. "

तशी ती आपली कर्मकहानी आईला सांगू लागली. आईनं ती कहानी बापाला ऐकवली व बापाला ते ऐकून धक्काच बसला.

बापानं ती कहानी ऐकताच ठरवलं आता काहीही झालं तरी मुलीला कोणत्याही परिस्थीतीत तो राजेशच्या घरी पाठवणार नाही. आता घटस्फोटच घ्यायचं. असेच दिवसामागून दिवस जात होते.

न्यायालयात खटला दाखल झाला होता. फैरीवर फैरी झडत राहिल्या. कोणी तिला वाईटही म्हणू लागलं. कोणी तिला चांगलंही म्हणू लागलं. न्यायालयही तिला समजावून सांगू लागलं. 'ही लहानशी मुलं बघ. याकडं पाहा. यांना पाहून राहा. झालं ते विसरुन जा. अख्खी जिंदगी तुझ्यापुढे आहे. तू कशी कापणार. ' वैगेरे सर्व गोष्टी. पण ती ऐकत नव्हती. त्यातच न्यायालयानं धमकीही दिली की आम्ही मुलं त्याचेकडे देवू. तरीही ती हारली नाही. तिनं हिंमत ढासळू दिली नाही. ती खंबीर होती, एखाद्या स्थितप्रज्ञासारखी.

आज घटस्फोट झाला होता. तिला संपत्ती मिळाली नाही. मात्र मुलं मिळाली. त्यातही एक अट होती. ती ही की अठरा वर्ष झाल्यावर मुलांची इच्छा चालेल. ती ज्यांचेकडे राहतो म्हणतील,

त्याचेकडे राहायला जावू शकतील. ती लहान असल्यानं आता ती आईकडेच राहतील.

घटस्फोटाचा निकाल. ती खुश होती. एरवी असा अश्लिल पती. जो स्त्री आणि पुरुष भेद मानत नाही. असा पती तिला नको होता. त्या गोष्टी तिनं आईशिवाय कोणालाही सांगीतल्या नाही. न्यायालयालाही नाही. कारण त्याची तिलाच लाज वाटत होती.

समाज भक्तीला वाईट समजत होता. कारण ज्या गोष्टी तिच्या समोर घडल्या होत्या. त्या गोष्टी तिनं समाजाला सांगीतल्या नव्हत्या. त्या गोष्टी तिनं अंतर्मनात दडवून ठेवल्या होत्या. ती त्या गोष्टी समाजाला सांगूही शकत नव्हती. समाजाला काय माहित होते की तिच्यासोबत काय घडले.

कालांतरानंतिची मुलं मोठी होत होती. ती आपल्या मुलासाठी काबाडकष्ट करीत होती े नव्हे तर शिकवीत होती. ती मुलं बापाला विसरली होती नव्हे तर आईची सेवा करीत होती. संस्कारी बनत होती. हे संस्कारी बनणे तिनं पतीला सोडल्याचा परीणाम होता. जर तिनं पतीला सोडलं नसतं तर त्याचे काही औरच परीणाम झाले असते हे मात्र निश्चीत. हे सर्व घटस्फोटानं घडवलं होतं.

********************************************

भक्तीचा झालेला विवाह. रोशनला खुप वाईट वाटत होतं. पण त्याच्यासमोर उपाय नव्हता. त्यानं काही दिवस अभ्यास सोडला होता. त्याचं अभ्यासात मन लागत नव्हतं. त्याला कसंतरी वाटत होतं. पण शेवटी त्यानं विचार केला. आपण शिकायचं. भक्तीपेक्षाही जास्त. कदाचित भक्तीला वाटायला हवं की आपण जर या रोशनशी विवाह केला असता तर किती बरे झाले असते. त्याला माहित नव्हतं भक्तीनं त्याच्यासोबत विवाह का केला नाही.

ती विवाहासाठी थांबली होती. ज्यावेळी तिची रोशनशी विवाह करण्याची इच्छा होती. त्यावेळी तो शिकतच होता. त्यानं खुप शिकावं असं तिला वाटत होतं नव्हे तर तिचीच ती अट होती. तो ज्यावेळी शिकत होता. त्यावेळी भक्तीचं वय वाढत चाललेलं होतं. चेहरा उतरत चाललेला होता. शिवाय अशा उतरलेल्या वयानंतर रोशनही तिच्याशी विवाह करणार की नाही असं तिला वाटत होतं. त्यातच मायबापाच्या इच्छेनुसार तिला वागावं लागलं. परंतू तिचं दुर्दैव असं की तिला राजेशसारखा पती मिळाला. ज्याने तिच्या अखख्या संसाराचा बट्ट्याबोळ केला.

राजेश पती नावावर कलंकच ठरला. त्याचा बाप करोडपती असल्यानं त्याचं वर्तन घाणेरडं ठरलं होतं.

भक्ती पश्चाताप करीत होती. पण आज उपाय नव्हता.

रोशन खुप शिकला होता. तो शिक्षणाधिकारी बनला होता. साऱ्या जिल्ह्याच्या शिक्षणाचा कारभार त्याच्या हातात होता. तो निरनिराळे शासनाचे निर्णय राबवीत होता. त्यानं अद्यापही विवाह केला नव्हता. तो अजूनही भक्तीचीच वाट पाहात होता.

एक दिवस भक्तीनं फोन केला.

"हाय, मी भक्ती बोलतेय. रोशन बोलतोस ना. "

"कोण भक्ती?" रोशन न ओळखण्याचा बहाणा करुन बोलला.

"मी भक्ती. तुझी कॉलेजची मैत्रीण. "

"बोल, काय काम आहे आता?"

"काही नाही बोलायचं आहे तुझ्याशी. "

"बोल. "

"आता नाही. भेटशील तेव्हा. "

"बरं!"

"आज सांजच्याला भेटशील. "

"नाही, आज सांजच्याला कसा भेटेल. "

"केव्हा भेटशील?"

"जेव्हा सवड मिळेल तेव्हा. " रोशन म्हणाला. तसा तिनं फोन ठेवला व ती चूप बसली.

भक्तीला त्याची आठवण नियमीत येत असे. पण तो काही तिची आठवण काढत नव्हता. त्याच्याजवळ आज भरपूर पैसा होता. पण त्याचा स्वभाव पूर्णतः बदलला होता. तो आता पुसटसा भक्तीला विसरला होता. नव्हे तर भक्ती गेल्यानंतर त्यानं कधीही कोणावर प्रेम न करण्याचा विडा घेतला होता.

कित्येक दिवस निघून गेले होते. भक्ती रोशनला भेटू इच्छीत होती. पण तो काही तिला भेटण्यास उत्सूक नव्हता. त्याला वाटत होतं की भक्तीनं त्याला धोका दिलेला आहे. परंतू वास्तविक पाहता भक्तीनं त्याला धोका दिलेला नव्हता. ती तर पवित्र होती नव्हे तर तिनं सतिशच्या मतानुसार रोशनचं भविष्य तिनं बनवलं होतं. ते तो विसरुन गेला होता.

********************************************

रोशन सतिशबरोबर राहात होता. त्यानं अतिरिक्त पैसा कमवला होता. त्यानं त्या पैशात बंगला बांधला होता. हा सर्व पैसा

भ्रष्टाचाराचा होता हे स्पष्ट दिसत होतं. रोशनला वाटत होतं की आपण गरीबी कापली. आपल्याला बालपणात कोणतंच सुख मिळालं नाही. तेव्हा आपण असा पैसा गोळा करुन आपण आपला उर्वरीत काळ हा सुखदायक बनवावा असं तिला वाटत होतं. त्यामुळं तो भ्रष्टाचारातून असा पैसा कमवीत होता.

सतिशला वाटत होतं की त्यानं असा पैसा कमवू नये. तसेच त्यानं इमानदारीनं पैसा कमवावा. म्हणून तो त्याला विरोध करीत होता. त्याला वाटत होतं की आपण असा पैसा कमविल्यानं पाप विकत घेत असून ते पाप कधीच खंडण करणारं नव्हतं. पण सतिश इमानदार होता. तसाच तो लोभी नव्हता. तो तर दानशूर वृत्तीचा होता. तसा त्यानं आपल्या दानशूर वृत्तीचा दाखलाही दिला होता. लहानपणी तो जेव्हा भीक मागायचा. त्या भीकेतून आलेला पैसा हा सतिश मंदीरात दान करीत असे. पण त्याचे भाऊबहिण मतलबी वृत्तीचे बनले होते. नव्हे तर ते भ्रष्टाचारी वृत्तीचे होते. बहिणही वेगवेगळया माध्यमातून पैसा गोळा करुन भ्रष्टाचारी बनली होती. तसेच भाऊ तर आज दिसूनच येत होता. अशाच या वातावरणात सतिशचे नेहमी आपल्या भावाशी खटके उडत होते. सतिशला मात्र ते आवडत नव्हतं. तो तसा त्याला विरोध करीत होता.

आज बहुतेक ठिकाणी भ्रष्टाचार माजला आहे भ्रष्टाचारानं चरणसीमा गाठली आहे. कायदे असले तरी लोकं सर्रास लाच घेत आहेत नव्हे तर पडद्यामागून हवा तेवढा पैसा कमवीत आहेत. हा पैसा काळा पैसा म्हणून ओळखला जातो.

पैशाचे दोन प्रकार आज पाहायला मिळत आहेत. एक म्हणजे काळा पैसा व दुसरा म्हणजे पांढरा पैसा. काळा पैसा अर्थात भ्रष्टाचारानं तसेच मेहनत न करता कमविलेला पैसा होय. तर पांढरा पैसा हा मेहनतीनं कमविलेला पैसा होय. हा पैसा मेहनतीसारखं मोल देवून कमविलेला असल्यानं त्याची किंमत असते. लोकं असा पैसा लोकांना राजरोषपणे सांगतात अर्थात तो पैसा दाखवायची भीती नसते. उदा. पगारी माणसाच्या वेतनाचा पैसा. हा पैसा कोणीही लपवू शकत नाही. याउलट काळया पैशाचं आहे. हा पैसा कोणीही कोणाला राजरोषपणे सांगू शकत नाही. हा पैसा लपवता येतो. म्हणून त्याला काळा पैसा म्हणतात. असा पैसा मेहनत करणारा मजूर मात्र कमवू शकत नाही हे तेवढेच खरे आहे.

आज असा काळा पैसा कमविणारी मंडळी भरपूर आहेत. काही नेतेमंडळी असा काळा पैसा कमवीत असतात. तर काही सरकारी नोकरदार मंडळीही असा काळा पैसा कमवीत असतात.

या काळ्या पैशानं ते सुख विकत घेतात. जसे चारचाकी गाडी, बंगला आणि इतर सर्व सोयी. उदा. एसी वैगेरे वैगेरे.

पांढऱ्या पैशानं हे काहीच विकत घेता येत नाही. कारण तो पैसा ते सगळं विकत घ्यायला तुटपुंजा पडतो. त्यामुळे मेहनत करणाऱ्या बहुतःश मजूरांजवळ चारचाकी गाड्या व बंगले नसतात.

काळा पैसा कमविणारी माणसे आपल्या पैशानं सुखसोयी विकत घेतात. आरोग्य विकत घेवू शकत नाही. ते एसीच्या कमऱ्यात वावरतात. तसेच कुठेही जायचे असेल तर एसी गाडीनेच जातात. त्यांचा संबंध नैसर्गिक वातावरणाशी येत नाही. अशी माणसं जास्त, ऊन, जास्त पाऊस व जास्त थंडी सहन करीत नाहीत. ते कुठलेही पाणी पीत नाहीत. तसेच काहीही खात नाहीत. परंतू पांढरा पैसा वापरणारी माणसं ही कुत्रीमतेने जगत नाही. ते कितीतरी दूरपर्यंत पायी चालत असतात. कारण त्यांच्याजवळ चालण्यासाठी तेवढी सोय नसते. त्यांना थंडीपासून वाचण्यासाठी पुरेसं घर नसतं. तसेच पावसापासून वाचण्यासाठी पुरेसा रेनकोट वा छत्री नसते. अशी माणसं ते बाराही महिने थंडी, ऊन, वारा आणि पाऊस असं जे झेलतात. त्यानुसार त्यांची प्रतिकारशक्ती वाढत असते. अधिक थंडी सहन केल्यानं पुढे थंडीच्या बाबतीत प्रतिकारशक्ती वाढल्यानं त्यांच्यावर थंडीचा परिणाम होत नाही. अशी मंडळी पुढे सर्दी,

पडसे यासारख्या आजारापासून दूर असतात. तसेच पावसाळ्यात पावसाचे पाणी झेलण्याची क्षमता निर्माण झाल्यानं अशी मंडळी पावसाळ्यातही निरनिराळ्या आजाराची शिकार होत नाहीत.

आपल्याला जगण्यासाठी थंडी, ऊन, वारा पाऊस या सर्व नैसर्गीक गोष्टीची गरज आहे. त्याच गोष्टी आपल्याला सर्व सोयी पुरवतात. आपले आरोग्य चांगले ठेवतात. त्यानुसार ज्यांच्याजवळ पांढरा पैसा आहे. ती मंडळी जास्त करुन आजारी दिसत नाहीत. ती आजारी पडतही नाहीत. त्यांना बीपी, शुगर, अटैकचा अजिबात त्रास होत नाही. दमा वा सर्दी खोकल्यासारखे दीर्घ आजार दिसत नाहीत. याचा अर्थ ते आजारी पडत नसतात असे नाही. त्यांनाही आजार होतो. पण त्यांना होणारा आजार हा लवकर सुधारतो नव्हे तर हा आजार सुधारण्यासाठी त्यांना जास्त पैसा लागत नाही. त्यांचे काही काही आजार तर विनाऔषधीनंही सुधरतात.

काळ्या पैसेवाल्यांचे आजार हे ठरलेले असतात. ते नैसर्गीक वातावरणात राहात नसल्याने त्यांची प्रतिकारशक्ती ही कमकुवत झालेली असते. त्यांना बीपी, थायराईड, सीकलसेल, अटैक, शुगर इत्यादी रोग होतात. सर्दी, खोकलेही होतात. ह्या मंडळींना साधारण सर्दी, खोकल्यासाठी रुग्णालयात जावे लागते. हा साधारण दिसणारा त्यांचा सर्दी, खोकला हा लवकर सुधारत नाही. ते कुठेही

खावू शकत नाहीत. वावरु शकत नाहीत. तसेच कुठलेही पाणी पीवू शकत नाहीत.

विशेष सांगायचं म्हणजे आपण आपल्याला सुखसोयी प्राप्त व्हाव्या म्हणून काळा पैसा मिळेल त्या मार्गाने गोळा करीत असतो. पण त्या काळया पैशानं खरं सुख मिळतं का? चांगलं आरोग्य मिळू शकते काय? तर याचं उत्तर नाही असंच आहे. काळया पैशानं, गाडीघोडा, बंगले, एसी व इतर सुविधा विकत घेता येवू शकतात. पण चांगले आरोग्य विकत घेता येवू शकत नाही. जो आनंद पांढरा पैसा वापरुन जीवन जगण्यात आहे. तो आनंद काळा पैसा वापरुन जीवन जगण्यात नाही. पांढरा पैसा कमविणारी माणसं ही नैसर्गीक वातावरणात नेहमीच राहतात. पण काळा पैसा कमविणारी माणसं ही नैसर्गीक वातावरण मिळविण्यासाठी सहल काढतात. पर्यटन करतात. यात्रा करतात. देवाचा धावा करतात. पण तरीही त्यांना हे नैसर्गीक वातावरण मिळू शकत नाही. कोणताही देव हा असं नैसर्गीक वातावरण देवू शकत नाही. तसेच अशाचप्रकारचं कुत्रीम वातावरणाचा सतत वापर केल्यानं अशा काळा पैसा वापरणाऱ्या लोकांचं आरोग्य बिघडतं. त्यातच त्यांचं नुकसानही होतं. जे नुकसान कधीच भरुन निघत नाहीत.

दुसरं नुकसान असं होतं की जी मंडळी असा काळा पैसा कमवितात. त्यांची मुलं ही चांगली संस्कारी नसतात. याचं कारण ती मुलं आपल्या मायबापांना असा काळा पैसा कमवितांना पाहतात. त्यांना वाटत असतं की आपण सुखी आहोत. त्यांना निरनिराळी व्यसनं लागतात. तसेच त्यातच त्यांच्या जीवनाचं व आरोग्याचं नुकसान होतं. म्हणून पैसा कमवितांना आरोग्यही कमवावं. पण आपण जेव्हा असा काळा पैसा जेव्हा कमवतो. तेव्हा साहजीकच आपलं नुकसान होतं. आपल्या अंगवळणी असणाऱ्या चांगल्या सवयी आपल्या अंगातून निघून जातात. आपल्याला वाईट सवयी जडतात. निरनिराळी व्यसनं जडतात. ऐषआरामाची सवय लागते. जास्त मेहनतीचं काम करण्यास कंटाळा वाटतो. तो कंटाळा एवढा वाढतो की त्या अवस्थेनंतर आपण आपलं काम नोकरीशाही पद्धतीनं करण्यावर भर देतो. यातच आपल्या शरीराची हालचाल व्यवस्थीत न झाल्यानं शरीराचे स्नायू शिथील बनतात. त्यातूनच पुढे हातपाय दुखणं, अंग दुखणं यासोबतच निरनिराळे आजार वाढीस लागतात. ज्या आजारांवर कितीही उपाय केले तरी ते आजार बरे होत नाहीत. काही काही काळा पैसा कमविणारी लोकं तर एवढी त्रस्त असतात की जी पुरेशी झोप चांगल्या आरोग्याचं लक्षण असते. ती पुरेशी झोपही त्यांना येत नाही. पर्यायानं सांगायचं झाल्यास यामुळंही व्याधी जळते.

महत्वाचं सांगायचं म्हणजे काळा पैसा कमवूच नये. कारण काळा पैसा हा चांगलं आरोग्य प्रदान करीत नाही. काळा पैसा हा चांगल्या आरोग्याचं लक्षण नाही. चांगलं आरोग्य आणि पुरेशी झोप ही आपल्या सुखदायी आरोग्याची गुरुकिल्ली आहे. तीच जर नसेल तर आपण कमविलेला पैसा कोणत्या कामाचा? तेव्हा चांगलं आरोग्य आणि पुरेशी झोप जर मिळवायची असेल तर काळ्या पैसा कमविण्याला तिलांजली द्यायला हवी. त्याशिवाय चांगले आरोग्य प्राप्त होत नाही. हे सर्वांनी लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. तेव्हा एकच प्रतिज्ञा लोकांनी घेण्याची गरज आहे. ती म्हणजे चांगलं आरोग्य जर हवं असेल तर भ्रष्टाचार मुक्त देश नाही तर जगालाही बनवावं. त्याची सुरुवात आपल्या देशापासून करावी. जेणेकरुन जगात असा इतिहास निर्माण होईल की असाही एक देश होता. तो भ्रष्टाचार मुक्त होता.

रोशनचे सतिशशी उडणारे खटके पाहून ते सहन न झाल्यानं रोशननं त्याचं घर सोडलं व तो त्याच झोपडपट्टीमधील मिळालेल्या लहानशा घरात राहायला आला होता.

रोशन व रोशनी हे बहिणभाऊ माणूसकी विसरुन गेले होते. त्यांना गरीबीची कीव येत नव्हती. काल आपण असेही दिवस काढले असं त्यांना वाटत नव्हतं. तसेच आपल्या मायबापाच्या

मृत्यूनंतर आपल्याला आपल्या भावानं लहानाचं मोठं केलं हेही ते विसरले होते. त्यांना वाटत होतं की भावाला आमचं सुख पाहाणं होत नाही. तो जळतो आपल्या संपत्तीला.

रोशन व रोशनीला पैसा प्रिय होता. ते फुटपाथचे जीवन प्रिय नव्हते. तसा तो आणि ती आपल्या भावाला पूर्ण विसरुन गेले होते.

सतिश त्या झोपडपट्टीतील त्या लहानशा घरात राहात होता. त्यानं अद्यापही विवाह केलेला नव्हता. अशातच रोशनीनं विवाह केला. त्याला निमंत्रण दिलं नाही. तो तिचा प्रेमविवाह होता. ती सुखात होती. तिनं आपला संसार बसवला. तिनं आपल्या दोन्ही भावाची तमा केली नाही. त्यानंतर रोशनही विवाहासाठी मुलगी पाहात होता. पण त्याला काही मुलगी गवसत नव्हती.

अचानक त्याला आज भक्तीची आठवण आली. तसं तिनं त्याला भेटायला बोलवलेलंही त्याला आठवलं. तसा तो तिला भेटायला तयार झाला. त्यानं भक्तीला फोन केला.

"हैलो भक्ती, भक्ती बोलत आहे ना. "

"होय. आपण?"

"मी रोशन. कॉलेजचा मुलगा. मला तुझ्याशी बोलायचं आहे. "

"बोल. "

"मला तुला भेटायचं आहे. "

"ठीक आहे, अजून काही. "

"काही नाही. भेटशील का?"

"आता कशी आठवण आली तुला आणि भेटायला वेळही भेटला. आता कसा वेळ भेटला रोशन?"

रोशन चूप होता. कारण चूक त्याचीच होती. तो परत म्हणाला,

"अगं रागावतेस कशाला?भेटशील का विचारलं. "

"ठीक आहे, भेटेन मी. "

तिनं आश्वासन दिलं. तशी ती त्याला भेटायला दुसऱ्या दिवशी निघाली. मुलं आईजवळ ठेवली.

ती बाग फुलली होती. त्या बागेत रोशन व भक्ती एकमेकांना भेटायला आले होते. ते आपापसात बोलत होते. रोशन म्हणाला,

"कशी आहेस?"

"मी बरी आहे आणि तू कसा आहेस. "

"मीही. "

"काय काम करतोस?"

"या जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी आहे. "

"मोठ्या औंद्यावर आहेस. छान. "

"तुझीच कृपा आहे. "

"माझी! मी काय केलं असं?"

"तू मला अभ्यासाला लावलं. "

"मी! छे! अन् मला सांग तो तुझा भाऊ सतिश कुठे आहे?"

"सतिश माझा भाऊ. तो आता माझ्याजवळ नाही. "

"का बरं? देवासारखा भाऊ तुझा आणि तुझ्याजवळ नाही. "

"म्हणजे, मी समजलो नाही. "

"अरे त्यानच तर खरं म्हणजे तुला अभ्यासाला लावलंय. "

"म्हणजे?"

"अरे तू जेव्हा बारावी नापास झाला होता आणि मला तू पहिल्यांदा जेव्हा आपल्या घरी घेवून गेला. तेव्हा माहित आहे तुला सतिशनं काय केलं. "

"काय केलं सतिशदादानं?"

"तुझ्या सतिशदादानंच मला तुला समजवायला लावलं. त्यानुसार मी वागले. आज तू ज्या काही पदावर आहेस ना. ती सर्व सतिशची कृपा आहे. "

"पण मी नाही हाकललं माझ्या भावाला. तोच गेला. "

"तो का गेला?"

"हे मला माहित नाही. "

"त्याला काहीतरी दुःख झालं असेल तुझ्याकडून. "

"असं. पण कोणतं दुःख असेल?"

"ते तुझं तुलाच माहित. मला काय माहित त्यातलं. "

"एक काम कर तू जशी त्यावेळी मला मदत केली होती. तशी आज कर. तू माझ्या भावाला समजव. मला माझा दादा फार आवडतो. त्यानच लहानाचं मोठं केलं आम्हा. "

"पण तुम्ही आज ते विसरलात त्याचं काय? माहित आहे तूला मी तशी का वागले बारावीत असतांना. ती दादांचीच मर्जी. खरंच तुझा दादा महान आहे. असा दादा कुणालाही कधीच भेटणार नाही. " भक्ती म्हणाली.

"भक्ती एक काम करशील, तू माझ्या दादाला समजावशील. "

भक्ती हो म्हणाली व ते दोघंही निघून गेले.

दिवसामागून दिवस जात होते. अचानक तिला सतिशची आठवण आली. तशी एक दिवस भक्ती सतिशला भेटायला निघून गेली. तिनं सतिशचा पत्ता शोधला. तशी सतिशला भेटताच तिला

आनंद झाला. सतिश एका लहानशा घरात आपलं बस्तान मांडून बसला होता.

भक्तीनं आजुबाजूला सतिशद्दल विचारलं. सतिशचा पत्ता कोणीतरी सांगीतला. तो सर्वांचा ओळखीचा झाला होता. तिनं त्याचा पत्ता विचारताच एका वृद्ध माणसानं सतिशचं घर दाखवलं. तशी ती त्या सतिशच्या घरी आली.

"हैलो, कोणी आहे का घरात?"

कोणाचा तरी आवाज ऐकून सतिश बाहेर आला. पाहातो काय तर एक मुलगी आपल्या दारात उभी असून त्याचंच नाव उच्चारत आहे. तिनं डोळयावर चष्मा लावलेला असून ती ऐटबाजी शैलीत उभी आहे. तसा सतिश म्हणाला,

"कोण तुम्ही आणि सतिशशी काय काम आहे?"

"आपण सतिश आहात काय?"

"होय, मी सतिशच. आपण?"

"मी भक्ती. "

"कोण भक्ती?"

"मी रोशनची मैत्रीण. "

" कोण रोशन?"

"तुमचा भाऊ. "

"मला भाऊ वैगेरे कोणी नाही आणि कोणताच रोशन इथं राहात नाही. "

"माहित आहे सगळं मला. "

"म्हणजे?"

"मी तुमचीच भेट घ्यायला आलोय. "

"ये बस. मी सतिशच. पण बोलायचं असेल तर रोशनचं नाव काढू नको. "

सतिशनं बस म्हणताच भक्ती घरात बसली. तसा तिनं विषय काढला.

"सतिश दादा असं काय झालं की तुम्हा दोघांची एकमेकांशी पटत नाही. मला माहित आहे की तुम्ही त्याला शिकवलं. लहानाचं मोठं केलं. आज तो तुमच्याशी बोलत नाही. असं काय झालं?"

"तो बेईमान निघाला. ते प्रकरण आठवलं की मला फार दुःख होतं. म्हणून मी कधीच त्या विषयावर बोलत नाही. "

"पण असं काय झालं?"

"भक्ती तो माणूस नाही. महाशैतान बनला. राक्षस शिरलाय त्याच्या पोटात. त्यानं माणूसकी विकून खाल्लीय. "

"म्हणजे?"

"अगं तो गरीबींला मानत नाही. गरीबांना ओळखत नाही. "

"म्हणजे?"

"अगं तो भ्रष्टाचार करतो. लोकांना नोकरी लावायचे पैसे घेतो. कोणाचेही काम लाच खाल्ल्याशिवाय करीत नाही. "

"अस्सं होय. "

"होय. "

"त्यात तुमचं न पटण्याचं कारण काय?"

"अगं, मी त्याला म्हटलं की हे धंदे सोड. गरीबांचा आशिर्वाद घे. तर उलट मला तो तुला काहीच समजत नाही म्हणतो. भक्ती, मला त्याचेसोबत राहून पापाचं भागीदार बनायचं नाही. "

"ही गोष्ट आहे तर....... "

"होय. हिच गोष्ट आहे. "

"पण दादा, झालं गेलं विसरुन जा. त्याला आपलंसं कर. "

"आता हे होवूच शकत नाही. तो काही वाईट धंदे सोडू शकत नाही आणि मी त्याला आपलंसं करु शकत नाही. मला भ्रष्टाचार मुळात आवडतच नाही. मी याचसाठी त्याला शिक्षण शिकवलं होतं काय?"

"दादा, मी तुझी भावना समजते, पण आताचा काळ असा आहे. त्यात देणारे देतातच पैसे. मग आपण घ्यायचे नाहीत काय?"

"भक्ती तुझं म्हणणं बरोबर आहे. पण शिक्षण यासाठीच शिकावं लागतं काय?शिक्षणाचा हाच उद्देश अाहे काय? जर असाच उद्देश शिक्षणाचा असेल, तर ते शिक्षण कोणत्या कामाचं? मी त्याला शिक्षण मानतच नाही. "

"दादा, बरोबर आहे तुझं म्हणणं. पण आजचा काळ. "

"भक्ती, एकप्रकारे तुझंही म्हणणं बरोबर आहे. पण एक सांगतो की असा प्रत्येकानं शिकल्यावर विचार केला तर उद्या याच वृत्तीच्या शिक्षणानं लोकं आपला देशही विकतील. हे तुला पटू शकते काय?"

भक्ती विचार करीत होती. तिला त्याचं मत पटलं होतं. तिला आता सतिशच्या सांगण्यावरून रोशनचा तिटकारा वाटू लागला. तिच्या मनात रोशनबद्दल असुया निर्माण झाली होती. अचानक तिचं मत परीवर्तन झालं होतं. तसा सतिश म्हणाला,

"भक्ती एक काम करशील माझं. "

"बोला, मी तुमची सर्व कामं करायला तयार आहे. बोला दादा. "

"तू मला शिकवशील. "

ते शब्द तिच्या कानावर पडले. ती क्षणभर विचार करु लागला. तसा तो म्हणाला,

"भक्ती, मला लिहिणं वाचणं शिकायचं आहे. अन् त्यांना दाखवून द्यायचं आहे की शिक्षण कशाला म्हणतात. शिक्षणाचा उद्देश काय? काय शिकवशील मला?"

"होय दादा, नक्की शिकवीन. "

"खरंच मला तू लिहिणं वाचणं तरी शिकव कामापुरतं. मी त्याचा मोबदला देईल तुला. "

"नकोय दादा मोबदला. "

"नाही नाही. मी तुला मोबदला देणारच. कारण पैशाच्याच शिक्षणाचं आज मोल आहे. त्यांना शिकवितांना माझा पैसा लागला. पण त्यांच्या हाडालाही दुःख पोहोचलं नाही शिक्षणाचं. म्हणून ते असे वागतात. तेव्हा मी तुला मोबदला देणारच. तू त्याचा स्विकार करशील. त्याशिवाय मलाही शिकल्यासारखं वाटणार नाही. "

भक्तीनं होकार दिला. त्याचबरोबर ती दुसऱ्या दिवशीपासून त्याला येवून शिकवू लागली.

हळूहळू भक्तीचं सतिशच्या घरी येणं जाणं सुरु झालं होतं. त्याचबरोबर तिला तो आवडायला लागला होता. तिचं

रोशनबद्दलचं आकर्षण कमी झालं होतं. तिच्या मनात सतिशबद्दलचं आकर्षण वाढीस लागलं होतं. हळूहळू त्या आकर्षणाचं रुपांतर प्रेमात होवू लागलं होतं. ती त्याच्या प्रेमात गुरफटू लागली होती. तिला वाटत होतं की तिला सतिशच जीवनभर साथ देवू शकते. तिची दोन्ही मुलंही सांभाळू शकते. रोशन नाही. त्यामुळं आपल्या लेकराखातर ती सतिशला आपल्या स्वप्नातील राजकुमार या अर्थानं साकार करु लागली.

भक्ती रोशनची प्रेमिका. पण ती रोशनची प्रेमिका जरी असली तरी ती सतिशलाही आवडू लागली होती. त्यालाही वाटत होतं की तिनं त्याची जिंदगी सवारावी. पण ती तर रोशनची प्रेमिका. ती आपल्याला पसंत करेल काय? त्याला प्रश्न पडत होता. तशी त्याची बोलण्याची हिंमत होत नव्हती. तिचीही तशीच बोलण्याची हिंमत होत नव्हती.

सतिश आणि भक्तीमध्ये निर्माण झालेला हा प्रेमजिव्हाळा........ त्याची किंचीतही कल्पना रोशनला नव्हती. सतिश भक्तीकडून लिहिणं वाचनं शिकत आहे हे ही त्याला माहित नव्हते. तसे त्यानं केलेले बरेच फोन तिनं उचललेलेही नव्हते. तसा एकदा अज्ञात नंबरवरुन फोन आला. तो तिनं उचलला. त्यात

रोशननं तिला भेटायला बोलावलं. तशी भक्ती त्याला भेटायला गेली.

"बोल रोशन, कशाला बोलावलंय. "

"तुला भेटायला बोलवलंय. "

"बोल लवकर लवकर. तुला काय बोलायचंय ते. मला वेळ नाही. माझी लेकरं लहान लहान आहेत. "

"दादा, काय म्हणत होता. "

"काही नाही, ते मजेत आहेत. "

"अजून काही सांग. "

"आज माझ्याजवळ वेळ नाही. नंतर कधीतरी. " ती म्हणाली व निघून आली. तसा तो काय समजायचं ते समजला. त्याला भक्तीचा भयंकर राग आला. पण त्याला वाटलं की आपण असा राग करायला नको. कारण तिची लहान लहान मुलं आहेत. म्हणून ती गेली असेल लवकर. त्यानं तो राग मनातल्या मनात निवळवला व ती गेल्यानंतर तोही निघून गेला.

भक्तीचे सतिशसोबत निर्माण झालेले प्रेमसंबंध ते काही तिनं जाहिर केलेले नव्हते. त्यालाही लाज वाटतच होती. मात्र ते दोघंही एकतर्फी प्रेम करीत होते. त्याला वाटत असे की भक्ती केव्हा केव्हा येते तर तिलाही वाटत होतं की मी केव्हा केव्हा जाते. त्यामुळेच की

काय, ती दररोज न चुकता येत असे. तिला सतिशच्च्या घरी तासन् तास बसून राहावसं वाटत असे. त्याच्या घरुन निघावंसं वाटत नसे. त्यालाही ती जावू नये असंच वाटत होतं.

एकदाची गोष्ट. त्याला वाटत होतं की हे वाढत चाललेलं प्रेम आपणच जाहिर करावं. तिची हिंमत होत नाही. तेव्हा ही सुरुवात आपणच करावी या उद्देशानं एक दिवस तो म्हणाला,

"भक्ती एक गोष्ट तुला बोलायची आहे. पण तू रागावणार नसशील तर सांगतो. "

"सांग. "

"पण भक्ती मला तू तसं वचन दे की तू रागावणार नाहीस. "

"दिलं वचन. "

"असं नाही. चिमटी घेवून दे. "

तशी तिनं चिमटी घेतली व ती म्हणाली,

"आता सांगा, कोणती गोष्ट आहे. "

तसा तो म्हणाला,

"भक्ती, माझं प्रेम निर्माण झालं तुझ्यावर. बोल तुला मंजूर आहे का? प्लीज रागावू नकोस. "

तशी ती गप्प झाली. तसा तो परत म्हणाला,

"भक्ती तू उत्तर दिलं नाहीस. "

ती परत गप्प बसली. तसा तिला आलेला राग पाहून तोही गप्प बसला. ती आज लवकरच निघून गेली.

भक्ती जाताच त्याला त्याच्या बोलण्याचं वाईट वाटलं. त्याला वाटत होतं की आपण असं बोलायला नको होतं. त्याला त्याच्या बोलण्याचा राग येत होता. आता भक्ती कधीच येणार नाही असंही त्याला वाटत होतं. पण तिच्या मनात कुतूहल जागे झाले होते. तिच्या मनात प्रेमाचे फुटाणे फुटत होते. सतिश अगदी तिच्या मनासारखं बोलला होता. पण ते तिला दाखवायचं नव्हतं, तर त्याचेकडून आपल्या लेकरांबद्दलची सहानुभूती मिळवायची होती. तेच तिला त्याचेकडून कबूल करवून घ्यायचं होतं.

दुसरा दिवस उजळला. भक्ती नेहमीप्रमाणं त्याच्या घरी आली. तोही तिची चातकासारखी वाट पाहात होता.

ती आली. घरात बसली व शिकविण्याचं नाटक करु लागली. तसा तो म्हणाला,

"भक्ती, मला माफ कर. मी काल चुकलो. मी तसं बोलायला पाहिजे नव्हतं. "

तशी ती म्हणाली,

"नाही सतिशराव, तुम्ही चुकले नाही. खरं तर मीच चुकले. मी तुम्हाला खरं खरं सांगायला हवं होतं. "

"म्हणजे?"

"मी घटस्फोटीत आहे आणि मला दोन मुलंही आहेत. "

"......... " तो गप्प होता. तशी तिच म्हणाली,

"सतिशराव, अशी माझी कहाणी आहे. तुम्ही खरंच अशा मुलीवर प्रेम करु शकाल?"

"होय. का नाही? मी विवाहही करेल तुला मंजूर असेल तर........ "

"तुम्ही माझी मुलं सांभाळू शकाल?"

"होय. मी तेही करणार. का सांभाळणार नाही तुझी मुलं. "

"मला नाही वाटत. "

"अजून मी काय करावं की तुझा माझ्यावर विश्वास बसेल. "

ती गप्प झाली आणि मनात विचार करु लागली की तो अति सुंदर स्वभावाचा आहे. तो तसा दगा देणार नाही. पण परीक्षा ती परीक्षाच. ती परीक्षा घ्यायलाच हवी. तशी ती म्हणाली,

"मला थोडा वेळ द्या विचार करायला. "

तसा त्यानं होकार दिला व ती कोणती परीक्षा घ्यावी. ती त्या परीक्षेबद्दल विचार करु लागली.

एक दिवस तिनं विचार केला. आपण आपली मुलं त्याचे घरी आठ दिवसासाठी नेवून ठेवावी व सांगावं की आपण आठ दिवसासाठी अत्यंत महत्वाच्या कामाला जात आहोत. त्यानं मुलं सांभाळावी. जर यात त्यानं नकार दिला तर समजावं की तो आपल्या लायकीचा नाही आणि त्यानं जर मुलं चांगली सांभाळली तर समजावं की तो आपल्या लायकीचा आहे. हिच त्याची परीक्षा समजावी. तसा मनात विचार आल्यावर तिनं एक दिवस त्याला तसं विचारलं.

"मी अत्यंत महत्वाच्या कामासाठी बाहेर जात आहे. तुम्ही सांभाळाल का माझ्या मुलांना. बदल्यात मी पैसे देईल. "

"अगं चिंता कशाला करतेस. मी सांभाळणार मुलांना. आपलं समजून सांभाळणार. तू केव्हाही आणून दे मुलांना. "

दुसऱ्याच दिवशी तिनं मुलांना सतिशच्या घरी आणून दिलं. तशी ती दोन तीन दिवस त्रास सहन करीत चूप राहिली. तिनं साधा त्याला फोनही केला नाही. त्यानं मात्र आईगत मुलांना सांभाळलं. त्याचं खानपान सारं काही सांभाळलं. त्यांना आईची आठवण येवू दिली नाही.

दोन तीन दिवस जाताच ती आपल्या बाळाला घ्यायला आली. तिनं त्याचं आभार मानलं व ती आपली मुलं घेवून गेली. तसेच ती आपल्या बाळाला विचारु लागली. 'अंकल कसे आहेत?'

मुलांनी त्याचेबद्दल चांगलंच सांगीतलं. त्यावर ती खुश झाली व न घाबरता त्याचेवर विश्वास ठेवून प्रेमासाठी व विवाहासाठी तयार झाली.

भक्तीचं प्रेम आता जोरात सुरु होतं. ती त्याचेवर प्रेम करु लागली होती. त्याचबरोबर तोही प्रेम करु लागला होता. आता विरह सहन होत नव्हता. एक दिवस तो म्हणाला,

"भक्ती, आपण हे प्रेम असं किती दिवस चालवायचं. आपण आता लग्न करायला पाहिजे. नाहीतर लोकं नावबोटं ठेवतील. तुलाही आणि मलाही. आपण बदनाम होवू. त्यापेक्षा आपण विवाह करुन एकत्र राहिलेलं बरं. "

तिला तो विचार पटला व तिही त्याच्या म्हटल्याप्रमाणे विवाहासाठी तयार झाली.

दोघांचा विवाह झाला होता. तो विवाह काही लपून राहिला नाही. त्या विवाहाची माहिती लवकरच त्याचा भाऊ रोशनला लागली. त्याला भक्तीचा भयंकर राग आला. त्याचबरोबर आपल्या भावाचाही राग आला. कदाचित आपल्या भावानं आपल्याला

द्वेषानं जाळण्यासाठीच हा विवाह केला असावा असं त्याला वाटलं व त्यानं आता सतिशशी आपले संबंध कायमचे तोडले होते. तसेच आता कधीही विवाह न करण्याविषयी त्यानं शपथही घेतली होती.

********************भाग दोन****************

सतिश भक्तीसोबत संसारात रममाण झाला होता. तो आपली मुलं असल्यासारखाच तिची मुलं पाहात होता. आपल्या मुलांसारखीच तिची मुलं असल्याची आस बाळगून तिच्या मुलांचाही तसा सांभाळ करीत होता.

आज ती मुलं हळूहळू मोठी होत होती. भक्तीच्या तर खुशीला पारावार नव्हता. भक्ती त्याच्यासोबत चिकार खुश होती. एरवी तिला वाटत होतं की तो पती रोशन पेक्षाही चांगला आहे.

सतिशचा व रोशनीचा संसार बसला होता. दोघंही आपआपल्या संसारात रममाण झाले होते. त्यांना वाटत होतं की रोशननंही विवाह करावा व आपला संसार बसवावा. पण रोशनला ते समजत नव्हतं.

रोशनी रोशनशी बोलत होती. ती त्याच्या घरी नित्य जात होती. त्याला कधी रागवत होती. कधी मार्गदर्शन करीत होती. पण त्याचं अंतःकरण दुःखी होतं. ते दुःख तो कुणाला सांगणार. ते दुःख तो अंतर्मनातून गिळत होता.

रोशन तसं पाहिल्यास दारु पीत होता. तो पार्ट्यामध्ये जात होता. त्याला शाळा संचालक मंडळी नित्य पार्ट्या देत असत. त्याच त्याला मदिरेसह मांसही खायलाा मिळत असे. पण आता भक्ती गेल्यानं त्याचं मदिरेचं प्रमाण वाढलं होतं. नव्हे तर त्याला आता जगावंसंही वाटत नव्हतं.

हळूहळू दिवस जात होते. वसंतात झाडाला जशी पालवी फुटते. तशी रोशनच्याही जीवनात पालवी फुटावी असं भक्तीला वाटत होतं. तसा ती विचार करीत होती. तसं पाहता ते तिचं पहिलं प्रेम होतं. तिला रोशनबद्दल वाईट होतं. पण आता तिच्यापुढं काहीही उपाय नव्हता. ती आपल्या पतीलाही त्याचेबद्दल सहानुभूती दाखवू शकत नव्हती. त्याचं कारणही तसंच होतं.

कदाचित त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात वितृष्ट निर्माण होण्याचे संकेत त्यात होते. ती त्याबद्दल विचार करीत होती.

एक दिवस तिनं धीर धरुन सतिशला म्हटलं,

"अहो, तुमचा भाऊ खुप पितो. जरा त्याचेकडे लक्ष आहे का तुमचं. "

"त्याचे आता नाव काढू नको. "

"नको म्हणजे, तो भाऊ आहे ना तुमचा. "

"अगं, त्यानं◌ं आपली हालत स्वतः होवून केली. त्याचं मला सांगू नकोस. "

"अहो पण तुम्ही त्याला सांभाळलं. लहानाचं मोठं केलं आणि आता म्हणता की त्याचं नाव काढू नको. "

"अगं तुला जर तो प्रिय वाटत असेल तर आताही तू जावू शकतेस. बोल जायचं आहे तुला. "

"तुमचा भाऊ ना तो. "

"ते जावू दे म्हणलं ना. अन् तो आता माझं ऐकणार तरी आहे का? हे बघ आता मला काही त्याचं ऐकायचं नाही. मी तर ठरवलं की मला कोणीच नाही. अन् तुलाही राहायचं नसेल तर तू ते ठरव.

मी सांगून ठेवतो अखेरचं आणि हं आता यापुढं त्याचा विषय काढू नकोस. समजलं. माझा भाऊ मेला माझ्यासाठी. "

ती चूप बसली. कारण सतिश स्वाभीमानी होता. तसा तो इमानदारही. त्याला फालतूच्या गोष्टी आवडत नव्हत्या. मात्र रोशनी त्याला जीव लावत होती.

रोशन व रोशनीचं जरी चांगलं पटत असलं तरी ती त्याच्या घरी जावून राहू शकत नव्हती. त्यामुळं त्याला एकाकी वाटत होतं.

एक दिवस सतिश अंगणात बसला होता. अचानक त्याला त्याचा भूतकाळ आठवला. त्याला बालपणीचा काळ आठवला. तशी आदेशची आठवण त्याला आली. तसं त्याचं हृदय भरुन आलं. तसा त्यानं भक्तीला आवाज दिला.

"भक्ती, जरा इकडे ये. "

तशी भक्ती आली. म्हणाली,

"बोला, कशाला आवाज दिला राव. "

"मला माझं बालपण आठवलं. "

"काय आठवलं बालपणातलं?"

"मला ज्या गृहस्थानं मदत केली. तो गृहस्थ आठवला. वाटतं की तो गृहस्थ कसा असेल. "

"कसा असेल म्हणजे. चांगलाच असेल. "

"आपण जावूया का तिकडं त्यांना भेटायला. "

"जावूया. "

"उद्या जावूया का?"

"बरं. उद्या जावूया. "

असाच तो दुसरा दिवस उजळला. त्यानं म्हटल्याप्रमाणे सकाळी तयारी केली. तसे ते लवकरच आदेशला भेटायला निघाले. लवकरच ते आदेशच्या घरी पोहोचले. तसं घरंही आलं. त्यानं दरवाजा ठोकला. तसा एक म्हातारी बाई वाकडी चालत बाहेर आली. तिला बरोबर चालताही येत नव्हते. ती दरवाजाजवळ आली. म्हणाली,

"कोण तुम्ही अन् कोण हवंय तुम्हाला?"

"मी सतिश. सतिश आदेशचा मित्र. "

"तू सतिश होय. आदेश साहेबाचा मित्र. ये बेटा ये बस. पुष्कळ दिवसानं आला. "

"होय. " त्या वृद्ध बाईनं त्यांना आतमध्ये बसवलं. त्यानंतर चर्चा सुरु झाली. चर्चेदरम्यान समजलं की आदेश मरण पावला आहे. त्यांची पत्नी जीवंत आहे. तिही अंथरुणातच असते. त्यातच

तिला असणारा एकमेव मुलगा विदेशात राहायला गेला असल्यानं तिचे हालहाल होत आहेत. जी म्हातारी बाई बोलत आहे. ती तिची सेवा करण्यासाठी तिनं ठेवून घेतलेली तिची शुश्रृषा आहे.

त्याला जुने दिवस आठवले. त्याच बाईनं त्यांच्यावर चोरीचा आड आणून त्याला घरातून बाहेर काढलं होतं. तिच्याचमुळे त्याला फुटपाथचं जीवन जगावं लागलं होतं. ते सर्व त्याला आठवत होतं. तसं त्यानं विचारल,

"ती कुठे आहे. "

"आतमध्ये झोपलेली आहे. " ती म्हातारी बाई म्हणाली. तसा तो तिला भेटायला आतमध्ये गेला.

"कोण?"

"मी सतिश. लहानपणी मी तुमच्याकडे राहात होतो. तुम्ही मला पोषलं. तुमचे मोठे उपकार आहेत. "

"ये बेटा जवळ ये थोडासा. "

तसा तो जवळ गेला. तोच त्याच्या चेहऱ्यावरुन तिनं हात फिरवला व रडत रडत ती म्हणाली.

"बेटा, मला माफ कर. मी तुझ्यावर फार जुलूम केलेत. देव मला माझ्या पापाची शिक्षा भोगत आहे. माझा मुलगा....... ज्या

लेकराच्या भविष्यासाठी मी तुम्हाला घरातून बाहेर काढलं. तो माझा मुलगा तशी ती पुन्हा रडायला लागली.

"आई, तू माझीही आई आहेस. " सतिश म्हणाला. तसा थोडा वेळ थांबला. तसा तो परत म्हणाला.

"आई तू काळजी करु नकोस. मी सांभाळेल तुला. तुझा मुलगा बनून. मला तू मुलगाच समज. "

ती काहीच बोलली नाही. काही दिवस सतिश तिथेच राहिला. तो सख्ख्या आईसारखी आपल्या त्या आईची त्या दिवसापासून सेवा करीत होता. तिचं न्हावू घालत होता. खायला घालत होता. तिलाही अगदी हायसं वाटत होतं. तिला आपल्या मुलापेक्षा कितीतरी चांगला सतिश वाटत होता.

सतिश हा मुळात गरीब होता. त्याच्याजवळ पैसा नव्हता. त्यानं पैशाला तेवढं महत्वही दिलं नाही. एरवी पैसाच जर कमवायची असेल तर तो वाईट मार्गानं कमवू नये असं त्याला वाटायचं. त्याला असंही वाटायचं की शिक्षण हे केवळ नोकरीसाठी कामात येवू नये तर ते शिक्षण आपल्या अंगातील सुप्त गुण विकसीत करण्यासाठी कामात यावं.

त्याला वाटायचं की लोकांमध्ये काही जे सुप्त गुण असतात. ते सुप्त गुण हे विकसीत झालेले नसतात. ते जर विकसीत करायचे

असतील तर त्याला शिक्षण अनिवार्य आहे. शिक्षण ही अशी गोष्ट आहे की जी सुप्त गुणांचा विकास करत असते.

शिक्षणाबाबतीत सांगायचं झाल्यास शिक्षणाला विशिष्ट मर्यादा नाही. ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. तसेच या शिक्षणाला विशिष्ट असा आकारही नाही.

सतिशला वाटायचं की प्रत्येक माणसात काही सुप्त गुण असतात. कोणाला चित्र काढता येतं. कुणाला वस्तू गोळा करता येतं. कोणाला शिल्प बनवता येतं. त्या गुणांचा विकास करतांना त्याला अवखडल्यासारखं वाटत नाही. तेच शिक्षण होय. आपणही आपल्या बहिणभावासारखंच श्रीमंत बनावं असं त्याला वाटत होतं. तसा तो बराच काळ तिच्याकडं राहिला.

काही दिवसानं ती बरी झाली. चालायला फिरायला लागली. तेव्हा सतिश म्हणाला,

"आई, मला जायला हवं आपल्या घरी. ज्यावेळी तुझी प्रकृती खराब असेल, तेव्हा मला बोलावून घे. "

त्यावर ती म्हणाली,

"बाळ, तूही माझा मुलगाच. माझ्या हातून फार मोठी चूक झाली. आता तू कुठेच जावू नको. मी सगळं तुझं बरोबर करील. तू इथंच राहा. मलाही आता या माझ्या देशात कोण आहे

तुझ्याशिवाय. माझा सख्खा मुलगा तर मला सोडून केव्हाच निघून गेला माझ्यापासून दूर सातासमुद्रापलिकडे. तो त्या विदेशात कुठे राहतो तेही मला माहित नाही. साधा त्याचा फोनही येत नाही. भेटायला येणं तर दूरच. बेटा, तो आता मला विसरला असं वाटते. त्याला आईही आठवत नाही. कारण चिमणीच्या पिलांला जसे पंख फुटून ते दूर उडून जातात. मग त्या पाखरांना स्वतःची आईही आठवत नाही. माझंही तसंच झालं. माझं मुल त्याच चिमणीसारखं मला इथे सोडून दूर निघून गेलं. असं वाटतेय की ते परतणार की नाही. तेव्हा तुच ठरव की मला या ठिकाणी एकाकी ठेवून सोडून जायचं आहे की माझ्यासोबत राहायचं आहे. तू मला आई म्हटलं ना. मग मी काय सांगते ते ऐक. आईचं ऐकणं बाळाचं काम. जो ऐकत नाही, तो बाळ कसला? तू आई मानलं ना मला. मग राहा इथंच माझं दुसरं बाळ बनून. " ती म्हणाली.

ती बोलतांना तिच्या मनात वेदना होत्या. ती बऱ्याच वेदना सहन करीत जगत होती असं वाटत होतं. सतिशलाही तिच्याबद्दल दया आली व तो म्हणाला.

"ठीक आहे हं. पण तुझा मुलगा येईपर्यंत थांबेल मी. नंतर मी जाणारच. "

"बेटा ते शिक्षण कोणत्या कामाचं की जे मायबापांना पोसत नाही. तर आपलाच स्वार्थ पाहायला लावते. शिक्षणानं माणूस मोठा होतो म्हणतात. पण मला नाही वाटत की माणूस मोठा होतो. मला तर वाटते की माणूस जेवढा शिकतो. तेवढा तो लहानच होत जातो. आजचे शिक्षण उपयोगाचे नाही. काही विचारवंत म्हणतात की शिक्षण माणसाला मोठे करते. त्यांचं म्हणणं बरोबर आहे. एखादा माणूस खुप शिकला की लोकं त्याचा आदर करायला लागतात. त्याच्याशी अदबीनं वागतात नव्हे तर त्या माणसांकडं पाहून शिक्षणाबद्दल कोणाच्याही मनात आदर निर्माण होतो.

शिक्षण शिकून मोठे होणाऱ्याच्या यादीत बरेच लोक आहेत. शिक्षणानं माणूस मोठा होतोच हे निर्वीवाद सत्य आहे. म्हणून डॉक्टर बाबासाहेबांनी आधीच म्हटलं शिका. डॉक्टर बाबासाहेबही शिकले, म्हणून त्यांना लोकं मानायला लागले. विचारायला लागले. ते जर शिकलेच नसते तर त्यांना कोणीही ओळखलं नसतं.

शिक्षण हे जरी माणसाला मोठं जरी करीत असलं तरी अलिकडच्या शिक्षण शिकणाऱ्याचं वागणं पाहून कोणालाही शिक्षण हे माणसाला मोठं करतं असं वाटत नाही. पुर्वीचा काळ गेला की शिकणारा व्यक्तीही वडीलधा-यांशी अदबीनं वागत असे.

त्याच्यात समजदारीपणा येत असे. पण आजच्या काळातील लोकं हे शिकतात. पण अदबीनं वागतांना दिसत नाही.

आज मुले एवढी शिकतात की कोणी डॉक्टर बनतात, कोणी इंजीनियर. कोणी विदेशात जातात. तर कोणी देशात राहतात. पण हे शिक्षण संकुचीत बुद्धीमत्ता बनवणा-यांचं शिक्षण आहे. त्याचं कारणंही तसंच आहे. ते म्हणजे हे शिक्षण नेहमी उच नीचतेचा फरक करीत आहे.

आजच्या काळात जे जास्त शिकतात. त्यांना थोडा अभिमान नक्कीच वाटते. त्यांना थोडासी गर्व नक्कीच येतो. त्यांना असं वाटायला लागतं की आमच्याएवढा कोणीच शिकलेला नाही. शिकूच शकत नाही. त्यांच्यापुढे कोणी जर गेलाच तर त्यांना वाटते की ते त्याची अवहेलना करतात. पण त्यांना ते कळत नाही की हा व्यक्ती जरी कमी शिकलेला असेल तरी त्याला जास्त अक्कल आहे. मला फक्त पुस्तकी अक्कल आहे.

आज आपण पाहतो आहोत की शिक्षण शिकलेला माणूस किती प्रमाणात स्वातंत्र्य असतो. तो तर आदर्श गुलामच वाटतो. संयमाच्या गोष्टी करतांना निव्वळ गुलामगीरीचं प्रदर्शन करतात ते. नव्हे तर नोकरदार असलेला जास्त शिकलेला व्यक्ती आपली नोकरी टिकविण्यासाठी मोठ्या साहेबांसमोर गुलाम होवूनच वागत

असतो. त्यांच्याकडे पाहिलं तर आजचं शिक्षण हे माणसाला सक्षम बनवीत नाही. तसंच शिक्षण जरी मोठ्या पदावर नेत असलं तरी ते शिक्षण काही माणसाच्या उपयोगाचे नाही. त्याची कारणं खालीलप्रमाणे आहेत.

१)आजचं शिक्षण उपयोगाचं नाही असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण लोकं जेव्हा शिकतात. ते एवढे शिकतात की त्यांना कोणतीही कामं करायला लाज वाटत असते. त्यांना वाटते की आपण एवढे शिकलो. मग अशी हलकी कामं कशी करावीत. ते प्रसंगी खाली(रिकामे) राहणं पसंत करतात. पण मिळेल ती कामं करीत नाहीत. अशांचे शिक्षण हे शिकून कोणत्या उपयोगाचे असे म्हणता येईल.

२)सेवेच्या दृष्टीकोणातून आजचं शिक्षण हे निरुपयोगी आहे. कारण जो शिकतो, तो व्यक्ती आपल्या मायबापाची सेवा करीत नाही. तो आपल्या पत्नीसोबत राहायला जातो. तो जे मायबाप शिकवतात, लहानाचं मोठं करतात. त्याच मायबापांना विसरतो. त्याच मायबापांना सोडून दूर जातांना त्याला एवढं शिकवूनही तो निर्णय अज्ञानी व्यक्तीसारखेच घेतो नव्हे तर मायबापाला वृद्धावस्थेत वृद्धाश्रमात टाकतो. अशी मुलं कितीही शिकली तरी ते शिक्षण त्यांच्या कोणत्या कामाचे?

३) काही लोकं शिकतात. त्यांना नोकरीही लागते. त्यांची नोकरी लागल्यानंतर ते स्वतःचे निर्णय घेवू शकत नाहीत तर साध्या दोन वर्ग शिकणाऱ्या माणसाच्या हातचे कळसुत्री बाहूले बनून वागतात. वावरतात. जसे एखाद्या शाळा चालविणाऱ्या संचालकांच्या शाळेत काम करणारी उच्च शिक्षीत शिक्षक मंडळी ही त्या शाळेतील कमी शिकणाऱ्या संचालकाच्या विरोधात बोलू शकत नाहीत. एवढंच नाही तर त्या शाळेतील कमी शिकलेला मुख्याध्यापक हा त्या शाळेतील उच्च शिक्षीत शिक्षकांवर अत्याचार करतो. पण हा जास्त शिकलेला शिक्षक त्यांच्या विरोधात बोलू शकत नाही. राजकारणातही कमी शिकलेले नेते हे जास्त शिकलेल्या अधिका-यांना नेस्तनाबूत करतात. यावेळी ते अधिकारी कितीही शिकलेले असले तरी या नेत्यांसोबत वावरतांना ते निरक्षरच वाटतात. अशावेळी त्यांचे शिक्षण कोणत्या उपयोगाचे असे वाटल्याखेरीज राहात नाही.

४) आज माणसे खुप शिकतात. नोकरी लागत नाही. त्यानंतर ते कोणतीही कामे करतात. पण आपल्या शिक्षणाचा उपयोग करुन कोणापुढे आदर्श निर्माण करीत नाहीत. नव्हे तर त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करुन स्वतःचा उद्योगधंदा सुरु करुन आपले पोट भरायला हवे. तसेच इतरांचेही पोट भरायला हवे. पण ही माणसं तसं करीत नाहीत. ही मंडळी आपलेच पोट भरु शकत नाही, ती

काय दुस-यांना कामं देतील! ती त्यावेळी अज्ञानीच वाटतात. त्यांच्या अशाच प्रकारच्या वर्तनामुळे त्यांच्याही शिक्षण उपयोगाचे वाटत नाही.

विशेष सांगायचं म्हणजे आज शिक्षणानं माणसं मोठी जरी होत असली तरी ती माणसं दिशा दाखवू शकत नाहीत. अर्थात आंधळयां ंची काठी बनत नाहीत. खरं सांगायचं झाल्यास शिक्षण हे शिकावे. शिकण्याची गरज आहे. पण त्याचबरोबर या शिक्षण शिकणाऱ्यानं न शिकलेल्या माणसाची काठी व्हावं. त्यांना व्यवस्थीत मार्ग दाखवावा. त्यांचे मार्गदर्शक व्हावे. जेणेकरुन त्यांनाही शिक्षणाचे महत्व वाटेल व ते जरी शिकले नसले तरी आपल्या येणाऱ्या पीढीला शिकवू शकतील. जेणेकरुन पुढील काळात तरी ते शिक्षण उपयोगाचे ठरेल यात शंका नाही. "

"तुझं म्हणणं ठीक आहे आई. पण मला जायला हवं ना. "

"हो, तुझं बरोबर आहे. मग तुझ्यात आणि त्यांच्यात काय फरक उरेल. हं ठीक आहे तुला वाटत असेल की मी तुला काही देणार नाही. तर एक ऐक. ही सगळी मालमत्ता मी तुलाच देवून जाईल. त्याची चिंता करु नकोस. "

"अगं आई, एवढीच किंमत केली तू माझ्या मनाची. अगं मला फक्त तू हवी. तुझी मालमत्ता नको. जर तू मला मालमत्ता देणार

असेल, तर मी जातोय आताच आणि भविष्यातही ह्या मालमत्ता देण्याचा विचार करशील नको तरच मी इथे राहिल. "

"ठीक आहे. " ती म्हणाली. तसा सतिश तिथं राहायला तयार झाला.

दिवसामागून दिवस जात होते. शिक्षण कशासाठी? हा प्रश्न त्याला सतावत होता. त्याला वाटत होतं की आपली जी भावंडं शिक्षणानं मगरावली आहेत. त्यांना आपण धडा शिकवावा. त्यासाठी आधी आपण काहीतरी बनून दाखवावं. तेव्हाच त्यांना चढलेला शिक्षणाचा गर्व कमी होईल. आज आपली भावंडं जर शिकली नसती तर त्यांना ती नोकरी लागली नसती, ज्या नोकरीत भ्रष्टाचार करुन पैसा कमवायला वाव मिळाला. आज याच शिक्षणानं त्यांच्याजवळील पैसा वाढल्यानं ती अासमानात चढल्यासारखी वावरत आहेत.

आपण काहीतरी करावं असा विचार करीत असतांना अचानक त्याला एक धंदा सुचला. तो गल्लीबोळात फिरुन लोहालोखंड गोळा करु लागला. त्यानं तो धंदा लावला. त्या धंद्यात तो मेहनत करु लागला. हळूहळू तो धंदा वाढायला लागला. दिवसामागून दिवस जात राहिले. तसा त्याचा धंदा वाढतच राहिला. आज त्याचा धंदा एवढा वाढला होता की त्याला घरी वेळ देता येणं

शक्य नव्हतं. शिवाय धंद्यावरुन त्यानं दोन चार लोकांनाही रोजगार दिला होता. साधा लोहालंगरचा धंदा. पण आज सतिशला त्या धंद्यानं बनवलं होतं.

सतिशचा धंदा जोरात चालला होता. तसा सतिश आपल्या त्या आईची चांगली सेवा करीत होता. तिला सकाळी न्हाऊ घालणं, तिला पिवू घालणं या सगळ्या गोष्टी करु लागला. तसं पाहता भक्तीही तिची सेवा उत्तमप्रकारे करीत होती. याच सेवेचा परिणाम की काय, सतिश आज श्रीमंत बनत चालला होता.

सतिश आज शिकला नव्हता. तो कोणत्याही शाळेत गेला नव्हता. तरीही त्याला लिहिता वाचता येत होते. आकडेमोडही त्याला चांगली करता येत होती. ते इवलंसं शिक्षण त्याला त्याच्या पत्नीनं म्हणजेच भक्तीनं शिकवलं होतं. व्यवसायीक दृष्टिकोणातील शिक्षण त्याला अनुभवातून मिळालेलं होतं.

आज आपण पाहतो की शाळेत मुलं जातात. अगदी सकाळपासून तर सायंकाळपर्यंत मुलांची शिक्षणासाठी त्रेधातिरपीट सुरु असते. सकाळी शाळेची वेळ, दुपारी शिकवणी वर्ग, रात्री स्वाध्याय वर्ग. या सर्व व्यापातून मुलांना वेळच मिळत नाही. ही धावपळ अगदी तीन वर्षाच्या मुलांपासून सुरु होते.

आज मुलं शिकविण्यावर जास्त भर दिला जात आहे. प्रत्येक घरातील सहा ते चौदा वयोगटातील मुल शाळेत गेलाच पाहिजे. शिवाय तो दर्जेदार शिकलाच पाहिजे असं सरकारचं ब्रीद असल्यानं आपण आपल्या घरातील सहा ते चौदा वयोगटातील मुलांना शिकवीत असतो.

शाळेत जाणाऱ्या मुलांना लिहिता वाचता आले. थोडीशी आकडेमोड आली म्हणजे तो शिकला असा शिक्षणाचा अर्थ नाही. तो त्याला मिळालेल्या शिक्षणानं जीवनात किती यशस्वी झाला. यालाच शिक्षण म्हणावं लागेल. तो जर जास्त शिकलेला असेल आणि त्याला ज्ञानाचा उपयोगच करता येत नसेल. तर त्याच्या शिक्षणाचा काहीच अर्थ नाही. त्याच्या शिक्षणाला काहीच अर्थ उरत नाही.

प्रत्येक आईवडील हिरीरीनं आपल्या मुलाला शाळेत घालतात. त्याला शाळा शिकविण्यासाठी राब राब राबतात. जबरदस्तीनं त्याला शाळेत नेवून देतात. एवढेच नाही तर तो शाळेत जात नसला तर त्याला मारतातही. कारण शिक्षण हे जीवनाचा पाया रचू शकते. पण महत्वाचं म्हणजे शाळा हे जीवनाचा पाय रचूच शकत नाही. तसेच शिक्षण घेण्यासाठी शाळा हे पर्यायी स्वरूप नाही. शिक्षण हे कुठूनही मिळतं. परीसर, घर, मित्रमैत्रीणी,

आईवडील, आप्त यामुळेही शिक्षण मिळत असतं. परंतू पालक शाळेत पाठवतात. कारण शिक्षणाचं मोजमाप करण्यासाठी.

किती शिक्षण शिकला असं जर कोणी विचारलं तर सांगता यावं यासाठी शाळेत जाण्याची कसरत. शाळेत शिक्षणाचे दाखले मिळत असल्यानं व शिक्षणाचं मोजमाप होत असल्यानं शिक्षणप्रेमींनी शाळेची रचना केली. आज त्यामुळच शाळेत जाण्याची स्पर्धा सुरु झालेली आहे. शाळा हे पुर्ण शिक्षणाची व्यवस्था नसली तरी.

शिक्षणाबद्दल सांगायचं झाल्यास मायकेल फैरेडे, थामस अल्वा एडीसन तसेच अल्बर्ट आईननस्टाईन कोणत्या शाळेत गेलेत. अल्बर्टला लहानपणी काही समजत नसल्यानं त्रासून जावून त्याला शिक्षकांनी सांगीतलं की आम्ही अल्बर्टला शिकवू शकत नाही. त्यावर त्याची आई घरी शिकवू लागली. पण शाळेची आवड असणारा अल्बर्ट आईला म्हणतो की आई मला शाळेत जायचंय. तेव्हा आई म्हणते, बाळा तू एवढा हुशार आहेस की तुला शिकवायला तेवढे तज्ञ शिक्षक नाहीत.

बरेच लोकं शिकतात. उच्च पदावरही जातात. त्यातच ते यशस्वीही ठरतात. काही लोकं हे शिकत नाहीत. ते तरीही आपल्या कर्तृत्वानं एखादा उद्योगधंदा टाकतात. त्या उद्योगात मेहनत करतात

नव्हे तर यशस्वी होतात. काही ठिकाणी अनुभव कामात येतो. तर काही ठिकाणी महत्वाकांक्षा देखील कामात येते.

शिक्षणात महत्वाकांक्षेला अनन्यसाधारण महत्व आहे. महत्वाकांक्षा जर शिक्षणात नसेल तर ते शिक्षण यशस्वी ठरत नाही. आम्ही मग कितीही शिकलो तरी महत्वाकांक्षा जर नसेल तर ते शिक्षणच कुचकामाचे ठरते.

आज आपण बरेच लोकं पाहातो. ते खुप शिकलेले असतात. पण कामे कोणती करतात असा जर शोध घेतला तर स्पष्ट दिसतं की ते काहीच करीत नाहीत. म्हणजेच बरोजगार आहेत. काही मंडळी शिकलेली आहेत. पण रिक्षा चालवीत आहेत. तर काही भीकही मागत आहेत. कारण त्यांच्यात महत्वाकांक्षेची उणीव आहे. महत्वाचं म्हणजे कोणत्याही गोष्टी करण्यासाठी महत्वाकांक्षा महत्वाचीच आहे.

महत्वाकांक्षा हे असं शस्र आहे की जे राजाला रंक आणि रंकाला राजा बनवू शकते. धनानंदानं ज्यावेळी चाणक्याचा अपमान केला. त्यावेळी चाणक्यानं शेंडी सोडली व प्रतिज्ञा केली की तो जेव्हापर्यंत या धनानंदाचा नाश करणार नाही. तोपर्यंत शेंडीला गाठ बांधणार नाही. ती प्रतिज्ञा म्हणजेच महत्वाकांक्षा. धनानंदाला नष्ट करण्याची महत्वाकांक्षा आपल्या मनात निर्माण

केली होती आर्य चाणक्याने. शिवाजी महाराजांच्याही बाबतीत तेच घडलं. शिवरायांनी रायरेश्वराच्या देवालयात स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली. ती पुर्ण करण्यासाठी प्रयत्न देखील केला. त्यानुसार त्यांना स्वराज्य स्थापन करता आलं.

आज आपण पाहतो की तरुणांमध्ये हिच महत्वाकांक्षाच कमी होत चाललेली आहे. आपण काही करु शकतो असे कोणालाच वाटत नाही. सगळी मुलं शिकतात. कारण मायबाप म्हणतात म्हणून. उच्च शिक्षण घेतात. कारण शिक्षणाची स्पर्धा आहे म्हणून. मग नोकरी शोधतात कारण धंद्यावर विश्वास नाही म्हणून. जीवनातील वेगवेगळे टप्पे......... कोणत्या टप्प्यावर धंदा बुडेल हे काही ठामपणे सांगता येणे शक्य नसल्यानं लोकं नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करतात. कारण नोकरी शाश्वत असते. त्या नोकरीत सुखसोयी मिळतात असं वाटतं. शिवाय नोकरीत दुष्काळ येवो की सुकाळ नोकरी ही जात नाही. धोका देत नाही. म्हणून लोकं नोकरीच्या मागे लागतात. तसेच महत्वाकांक्षा हरवून बसतात.

माणसानं शिकावं. शिकून खुप मोठं व्हावं. पण या शिक्षणानं आपल्या मनात महत्वाकांक्षा निर्माण करावी. अशी महत्वाकांक्षा की ज्या महत्वाकांक्षेने जीवनात काहीतरी करण्याची उर्मी मिळेल. जीवन यशस्वी होईल.

समजा एखादा माणूस जरी शिकला नसेल, पण त्यानं जर ठरवलं की मला शास्त्रज्ञ बनायचं, तर तो नक्कीच बनतो हे मायकेल फैरेडे, थामस अल्वा एडीशननं दाखवून दिलं. तसेच मी उद्योगपतीही बनू शकतो हेही काही उद्योगपतींनी दाखवून दिलं. जीवनात यशस्वी होण्यासाठी शाळेत जाण्याची गरजच नाही तर अनुभवाची गरज आहे. तसेच निव्वळ अनुभवच असून चालत नाही तर त्याचबरोबर महत्वाकांक्षाही असावी. महत्वाकांक्षा जर नसेल तर त्याची अवस्था ही मेंदू नसलेल्या एखाद्या वेड्या माणसासारखी होईल हे लपविता येत नाही.

महत्वाचं म्हणजे आपण जरी कमी शिकलेलो असलो आणि महत्वाकांक्षा जर आपल्यात कुटकूट भरली असेल आणि आपण जर ठरवलं की मी हे करु शकतो नव्हे तर त्यादृष्टीनं साधा प्रयत्न जरी आपण केला. तरी नक्की आपण यशस्वी होवू यात शंका नाही. आपण नक्कीच अशी महत्वाकांक्षा आपल्या मनात निर्माण करुन नक्कीच जीवनात यशस्वीता प्राप्त करावी. जेणेकरुन समाजात तुमची ओळख निर्माण होईल व तुम्ही सर्वांचे आदर्श बनाल ही शक्यता नाकारता येत नाही. सतिश त्याच विचारातून पुढे जात होता.

कामना आता सुधारली असली तरी तिनं सतिशला जावू दिलं नाही. तिला पुर्वी केलेल्या चुकीबद्दल पश्चाताप होत होता. तसं तिला वाईटही वाटत होतं. त्याच चुकीचं प्रायश्चित म्हणून तिनं त्याला आपल्या घरी राहायला सांगीतलं होतं.

आज सतिश घरी नव्हता. तशी भक्तीही घरी नव्हती. ते दोघंही काही कामानिमित्य बाहेर गेले होते. अशीच नामी संधी कामनासमोर चालून आली. तसं कामनानं एका ओळखीच्या वकीलाला बोलावलं व एक मृत्यूपत्र बनवायला सांगीतलं. ते मृत्यूपत्र त्यांना गुप्त ठेवायला लावलं. जेव्हापर्यंत तिचा मृत्यू होत नाही. तेव्हापर्यंत ते मृत्यूपत्र गुप्त राहावं असं ठरलं.

कामनानं म्हटल्याप्रमाणे वकीलानं मृत्यूपत्र बनवलं. ते मृत्यूपत्र तिच्या मृत्यूपर्यंत गुप्त ठेवण्याचं वचनही दिलं.

****************************************
*****

सतिश कामनाच्याच घरी तिचा मुलगा म्हणून राहात होता. त्यानं कबाडीचा धंदा सुरु केला होता. हळूहळू त्या धंद्यात जम बसत असला तरी त्याला पाहिजे तसा त्या धंद्याचा अनुभव नव्हता. परंतू महत्वाकांक्षा होती. ती म्हणजे मी हे करु शकेल. त्याच महत्वाकांक्षेच्या भरवशावर त्यानं धंदा सुरु केला होता. न शरम

करता तो गल्लीगल्लीतून लोहालोखंडवाला म्हणून सायकलवर फिरु लागला होता.

हळूहळू त्यानं धंदा वाढवला. त्याचबरोबर त्याला पैसेही जास्त मिळू लागले. अशातच त्यानं दोन तीन काम करणारी मंडळीही कामाला ठेवली.

आज तो या धंद्याचं कसब शिकला होता. त्याला अनुभवही आला होता. त्यानुसार तो धंदा करीत होता. त्याचं उत्पन्नही चांगलं बनलं होतं. परंतू तरीही तो त्या धंद्यात संतुष्ट नव्हता. त्यानं विचार केला की हा धंदा अजून वाढवायचा. त्यासाठी काय करावं लागेल. विचाराअंती त्याला समजलं आपण ही कबाडी वितळवून यापासून वेगवेगळ्या वस्तू बननल्या तर........ विचार करायचा अवकाश तो तत्परतेनं कामाला लागला. त्यासाठी असलेलं ज्ञान मिळविण्यासाठी विचारपूस करु लागला. त्यातच त्यानं काही रक्कम कर्जावूही घेतली. तो शाळेत कधीही गेला नसतांनाही त्यानं कबाडीचं वस्तूत रुपांतरण करण्याचं ज्ञान मिळवलं. त्याच ज्ञानाचा वापर करुन त्यानं एक जागा विकत घेतली व त्या जागेवर कारखाना उभा केला. हळूहळू त्यानं त्या कारखान्याचा जम बसवला. या कारखान्यातून आता हव्या त्या वस्तू बनवता येवू लागल्या. टाकावूपासून टिकावू वस्तू बनवता येवू लागल्या. नव्हे तर आता

सतिश एक उद्योजक म्हणून पुढे आला होता. हा सर्व कामनाची सेवा करण्याचा परीणाम होता.

कामना आता बरीच म्हातारी झाली होती. ती मरणासन्न अवस्थेत पोहोचली होती. तिच्यानं उठणं बसणं व्यवस्थीत बनत नव्हतं. त्यातच तिनं सतिशकरवी आपल्या मुलाला भेटण्याची इच्छा प्रगट केली. मुलगा मात्र विदेशात स्थावर झाला होता. सतिशनं तिच्याचसमोर त्याला फोन लावण्याचा प्रयत्न केला. पण त्यानं काही फोन उचलला नाही. तसा तो काही आला नाही वा त्यानं साधा फोनही केला नाही वा कोणती विचारपूसही केली नाही. तिला त्याचं फार वाईट वाटत होतं.

तिनं आता ठरवलं होतं की ती संपूर्ण मालमत्ता सतिशला द्यावी. कारण जो पुत्र आपल्या मरतेसमयी आपली सेवा करायला येवू शकत नाही वा जो साधा विचारपुस करण्याचा फोन करीत नाही. तो मग पुत्र का असेना. त्याला मालमत्ता कशाला द्यायची. त्यामुळं आज परत तिनं तिच्या वकीलाला फोन लावला. ज्यानं मृत्यूपत्र बनवलं होतं. त्यावर सह्या तेवढ्या बाकी होत्या.. बनलेल्या वकीलपत्रावर तिनं आज सह्या केल्या व सतिश आणि भक्तीला ती कागदपत्र सोपवीत जवळ घेत म्हणाली,

"बेटा, माझा मृत्यूदिवस जवळ आला आहे. मी आता जगणार नाही असे वाटते. तेव्हा ही आदेशची मालमत्ता मी आजपर्यंत सांभाळली. ही मालमत्ता आजपासून तुम्ही सांभाळावी. कारण ही मालमत्ता जर तुम्ही नाही सांभाळली तर ही सरकारीजमा होईल व तुम्हाला सेवेचा काही मोबदला मिळणार नाही. या मालमत्तेला तुम्ही स्वीकार करण्यास नकार देवू नका. कारण माझ्यासारख्या अनेक कामना या जगात आहेत की त्यांचे पुत्र विदेशात आहेत. ते साधा फोन करीत नाहीत वा विचारपुस करीत नाहीत. त्यांची सेवा करायलाही कोणी नसतो. त्यांची मालमत्ता सरकारजमा होते. तुम्ही जर नकार दिला तर माझीही मालमत्ता सरकारजमा होईल. तुम्हाला सेवेचा मोबदला मिळणार नाही. मला माहित आहे की सतिश तू सेवेचा मोबदला मागणार नाहीस. पण माझ्यासारख्या अशा कित्येक कामना........ त्यांची सेवा करणारे कित्येक सतिश. त्या कित्येक सतिशना असे सेवेचे मोबदले मिळणार नाही. पर्यायानं सांगायचे झाल्यास तुमचं उदाहरण देवून अशा कित्येक कामनाची सेवा करणाऱ्या सतिशचे सेवेचे मोबदले सरकार सरकारजमा करतील आणि जेव्हा अशा मालमत्ता सरकारजमा होतील. तेव्हा कोणतेच सतिश आमच्यासारख्या कित्येक कामनांची सेवा करायला मिळणार नाहीत. तेव्हा तुम्ही या मालमत्तेला स्विकारायला नकार देवू नका. वाटल्यास माझ्या

मृत्यूपरांत तुम्हाला या मालमत्तेचं जे करायचं आहे ते करा. पण निदान माझ्या मृत्यूपर्यंत तरी असं करु नका ही माझी शेवटची इच्छा आहे.

सतिश व भक्ती काय समजायचं ते समजले. ते चूप होते. तसं सतिशनं ते मृत्यूपत्र हातात घेतलं. तसा कामनाला एक झटका आला. तिनं मान टाकली. त्याचक्षणी तिनं श्वास सोडला होता.

आज कामना जगात नव्हती. तिनं तर अंतिम श्वास घेतला होता. नव्हे तर तिच्या अंतिम श्वासाबरोबर आज तिचा अध्यायही संपला होता. पण तिनं मृत्यूपुर्वी सांगीतलं होतं की काहीही झालं तरी ही मालमत्ता माझ्या मुलाला द्यायची नाही. ही तिची शेवटची इच्छा होती.

सतिश उद्योजक बनला होता. त्याचबरोबर आदेशच्या मालमत्तेचा वारसदारही. त्याला आदेशची मालमत्ता नको होती. पण कामनाची इच्छा होती की ती मालमत्ता त्याने तिच्या सख्ख्या मुलालाही देवू नये. तसे वचन त्याच्याकडून कामनानं घेतले होते. आज तो अतिशय श्रीमंत बनला होता. नव्हे तर आपल्या भावाबहिणीपेक्षाही कितीतरी जास्त श्रीमंत बनला होता. हे त्याचं श्रीमंतपण मात्र त्याच्या बहिण भावाला खुपत होतं. ते सर्व जुन्या गोष्टी विसरुन गेले होते. त्यांना वाटत होते की जर सतिश गरीब

असता तर तो एक ना एक दिवस लाचारीनं का होईना आपल्याकडं आला असता. पण आता तो श्रीमंत असल्यानं येवू शकणार नाही असं त्यांना वाटत होतं. शेवटी त्या दोघांनीही त्याच्याविरुद्ध कारस्थान करणं सुरु केलं होतं. पण त्यांना संधी चालूनच येत नव्हती. अशातच एक दिवस नामी संधी चालून आली.

एक दिवस एक अनोळखी गृहस्थ घरी आला. त्यानं पाहिलं की त्या घरात कुणीतरी व्यक्तीने शिरकाव केला आहे. त्यानं दरवाजा ठोठावला. तोच भक्ती पुढे आली. तशी विचारु लागली.

"कोण आपण? कोण हवंय आपल्याला?"

"माझे आईबाबा. "

"कोण आईबाबा? आम्ही तुमच्या आईबाबाला ओळखत नाही. "

"हे आदेशचंच घर आहे ना. "

"कोण आदेश?"

"आदेशराव अन् कामना. "

"कोण आदेश अन् कोण कामना?" भक्ती म्हणाली. तसा सतिश आतून विचारु लागला.

"कोण आहे? कोण पाहिजे त्यांना?"

"अनोळखी आहेत. त्यांना आदेश अन् कामना हवी. "

"मग विचार ना की त्यांना आदेश आणि कामना कशासाठी हवे आहेत. "

भक्तीनं तसं विचारलं. त्यावर त्या गृहस्थानं ते त्याचे मायबाप असल्याचं सांगीतलं. तशी भक्ती सतिशला ते सांगायला आली. तसा सतिश बाहेर आला. त्यानं त्या गृहस्थाला नाव विचारलं.

"काय नाव आपलं?

"अमीत. "

"आदेश आणि कामना आपले मायबाप आहेत. "

"होय. ते माझे मायबाप. आपण कोण?"

"मी सतिश. आज या घराचा मालक. आपण अमेरीकेला राहता ना. "

"होय. "

"तुमची आई मरण पावली. तेव्हा तुमच्या आईसाठी मी बरेच फोन केले. पण तुम्ही उचलले नाही. "

"काय आई मरण पावली काय?"

"हो, मरण पावली आणि बाबाही. पण तुम्ही आले नाही. "

"तिकडं वेळच९ मिळत नाही. "

"मयतीचे वेळीही फोन केला. पण तुम्ही उचलला नाही. "

"मयतीसाठी तरी वेळ मिळत नाही. "

"हो का?"

"होय. बरं ते जावू द्या. मला सांगा आता ते या जगात नाहीत तेव्हा ही मालमत्ता त्यांनी तुम्हाला विकली काय?"

"नाही. "

"मग तुम्ही मगाशी म्हटलं ना की तुम्ही या घराचे मालक आहात. "

"होय, मी मालकच आहे. "

"म्हणजे. मी समजलो नाही. "

"तुमच्या आईनं ही संपूर्ण मालमत्ता माझ्या नावावर करुन दिली. "

"काय?अन् कशी काय लिहून दिली मालमत्ता तुमच्या नावावर?"

"ते माहित नाही. "

"तुमच्या नावावर केली की तुम्ही नावावर जबररदस्तीनं करुन घेतली. "

असं म्हणताच भक्ती आणि सतिशलाही राग आला. पण तो चेहऱ्यावर दिसू ू न देता भक्ती म्हणाली,

"साहेब, तुम्हाला नेमकं काय म्हणायचं आहे ते स्पष्ट बोला. "

"ही मालमत्ता माझ्या मायबापाची आहे. त्याचबरोबर माझाही हक्क आहे. तेव्हा हा बंगला तुम्ही केव्हा खाली करताय ते सांगा. नाहीतर कोर्टाच्या लढाईला तयार राहा. " अमीत म्हणाला व चालता झाला.

अमीत निघून गेला खरा. पण तो जाताच सतिश विचारात पडला. काय करावे त्याला सुचेनासे झाले. कारण तो जरी उद्योजक असला तरी तो शिकलेला नसल्यानं त्याला ते बोललेले शब्द समजले नाही. तरीही तो घाबरला नाही.

*********************************************

अमीत हा विदेशात राहात होता. तो जरी मायबापाच्या मयतीला आला नसला तरी त्याला मायबापाची ही मालमत्ता हवी होती. ती विकून त्याला विदेशात पुन्हा परत जायचे होते. त्यामुळे त्यानं ती मालमत्ता मिळविण्यासाठी दोन तीन वेळा सतिशकडं

चकरा मारल्या. पण सतिशनं स्पष्ट नकार दिला असल्यानं तो जवळच्या पोलिसस्टेशनला गेला.

जवळच्या पोलिसस्टेशनला अमीतनं त्याविरुद्ध तक्रार केली. सतिशला त्या पोलिस स्टेशन मधून बोलावणं आलं. तसा सतिश पोलिस स्टेशनला गेला. पोलिसांनी शहानिशा केली. तक्रारीअंती माहित झालं की सतिशच्या नावावर ती मालमत्ता असून कामनानं ती मालमत्ता सतिशच्या नावावर केलेली आहे. पोलिसानं ती फाईल पाहिली व सांगीतलं की अमीतनं न्यायालयात जावं.

अमीतला मालमत्तेचा सुटलेला लोभ. त्यातच ती सतिशनं कामनाची केलेली निःस्वार्थ सेवा. यातूनच सतिशला मिळालेली मालमत्ता. अमीतनं मायबापाची सेवा केलेली नसतांनाही त्याचं हक्क मागणं. ह्या सर्व गोष्टी विचित्र होत्या. तरीही न्यायालयात खटला उभा राहिला. फैरीवर फैरी झडल्या. शेवटी निकाल लागला. निकालात मध्यम मार्ग न निघता निकाल हा अमीतच्या बाजूनं लागला. त्यानंतर सतिशवर आरोप केला गेला की सतिशनं बळजबरीनं कामनाला फुस लावून मालमत्ता आपल्या नावावर केली. त्यामुळं गुन्हा नसतांनाही सतिश विनाकारण दोन वर्षासाठी कारागृहातही गेला. नव्हे तर दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सतिशनं एवढी कामनाची सेवा करुनही भोगली होती. ज्याला माहित होतं,

ते हळहळत होते. ज्याला माहित नव्हतं, त्याला त्याचं काही सोयरसुतक नव्हतं.

अमीतनं जिंकलेली अख्खी मालमत्ता विकून टाकली. तो विदेशात गेला. तो आलेल्या फुकटच्या पैशातून व्यसनाच्या आहारी गेला होता. कारण तो पैसा काही त्याच्या मेहनतीचा नव्हता, तसेच तो पैसा त्याने मायबापाची सेवा केलेली नसल्याने त्याच्या मायबापाच्या आशिर्वादाचाही नव्हता. त्याचे व्यसन एवढे वाढत चालले होते की त्या व्यसनातच आलेला अख्खा पैसा नष्ट होत होता. लवकरच तो मृत्यूच्या हवाली झाला.

******************************************
******

दोन वर्ष झाली होती. कारखान्याचा सर्व कारभार सतिशच्या अनुपस्थीतीत भक्ती पाहात होती. तिनं हिंमत सोडली नाही. अगदी खंबीरपणानं ती उभारलेला उद्योग सांभाळत होती. आज सतिश कैदेतून सुटणार होता.

सतिश कैदेतून सुटला होता. तशी भक्ती त्याला न्यायला आली होती. तोही आता पश्चाताप करीत होती. कामनाची केलेली सर्व सेवा वाया गेली होती. कामनानं जीवंतपणी ते लहान असतांना

त्यांना घरातून चोरीचा आरोप लावून हाकललं होतं. तर तिच्या मुलानंही चोरीचाच आरोप लावून त्याला दोन वर्षाच्या कैदेत टाकले होते. निःस्वार्थ सेवा केलेली असतांनाही. त्याचं कारणंही तसंच होतं. तो खटला लढू शकला नाही. कारण त्याला कायदे समजत नव्हते. त्याचं शिक्षण तेवढं झालं नव्हतं. वकीलानं त्याच्या अज्ञानीपणाचा फायदा घेवून खटल्याला अशी कलाटणी दिली की खोट्याचे खरे व खऱ्याचे खोटे झाले होते. अमीत हवेच्या झोतासारखा आला व हवेच्या झोतासारखा गेला. पण एक गोष्ट त्याला शिकवून गेला की म्हाताऱ्या माणसाची सेवा जो करेल त्यालाच मालमत्ता व्हायला हवी. मग तो स्वतःचा मुलगा असो की नसो. त्यासाठी त्याला पुरेशा कायद्याचा अभ्यास करणे आवश्यक होते. पण तो कायद्याचा अभ्यास कसा करणार. तो विचार करीत होता.

अचानक त्याला आठवलं. भक्तीची दोन मुलं आहेत. ज्याला तो आपली मानतो. ज्यावर तो निरतिशय प्रेम करतो. अचानक त्याला आठवलं की याच मुलांना आपण मोठं करायचं. कायद्याचा अभ्यास शिकवायचा. जेणेकरुन ती मुलं आपल्याला अशा प्रकारच्या खटल्यावर न्याय मिळवून देतील.

एक दिवस तो अंगणात बसला होता. तशी भक्ती बागेला पाणी टाकत होती. तसा त्यानं भक्तीला आवाज दिला. भक्ती तशी जवळ आली. म्हणाली,

"कशासाठी बोलावलंय?"

"मला भक्ती एक प्रश्न पडलाय. "

"कोणता प्रश्न?"

"मला एक खटला लढायचा आहे. "

"कोणता?"

"मला लढायचा आहे असा खटला की ज्या खटल्यात म्हाताऱ्या मायबापाची सेवा न करणाऱ्या कोणत्याही पुत्रांना मालमत्ता मिळू नये. मग ते वारसदार का असेना. सेवा न करणाऱ्या पुत्रांना कशाला मिळावी मालमत्ता. "

"अजून तुमच्या डोक्यातून ते खुळ गेलं नाही तर....... दोन वर्ष कैद भोगली तरी. " भक्ती मिश्कीलपणे म्हणाली.

"माझं यात काय चुकलं भक्ती. ही गंमत नाही भक्ती. जरा गांभीर्यानं विचार कर, म्हणजे तुला कळेल मला काय म्हणायचंय ते. "

"मी विचार केलाय गंभीरतेने. पण न्यायालयात सगळं खोटं ठरतं खऱ्याचं. माहित आहे नं. मागं काय झालं ते. अहो आपल्याला सगळी मालमत्ता लिहून दिल्यानंतरही आपण ती केस हारलो. शिवाय तुम्हाला त्या खटल्यात दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षाही झाली. विसरलात काय. "

"नाही ना विसरलो. म्हणूनच तर लढायचं म्हणतो. "

"मागील खटला हारलो तरीही. "

"होय. मला माहित आहे की मागील खटला का बरं हारलो.
"

"का बरं हारलो? जरा सांगाल. "

"आपण मागील खटला हारण्याचं कारण म्हणजे आपण शिक्षणात कमी पडलो. आपल्याला कायद्याचं ज्ञान नव्हतं. "

"आता कुठून येणार आहे कायद्याचं ज्ञान?"

" तुझ्या मुलाला कायद्याचं ज्ञान शिकवायचं. जेणेकरुन तो खटला लढेल. "

"अन् त्यानंच उद्या आपली सेवा नाही केली तर....... "

"हो. तुझंही म्हणणं बरोबर आहे. मग यावर उपाय काय. "

भक्ती विचार करु लागली. तिला काहीच सुचत नव्हतं.. एवढ्यात तोच म्हणाला,

"भक्ती तू शिकशील. "

"काय!"

"मला वाटतं तू शिकावं. कायद्याचा अभ्यास तू करावास. मला न्याय मिळवून द्यावा. का शिकशील न तू? मला न्याय मिळवून देशील ना तू. "

"मी....... छे! माझी तर आज सवय तुटली. माझं मन तरी लागेल का अभ्यास करायला. तुम्ही जरासा विचार तरी करा. "

"अगं, मी शिकवणार. घरची सगळी कामं करणार. तू फक्त अभ्यास करायचा. निदान माझ्यासाठी तरी. मी घरची सगळी कामं करणार. झाडू, पोछा, स्वयंपाक वैगेरे सर्वकाही. अजून काय करावं लागेल तुझ्या शिक्षणासाठी?"

"बरं शिकेल. अभ्यास करेल. तुमच्यासाठी नक्कीच शिकेल. बस झालं ना आता. "

"मी आभारी असेल तुझा. पहिली केस माझीच राहिल बरं का?" तो म्हणाला. तसा तो हसला.

*******************************************
*

भक्ती शिकत होती. तिला शिकणं आवडत नव्हतं यावेळी. तरीही ती पतीच्या प्रेमासाठी शिकत होती. तसेच सतिश घरची सगळी कामं करीत होता. कधीकधी तो स्वयंपाकही करुन घ्यायचा. त्याला कळत नव्हतं काही. तरीही तो तिच्या अभ्यासासाठी जागायचा. ती झोपू नये म्हणून. त्याच्याच प्रयत्नानं ती आज ती वकील बनली होती. नव्हे तर तिनं आपल्या पतीसाठी पहिली केस टाकली होती.

भक्तीनं पहिली केस घेतली तिही आपल्या पतीची. ती पहिली केस. नव्हे तर त्या खटल्यानुसार भक्तीनं स्वतः जनहितयाचिका न्यायालयात दाखल करुन घेतली. स्वतः ती केस लढत असल्यानं ती जिंकलीही. त्यानंतर सर्व म्हाता-यांची मालमत्ता ही मुलाबाळाची न होता या म्हाता-यांची सेवा करणा-यांची होवू लागली. आता मायबापाची सेवा करायला मुलंही तयार होत. कारण त्यांना माहित होतं की जो मायबापाची सेवी करीत नाही. त्यांची सेवा करायला कोणीही तयार होते. कारण न्यायालयानं सतिशच्या याचिकेवर न्यायच तसा दिला होता. जर अशी म्हाता-

यांची सेवा करायला कोणी मिळाला नाही तर सरकार त्यांची काळजी घेत असे. त्या म्हाता-यांना वृद्धाश्रमात ठे‍ेवत असे व त्यांच्या मृत्यूनंतर त्या म्हाता-यांची सर्व मालमत्ता सरकारजमा करीत असे. अशाप्रकारे सरकारच्या संपत्तीतही या निकालानं बरीच वाढ झाली होती.

भक्तीला तो निकाल लागताच एकामागून एक खटले भेटत गेले. त्याचबरोबर तिचा भावही वाढत गेला. तिचा स्वभावही बदलत गेला. तिला कोणी कधी विचारत की तुझा पती किती शिकला आहे. ते सांगतांना लाजही वाटत असे. अशातच तिच्या विचारावर परिणाम होवून तिचा स्वभाव बदलला होता. ती आता आपल्या पतीशी व्यवस्थीत वागत नव्हती. त्यांचे नेहमी भांडणं होत होते.

सततचं भक्तीचं भांडण. तो जरी आज श्रीमंत असला तरी त्याला ते सहन होत नव्हतं. अशातच एक दिवस भक्तीशी कडाक्याचं भांडण झालं. त्याचा परीणाम असा झाला की भक्ती त्याला सोडून आपल्या दोन्ही मुलांना घेवून घरुन निघून गेली.

तो आता एकाकी झाला होता. ज्या ज्या घटकाला त्यानं मदत केली होती. त्या त्या घटकांनी त्याचा गैरफायदाच घेतला होता. नव्हे तर ते ते घटक त्याला एकाकी जगण्यासाठी सोडून गेले होते.

रोशनीला लहानाचं मोठं करतांना तो प्रसंगी उपाशीही राहिला होता. रोशनसाठीही त्यानं तेच केलं होतं. नव्हे तर कामनाचीही त्यानं सेवा केली होती. एवढंच नाही तर आता भक्ती....... भक्तीलाही त्यानं वकील बनवलं होतं. सर्वांना शिक्षण शिकवून शिक्षीत केलं होतं. पण त्यानं ज्यांना ज्यांना शिक्षण शिकवून शिक्षीत केलं. त्या त्या घटकांनी आपला फायदा नाही तर स्वार्थ पाहिला होता. त्याच्या भोळयाभाबड्यापणाचा फायदा उचलला होता.

सतिशला आता करमत नव्हतं. त्यानं लोकांची सेवा केली असली तरी आलेल्या प्रारब्धानुसार त्याला जगावसं वाटत नव्हतं. ज्या भक्तीवर त्यानं विश्वास करुन तिला शिकवलं नव्हे तर तिची पोरं दुसऱ्या पतीची असली तरी त्या पोरांना त्यानं आपलं मानलं. ती भक्ती तिची लेकरं घेवून केव्हाच दूर उडून गेली होती पक्षांसारखी. अशातच भक्तीनं त्याच्यावर खटला दाखल केला. तिला खावटी हवी होती.

दररोजचा एकटेपणा........ त्यातच त्रासलेला तो. ज्या भक्तीच्या मदतीनं नव्हे तर तिच्या पायगुणानं त्यानं सगळं वैभव गोळा केलं. ती भक्ती त्याला सोडून जाताच तसेच तिनं त्याच्यावर खावटीचा खटला दायर करताच तो खजील झाला. त्याला जगावसं

वाटलं नाही. त्यानं विचार केला. असं वैभव आपण एकदाचं संपवून टाकावं.

ज्या भक्तीसाठी आपण एवढं वैभव तयार केलं. आज त्या वैभवाला वारस उरलेला नसून आज ते वैभव दोन गटात विभागलं जाणार. त्यापेक्षा ते ठेवून जगणं कोणत्या कामाचं. शेवटी त्यानं निर्णय घेतला. तशी त्यानं योजनाही आखली. आपण या सगळ्या कारखान्याला आग लावायची आणि त्यानंतर गुप्त होवून दुसऱ्या शहरात जायचं. लोकांना वाटेल की सतिश आगीतच मरण पावला. तेच मला पाहायचंय.

योजनेची फलश्रुती अशीही झाली. आजचा दिवस त्याच्यासाठी काळ बनून आला. याच दिवशी त्याला आपल्यातील उद्योजक मारायचा होता. तसा त्यानं जणू निर्धारच केला होता.

आज त्यानं त्या संपूर्ण कारखान्याला आग लावली होती व ती आग लावल्यानंतर तो तिथून निघून गेला होता. दुसऱ्या आणखी एका शहरात. ज्या शहरात तो वेषांतर करुन राहात होता. त्यानं सगळं वैभव एका झटक्यात सोडलं होतं.

ते आगीचे डोंब उडत होते. कोणीतरी अग्नीशमन दलाला फोन केला. माहिती मिळताच अग्नीशमन दल हजर झालं. त्यांनी लागलेली आग आटोक्यात आणली. त्यानंतर लोकं सतिशला

शोधू लागले. पण. सतिश त्याठिकाणी हजर असायला पाहिजे होता ना. तो हजर नव्हता. तो तर ते शहर सोडून दुसऱ्या शहरात स्थलांतरीत झाला होता. पुन्हा तो फुटपाथवर स्थिरावला होता. त्याच्या मनात आज कोणत्याच अपेक्षा नव्हत्या. कोणाला पोसायचे नव्हते वा कोणाला आज शिकवायचे नव्हते. सगळी चिमण्यांची पिलं शिक्षणरुपी पंख फुटताच आईला घरट्यातच सोडून केव्हाच उडून गेली होती. त्याला एकाकी ठेवून.

कोणीतरी म्हणालं, 'कारखाना वाचला. पण कारखाना मालक सतिश यात मरण पावला असेल. बिचारा सतिश राब राब राबला. '

सतिश मरण पावल्याचं जाहिर होताच त्याचा कारखान्यात पुतळा उभारला गेला. आता दरवर्षी त्या पुतळ्याला हार चढवला जात असे. त्या पुतळ्याची पुजा केली जात असे. नव्हे तर त्याच्या किर्तीबद्दल दोन शब्दही कामगारांना सांगीतले जात असे.

काही दिवसानं भक्तीनं रोशनशी विवाह केला होता. ते दोघंही सतिशला मरण पावलेलं समजून एकत्र आले होते. असं वाटत होतं की त्यांना जणू एकत्र करण्यासाठीच सतिशनं मरणाचं नाटक केलं होतं. ते दोघंही मिळून त्या कारखान्याला लेकरासमान सांभाळत होते. तसेच आपआपल्या नोकऱ्याही गोडीगुलाबीनं सांभाळत

होते. ते आज सतिशमुळं सुखी बनले होते नव्हे तर सुखी जीवन जगत होते. रोशनीही कधीकधी यायची व सतिशची आठवण काढून रडायची. हे सर्व आठवणे सतिशच्या जीवंतपणी नाही तर मरणाच्या नाटकानंतर साध्य झालं होतं.

सतिश मात्र आजही दुसऱ्या शहरात फुटपाथवर आयुष्य काढत होता. त्यानं आकाशाला पांघरुण आणि जमीनीला अंथरुण बनवलं होतं. थंडी, ऊन, वारा, पाऊस हे त्याचे जणू मित्र बनले होते. कधी एखाद्या वेळी त्याला कारखान्याची आठवण येई. तेव्हा तो त्या कारखान्याला भेट द्यायला येत असे. तेही भिकाऱ्याच्या अवस्थेत. पण त्याला कोणी ओळखत नव्हते. तो मात्र सर्वांना ओळखायचा. तसेच सर्वांना सुखी पाहून आपलं अस्तित्व विसरायचा. कारण तो त्यांच्या सुखासाठीच आजपर्यंत जगला होता नव्हे तर त्यांच्या सुखासाठीच जीवंतपणीच मरण पावला होता. आपलं स्वतःचं अस्तित्व हरवून. आजही तो भीक मागत होता लाज न बाळगता. एक परिपूर्ण अर्थ पूर्ण जीवन जगत होता. ज्या जीवनात कोणतेच रुसवे फुगवे नव्हते आणि कोणतीच उणीव नव्हती. आता कोणाला शिकवणे नव्हते आणि कोणाला मोठेही करणे नव्हते. ज्याने आपले सर्व जीवनच इतरांच्या शिक्षणासाठी झिजवले. तो मात्र आज निरक्षर बनून जीवनाची वाट चालत होता अनवाणी पायानं. त्या भर उन्हातही चटके झोंबत होते पायाला.

तरीही त्याची तमा न बाळगता भीक मागत होता. तसेच ऊन, वारा पावसाचीही तमा न बाळगता भिकारी म्हणून जगत होता. जणू तेच त्याचे मित्र बनले होते जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत. तेच त्याचे मित्रही राहणार होते जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत.

****************



***अंकुश रा. शिंगाडे**

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

***प्रकाशित छापील साहित्य:**

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***


१)आक्रमण


***प्रवासवर्णन***

१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*












अंकुश शिंगाडे यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

कव्हरवर एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.













**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**श्री अंकुश शिंगाडे यांचे हे दहावे पुस्तक.**

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता

दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(६) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।